*कष्टकरी जनता, भूषण भारता । वंदन करितो पददलिता ।।*

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे नियतकालिक**

संपादक
**प्रा. रामचंद्र मुटाटकर**

# हाकारा (त्रैमासिक)

कार्यकारी संपादक
**ग. शां. पंडित**

**वर्ष : ३४ वे** | **जुलै–डिसेंबर २०१३** | **अंक : तिसरा–चौथा**

## अनुक्रमणिका

संपादकीय ---------------------------------------------------- २

१) आदिवासी विकास धोरण (स्वरुप आणि दिशा) : मान्यवरांचे विचार ---------- ३

२) महाराष्ट्राचे आदिवासी विकास धोरण : सद्य:स्थिती व दिशा : सुरेखा दळवी ------ २१

३) पाचवी अनुसूची, पेसा व वनहक्क कायदा : मोहन हिराबाई हिरालाल ---------- २५

४) आदिवासींचे विस्थापन : उल्का महाजन -------------------------- ३७

५) आदिवासींचे सांस्कृतिक धोरण : सुनिल कुमरे, कुंडलिक केदारी ------------- ४१

६) आदिवासींचे सांस्कृतिक धोरण : डॉ. विनायक तुमराम ------------------ ४५

७) आदिवासी विकासाच्या दिशा : वाहरु सोनवणे ---------------------- ५१

८) आदिवासींच्या 'ऊलगुलान' मधूनच विकासाचे धोरण : मिलिंद बोकील --------- ६५

९) पहिले राज्यस्तरीय आदिवासी साहित्य संमेलन : उषाकिरण आत्राम ----------- ७३

१०) रानगर्भातील जखमा : डॉ. मच्छिंद्र चोरमारे ------------------------ ८३

◆ **पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
२०१, आकांक्षा रेसिडेन्सी,
औंध, पुणे – ४११ ००७.
टेलिफोन (०२०) २५८८४१५०

**अंक मूल्य ८०/– रूपये**

◆ **अक्षर जुळणी**
नंदू दिघे
सौ. स्वाती दंडारे

◆ **मुद्रण स्थळ**
असाईन सिस्टिम्, पुणे

◆ **मुद्रक व प्रकाशक**
प्रा. रा. के. मुटाटकर
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

◆ **संपादक मंडळ**
ॲड. सुरेखा दळवी
डॉ. मिलिंद बोकील
श्री. वाहरु सोनवणे
डॉ. विनायक तुमराम

**या अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.**

या अंकास महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने अनुदान दिले असले तरी अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही.

या अंकाच्या प्रकाशनासाठी **भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र** यांचेकडून अनुदान मिळाले आहे.

# संपादकीय

'हाकारा' त्रैमासिक नियतकालिकाची वाटचाल गेली ३३-३४ वर्षे अखंडपणे आपणासारख्या वाचक, लेखक, हितचिंतकांच्या सक्रीय सहभाग व सहकार्यामुळे चालू आहे, ही अतिशय आनंदाची बाब आहे.

'हाकारा'चा हा अंक जोडअंक असून 'आदिवासी विकास धोरण-स्वरुप आणि दिशा' या विषयावर आधारीत आहे.

आदिवासी विकास धोरणावर यापूर्वी देखील बऱ्याच चर्चा झालेल्या आहेत, काही विशेषांक सुध्दा निघालेले आहेत. परंतु अजूनही आदिवासी विकासाला योग्य दिशा देणारे धोरण शासनाच्या पातळीवर पुढे आलेले नाही. 'आदिवासी संस्कृती'ची एकंदर भारतीय संस्कृतीत एक 'स्वतंत्र ओळख' आहे. भारतीय राज्यघटनेत 'अनुसूचित जमाती' मध्ये आदिवासींचा समावेश केलेला असून अनेक कलमांच्या माध्यमातून त्यांच्या सामाजिक आर्थिक विकासासाठी घटनात्मक तरतुदी केलेल्या आहेत. परंतु या तरतुदी प्रत्यक्षात येण्यासाठी मदत होऊ शकेल असे राष्ट्रीय किंवा राज्यपातळीवरील धोरण मात्र स्वातंत्र्यानंतरच्या ५०-६० वर्षात अस्तित्वात येऊ शकलेले नाही, ही अतिशय खेदजनक बाब आहे.

२००५ मध्ये राष्ट्रीय आदिवासी धोरणाची आखणी झाली; परंतु त्या धोरणामध्ये म्हणावी तशी सुस्पष्टता नाही. त्यातल्या तरतुदी या परस्परविरोधी होत्या. मुळात म्हणजे आदिवासी विकासाचे धोरण हे त्यांच्या संस्कृतीच्या आधारेच आखले गेले पाहिजे. १९५२ साली पंडित नेहरुंनी जी पंचशील तत्त्वे मांडली, त्यात देखील नेहरुंनी आदिवासींचा विकास त्यांच्या संस्कृतीला बाधा न आणता करावा असेच सांगितले आहे. त्यामुळे त्यातील नेमके तपशील लक्षात देऊन आदिवासी विकासाचा मसुदा तयार व्हायला हवा होता.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने २००४ मध्ये राष्ट्रीय आदिवासी विकास धोरणाच्या अनुषंगाने धोरण मसुद्यावर चर्चा करण्यासाठी 'प्रयास'च्या सहकार्याने एक चर्चासत्र घेतले होते. त्या चर्चासत्रावर आधारीत 'हाकारा'चा विशेषांक २००४ साली प्रकाशित झाला आहे. अभ्यासकांना व वाचकांना आजही तो उपयुक्त ठरु शकेल. कारण आदिवासी विकास धोरणावर सतत अभ्यासक व कार्यकर्त्यांची चर्चा होत राहिली तरच आदिवासी विकासाचे नेमके स्वरुप लक्षात येईल आणि त्याला योग्य दिशा मिळू शकेल.

म्हणूनच मार्च २००१३ मध्ये महाराष्ट्र शासनाचा आदिवासी उत्थान कार्यक्रम व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने 'आदिवासी विकास धोरण' विषयावरील एक चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात महाराष्ट्राचे आदिवासी विकास धोरण, आदिवासींचे विस्थापन, पेसा व वनहक्क कायदा, सांस्कृतिक धोरण या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करण्यासाठी महाराष्ट्रातून - श्री. देवाजी तोफा, श्री. बाळकृष्ण रेणके, श्री. मोहन हिराबाई हिरालाल, वाहरु सोनवणे, विनायक तुमराम, सुरेखा दळवी, मिलींद बोकील, उल्का महाजन, निरुपमा देशपांडे इत्यादी मान्यवर आणि विविध संस्था-संघटनांचे कार्यकर्ते उपस्थित होते.

सदरचा विशेषांक याच मान्यवरांनी मांडलेल्या मत-मतांतरांवर आधारीत असून अभ्यासकांना व कार्यकर्त्यांना निश्चितच उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. अंकावरील आपल्या अभिप्राय-प्रतिक्रियांचे स्वागत आहे.

**ग. शां. पंडित**
कार्यकारी संपादक

# आदिवासी विकास धोरण

## स्वरुप आणि दिशा

***महाराष्ट्र शासन पुरस्कृत आदिवासी उत्थान कार्यक्रम आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १४ व १५ मार्च २०१३ रोजी पुणे येथे 'आदिवासी विकास धोरण : स्वरुप आणि दिशा' या विषयावरील राज्यस्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यशाळेला आदिवासी क्षेत्रात कार्यरत असलेले मान्यवर कार्यकर्ते, अभ्यासक व विचारवंत उपस्थित होते.***

**उद्‌घाटन :**



गडचिरोली जिल्ह्यातील मेंढा–लेखा गावात वनहक्क कायद्याची आणि पेसा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी प्रतिनिधिक स्वरुपात ज्यांनी पुढाकार घेतला ते मा. श्री. देवाजी तोफा यांनी चर्चासत्राच्या विचाराची (मातीच्या समईची) ज्योत प्रज्वलित करून कार्यक्रमाचे औपचारिक उद्‌घाटन केले. सोबत उजवीकडे पुणे विद्यापीठाचे 'महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे' माजी संचालक मा. प्रा. डॉ. पंडित विद्यासागर, आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे संस्थापक अध्यक्ष मा. प्रा. आर. के. मुटाटकर व डावीकडे आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे राज्य समन्वक ग. शां. पंडित.

**गौरव :**




मेंढा लेखा ग्रामसभेने आपल्या गावाच्या जंगलावर वनहक्क कायद्याच्या अनुषंगाने मालकी हक्क मिळवला व आदर्श लोकशाहीचे एक उदाहरण घालून दिले. त्याबद्दल महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या वतीने मेंढा लेखा ग्रामसभेचा गौरव मा. श्री. देवाजी तोफा, मोहन हिराबाई हिरालाल व सुबोध कुलकर्णी यांना मा. प्रा. डॉ. पंडित विद्यासागर व मा. प्रा. आर. के. मुटाटकर यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन करण्यात आला.

यानंतर उद्‌घाटनाच्या निमित्ताने मान्यवर अतिथींनी आपले विचार मांडले, ते पुढे आहे –

**प्रास्ताविक**

**प्रा. रा. के. मुटाटकर (संस्थापक अध्यक्ष, मास) :**



मा. श्री. देवाजी तोफा, आमचे मित्र मा. पंडित विद्यासागर आणि इतर सर्व नेहमीचे मित्र बाळकृष्ण व मा. श्री. रेणके.

आज आपण चर्चासत्राच्या निमित्ताने इथे जमलेलो आहोत; पण माझ्या दृष्टीने हा खरा मेळावा आहे. त्याचे कारण असे की, आपल्यापैकी काही लोक गेल्या ३५ वर्षापासून महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेशी जवळीक करून आहेत. आपण हाकाराचे अंक जर पाहिले, जुने अंक, त्या अंकात कार्यकारणीमध्ये नॅन्सीचे नाव आहे, सुरेखाने नाव आहे, मोहनचं नाव आहे, मोहन सहसचिव होते आमचे, वाहरुचं नाव आहे, मिलिंदचं नाव आहे, काळूरामजी तर आमचे उपाध्यक्ष होते. शरद कुलकर्णी आहेत, त्यांची प्रकृती बरी नसल्यामुळे त्यांना आणता आले नाही. पद्माकर वळवी आज कॅबिनेट मिनिस्टर आहेत, त्यांचं नाव आहे आणि इतर बरेच आहेत.

भटक्या विमुक्तांबद्दल पहिलं लेखन बाळकृष्ण रेणके यांचे हाकारात झालेलं आहे. धरणावरती मेधा पाटकरांची पहिली कविता हाकारात आलेली आहे आणि वाहरुने मेधा पाटकरवर लिहिली कविता तीही आपल्याकडे आहे. आदिवासी साहित्याची सुरुवात भद्रावतीनंतर आपल्या मंचावर झालेली आहे. तर ह्या गोष्टी असल्यामुळे मी याला म्हणतो की हा मेळावा आहे. याच्या पहिले गेल्यावर्षी यशदामध्ये आपण बरेच लोक भेटलो होतो. कारण अलीकडच्या वातावरणामुळे, प्रत्येक राजभवनमध्ये ट्रायबल सेल सुरु करावं असं भारत सरकारने सगळ्या गव्हर्नन्सना सांगितलं आणि त्या ट्रायबल सेलमध्ये एक तरी अॅन्थ्रोपोलॉजीस्ट असावा असा एक दंडक घालून दिलेला आहे. तर त्या ट्रायबल सेलची कशी योजना असावी, त्याचे काम काय असावं याबद्दल आमच्या अनौपचारिक चर्चा सुद्धा राजभवनशी झाल्या. आणि औपचारिकरित्या एक चर्चासत्र त्यांनी यशदामध्ये केलं होतं, त्यात आपण बरेच लोक होतो.

मला थोडं तरुण लोकांकरिता सांगायचे आहे आणि इतर लोक जे नव्याने आले आहेत त्यांच्याकरिता सांगायचे आहे की, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची सुरुवात सांगण्याचे कारण असं की जसं जसं समाजात स्थित्यंतर होतं, राजकारणात स्थित्यंतर होतं, अर्थकारणात स्थित्यंतर होतं, त्याप्रमाणे स्वयंसेवी संस्था या कशा–कशा सामोरी जातात, त्यांना कशा प्रकारचे प्रश्न निर्माण होतात हे सुद्धा आपल्याला काम करताना कार्यकर्त्यांना शिकायचं असतं. पुणे विद्यापीठामध्ये स्वतंत्र मानवशास्त्र विभाग १९७७ पासून असून तो महाराष्ट्रातील एकमेव विभाग आहे. तत्पूर्वी, समाजशास्त्र व मानवशास्त्र असा संलग्न विभाग होता.

मानवशास्त्र स्वतंत्र पदव्युत्तर अभ्यासक्रम १९६३ साली सुरु झाला. इरावती कर्व्यांचे निधन १९७० मध्ये झाले. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची मुहूर्तमेढ संशोधन कसं करायचं हे शिकवण्याच्या कार्यशाळेतून १९७५ साली महाराष्ट्रातील सामाजिक शास्त्रांच्या प्राध्यापकांमुळे झाली. त्याला इंडियन कौन्सिल ऑफ सोशल सायन्स रिसर्चने

योगदान दिले होते. भाग्याने आम्हाला प्रि. दाभोळकरांसारखे कुलगुरु होते, ज्यांना सामाजिक जाणीव sensitivity ह्या प्रकारची खूप होती. तर पुणे विद्यापीठाचे दाभोळकर, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु टोपे हे सगळेच त्याला हजर होते. मानवशास्त्र शाखेने आयोजित केलेल्या संशोधन पद्धतीच्या शिकवणीपासून (Research Methodology) सुरुवात झाली. तिथे प्राध्यापकांच्या मागणीनुसार या संस्थेची स्थापना झाली. त्याच लोकांना (४० प्राध्यापकांना) आम्ही १९७६ साली जव्हारच्या चालतवड भागात बोलविले. पहिल्यांदाच ते आदिवासी क्षेत्रात राहिले असतील.

आणि तिथे त्यांच्याकडून ज्याप्रकारचे संशोधन शिक्षणाच्याबद्दलच्या विषयाची मांडणी आदिवासी समाजासमोर आणि प्रा. दाभोळकर कुलगुरु यांच्या उपस्थितीत, प्रा. गं. बा. सरदार यांच्या उपस्थितीत जव्हार येथे करण्यात आली. त्याचवेळी सुरतचे प्रसिद्ध समाजशास्त्रज्ञ प्रा. आय. पी. देसाई हजर होते. तेव्हा महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची रीतसर नोंदणी ज्याला म्हणता येईल अशी करण्यात आली, मे १९७६ मध्ये. म्हणजे सुरुवातच ही अशी आहे. प्राध्यापकांपासून सुरुवात, संशोधन पद्धतीपासून सुरुवात. परंतु त्याच्यामध्ये दाभोळकरांसारखे कुलगुरु, गं. बा. सरदारांसारखे विचारवंत, जे आपले नंतर अध्यक्ष झाले असे लोक हजर होते.

दुसरी सुरुवात झाली ती डिसेंबर १९७८ साली. दिल्ली येथील आंतरराष्ट्रीय मानवशास्त्र संमेलनानंतर आम्ही एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद घेतला होता, वैद्यक मानसशास्त्रावरती. त्याला ५० च्या वर पाश्चात्य संशोधक वैद्यक मानवशास्त्रज्ञ आले होते. पाश्चात्य म्हणण्याचे कारण असं की अलीकडे बऱ्याचदा आमच्या विद्यापीठांमध्ये आंतरराष्ट्रीय परिसंवाद होतात; पण त्याला दोन श्रीलंकेचे, दोन बांगलादेशचे आणि तीन नेपाळचे म्हणून त्याला आंतराष्ट्रीय म्हणण्यात येते. तसं नसून हे ५० लोक जे आहेत ते युरोप आणि उत्तर अमेरिका इथले लोक होते. त्याच्यावरती जे '**सोशल सायन्स इन मेडिसिन**' हे आंतरराष्ट्रीय जर्नल आहे, त्यात केवळ पुण्याच्या परिसंवादाचा असा अंक काढण्यात आला. त्याचा इथं उल्लेख देण्याचं कारण असं की, परिसंवादातून जे आमच्याकडे थोडेसे पैसे उरले, त्याच्यातून हाकारा निर्माण करण्यात आला.

म्हणजे बरेच दिवस चालले होते की आपण अशाप्रकारचे आपले त्रैमासिक असावं, मासिक असावं; पण त्याला फंडिंग कोण करणार. तर ते मुद्दाम सांगण्याचे कारण असे की, त्याच्यावर चर्वीचरण होऊन त्याच्यातून '**हाकारा**' काढावा असे ठरले. प्रा. गं. बा. सरदार, मग आमचे अध्यक्ष झाले. त्यांनी व आम्ही सगळ्यांनी मिळून ठरविलं आणि तो हाकारा आपल्याला पाहायला इथं सापडतो. जानेवारी १९८० सालापासून आजतागायत हाकारा चालू आहे. काही अंक आमचे चांगले आहेत, काही आमच्या स्वत:च्या दृष्टीने एवढे चांगले नाहीत. परंतु अदिवासींना वाहिलेलं भारतामध्ये कुठल्याही भाषेत म्हटलं तर एक हाकाराच आहे. मग ते नियतकालिक पाक्षिक असो, त्रैमासिक असो काहीही असो. ही एक दुसरी सुरुवात.

तिसरी सुरुवात जर म्हणायचे तर त्याच्यानंतर लगेचच २४-२५ फेब्रुवारी १९७९ ला, पुण्याच्या विद्यार्थी गृहामध्ये, त्याला तेव्हा अनाथ विद्यार्थी गृह म्हणायचे, नंतर अनाथ शब्द गाळण्यात आला. त्या विद्यार्थी गृहामध्ये आपल्यापैकी काही क्रियाशील लोकं आणि समाजशास्त्रज्ञ, नागपूरचे प्रा. भांडारकर जे पुढे Vice Chancellor झाले. प्रि. विल्किन्सन, हिस्लोप कॉलेज, नाशिकचे प्रि. साळुंके हे सुद्धा त्याला आलेले होते. या सगळ्या लोकांनी येऊन, आज आपण जी जंगल-जमिनीची चर्चा करतो, पर्यावरणाची चर्चा करतो, शिक्षणाची चर्चा करतो, आरोग्याची चर्चा करतो, आदिवासींच्या संदर्भात तशा प्रकारची चर्चा केली. आदिवासी कार्यकर्ते जे तरुण जसं

नॅन्सी, सुरेखा वगैरे आहेत, आज आपल्या सगळ्यांचीच वये वाढली आहेत तेव्हा विशी मधले सगळे लोकं होते. तर हे लोक एकत्र येऊन मला वाटतं पहिल्यांदाच एकत्र असे कार्यकर्ते आले. असा Platform पहिल्यांदाच मिळाला. ती मानवविज्ञान परिषदेची खरी सुरुवात.

त्याला जोडून मग हाकारा १९८० साली जानेवारीपासून सुरु करण्यात आला, त्याच्याबद्दल सांगितलेच. त्यावेळी आम्हाला जगदीश गोडबोले सारखा धडाडीचा कार्यकर्ता संपादक म्हणून लाभला होता आणि त्याने जे हाकाराला वळण दिलं ते वळण आपल्याला खूप वर्षे चालू राहिलेलं आहे आणि आजही आपण ते करायचा प्रयत्न करतो आहोत. त्याच्यामध्ये त्यांनी जंगल हा नुसता जंगल–जमिनीचा प्रश्न नसून तो आपला एक चळवळीचा भाग असतो. जंगल पर्यावरण हा त्याच्यातला भाग आणि जंगल बचाव, मानव बचाव अशा आपण परिषदा घेतल्या. काळूराम त्याच्यामध्ये होते. आपण तिकडे पालघरलाही परिषदा घेतल्या. सुंदरलाल बहुगुणा, चंडीप्रसाद भट आपल्याकडे त्यानिमित्ताने यायचे.

म्हणजे अशा तऱ्हेने महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेची वाटचाल झालेली आहे. आणि या वाटचालीमध्ये एका बाजूला विद्यापीठ, त्याच्यातले संशोधक आणि आदिवासी कार्यकर्ते असे मिश्रण करुन, आपण जे कार्यक्रम घेतले ते कार्यक्रम इथे आपल्याकडे जे पुस्तक आहे '**तीन दशकांची वाटचाल**' यात दिलेले आहेत. आपण अभ्यास दौरे केले, बस्तरचा अभ्यास दौरा केला. उत्तराखंडचा अभ्यास दौरा केला, प्रशिक्षणे बरीच घेतली, पंचायत राज ची प्रशिक्षणे, कुष्ठरोगाची प्रशिक्षणे, स्त्रियांची प्रशिक्षणे, बरीच चर्चासत्रे घेतली, आदिवासींच्या बद्दल जंगल–जमिनीचे चर्चासत्र, स्त्रियांच्याबद्दल, साहित्याबद्दल, पर्यावरणाबद्दल अशी चर्चासत्रे घेतली. ही सगळी वाटचाल केली. पण ही सगळी वाटचाल करत असताना आपल्याकडे कोणी कर्मचारी नव्हते. त्यामुळे आमच्यापैकी काही लोकं म्हणतात की ती स्वयंसेवी संस्था होती आणि आता तुम्ही एनजीओ झाला आहात.

तर तो चर्चेचा मुद्दा आहे. अर्थात, एनजीओ कशाला म्हणायचे, स्वयंसेवी संस्था कशाला म्हणायचे? आम्हाला एनजीओ म्हणायला आवडत नाही. महाराष्ट्रामधला जो आपला वारसा आहे, तो स्वयंसेवी संस्थांचा आहे. एकोणिसाव्या, विसाव्या शतकातला. आणि त्यादृष्टीने वाटचाल चालू आहे. परंतु त्याला जे जोडून घ्यायला लागतं, ज्ञानाशी आणि ज्ञानाच्या विद्यापीठाशी ते जोडण्याचा आपण प्रयत्न केलेला आहे. त्याच्यापुढे ज्याला एनजीओ म्हणता येईल असं, लंडन स्कूल ऑफ हायजीन अँड ट्रॉपिकल मेडिसिनचे आम्ही दहा वर्षे एशियन पार्टनर म्हणून काम केलं. त्याच्यामध्ये ज्याला आज मेडिकल रिसर्च किंवा ऑपरेशनल रिसर्च म्हणता येईल, त्याप्रकारचे काम आम्ही करत आलेलो आहे.

त्याच्यामध्ये मग पब्लिकेशन्स होणं, पीएचडीच्या लेव्हलचा रिसर्च होणं वगैरे हे सगळं झालेलं आहे. आणि दुसरीकडे महाराष्ट्र शासनाने आम्हाला आणि डॉ. रजनीकांत आरोळे जामखेडचे, यांना बोलावून आदिवासींच्यामध्ये जो कुपोषणाचा प्रश्न आहे. त्याला मुंबई हायकोर्टाने जो SUO MOTO महाराष्ट्र शासनावरती जो खटला भरला होता, असं म्हणता येईल त्याला उत्तर म्हणून रजनीकांत आरोळे आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांना संयुक्तपणे एक सबंध महाराष्ट्रभर ७ जिल्ह्यात ९ तालुक्यांत आदिवासी उत्थान कार्यक्रम दिला. आणि तो कार्यक्रम आता ३१ मार्चला संपणार आहे. ५ वर्षाचा कार्यक्रम होता; परंतु शासनाचे फंडिंग बरोबर येत नसल्यामुळे तो शासनानेच ५ वर्षाचा ८ वर्षापर्यंत वाढवला.

ते काम आम्ही २५० गावांमध्ये ५०० स्वयंसेवक, साधारण २५० महिला आणि २५० पुरुष असे गाव–पाड्याचे स्वयंसेवक यांच्यामार्फत ते कार्य केलेले आहे.

त्याला रिसर्च म्हणायचे की नाही हा वादाचा मुद्दा आहे. शासनाच्या दृष्टीने रिसर्च नाही. विद्यापीठाच्या दृष्टीने रिसर्च नाही. आम्ही त्याला इंटरव्हेन्शन रिसर्च म्हणतो. आणि त्याच्यातून जे काही शिकायला मिळतं त्याच्यात मी जात नाही, परंतु मला म्हणण्याचा मुद्दा असा की एक मॉडेल डेव्हेलपमेंट, जसं रजनीकांत आरोळेंनी एक मॉडेल डेव्हेलपमेंट केले, जामखेडच्या प्रकल्पातून त्या प्रकारचे आम्ही एक मॉडेल डेव्हलपमेंट केलेले आहे. आणि एवढंच म्हणता येईल खास की हे जे ५०० स्वयंसेवक निर्माण झाले. ह्या ५०० स्वयंसेवकांचा जो मानव विकास झाला, आज आपण ह्युमन डेव्हलपमेंट-ह्युमन डेव्हलपमेंट म्हणत असतो, तो मानव विकास झाला. तो नक्की झालेला आहे आणि त्याच्यामध्ये Sustainability, Replicability हे जे आपण शब्द वापरत असतो. त्याच्या दृष्टीने आम्ही कार्य केलेले आहे, असे वाटते.

त्याच्या जोडीला भारत सरकारने अलिकडे सार्वजनिक आरोग्यामध्ये आयुष म्हणजे आयुर्वेद, योग वगैरे सगळे ज्याला '**आयुष**' म्हणतात. हल्ली, तशा प्रकारचे एक सेंटर आम्हाला बहाल केलेले आहे. आपल्या आदिवासी क्षेत्रामध्ये जे वैदू लोक असतात त्यांचे जे ज्ञान आहे किंवा Indigenous Knowledge आपण एकंदर म्हणतो, त्याचा आपण उपयोग करून आणखीन ते जे आयुर्वेदामध्ये त्याचे generalization झालेले आहे. युनानी मध्ये झालेलं आहे, सिद्धमध्ये झालेलं आहे, योगाबद्दल आपल्याला माहिती आहे. त्याच्याबद्दल पार्लमेंटने National Policy केलेली आहे. परंतु त्याचा अजून जसा उपयोग व्हायला पाहिजे, लोकांच्या स्वास्थ्य रक्षणाकरता तसा करण्यात होत नाही.

त्यादृष्टीने काही प्रयोग करायचे म्हणून हिमाचल प्रदेश, छत्तीसगड आणि महाराष्ट्र अशा तीन राज्यांमध्ये आमचे ते कार्य चाललेले आहे. राज्य सरकारबरोबर चाललेले आहे. आम्ही सरकार बरोबर काम याकरिता करतो की जे काही रुजेल, आदिवासी उत्थान कार्यक्रमाचे सुद्धा आम्ही सरकार बरोबर काम केले, ते शासनयंत्रणेत गेले तर शाश्वत होईल. शासनाबरोबर काम करण्यात अडचणी पुष्कळ असतात; पण जे काही रुजेल ते पक्के त्या यंत्रणेमध्ये, त्या व्यवस्थेत जावे अशी इच्छा. त्याच्या जोडीला जे इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च आहे, World Health Organization आहे यांचे सुद्धा आमच्याकडे संशोधन प्रकल्प आहेत.

तर ही वाटचाल सांगण्याचे कारण असं की, आपण जे पूर्वीपासून आमच्याबरोबर आहात, नव्याने जे आमच्याबरोबर आलेला आहात तर आज जी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद आहे, त्याचे कार्यकारी मंडळ असेल. त्याला वळण देण्याचे काम त्याच्यावर देखरेख ठेवण्याचे काम, हे सगळ्या लोकांचे आहे. हे काम अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी, खजिनदार आणि आठ कार्यकारी मंडळाचे लोक असं ते काम नाही. हे सार्वजनिक काम आहे. Charitable Organization च्या कायद्याप्रमाणे काहीतरी कर्मचारी, काहीतरी ट्रस्टी लागतात. पण त्या ट्रस्टींच्या मालकीची संस्था होत नाही, हे मला वाटतं. ज्या ज्या लोकांचा संबंध आलेला आहे, जी जी लोकं आपण सार्वजनिक भागामध्ये काम करता आहात आणि प्रेमापोटी आमच्याकडे आजही आलेले आहेत आणि पूर्वीपासून आलेले आहेत. त्यांनी त्याच्यामध्ये लक्ष घालत राहावं असं वाटतं.

आता जसं रेणके साहेब इथे आलेले आहेत, विमुक्त जातींचे प्रश्न, भटक्या विमुक्तांचे प्रश्न हे हाकारामध्ये आम्हाला पहिल्यांदा मांडता आले, त्यांच्या माध्यमातून. त्यांनी त्याच्यात लेखन केलेले आहे. त्याच्यामध्ये इंदिरा गांधी यांच्याशी काय संवाद झाला आणि त्याला कोणा-कोणा लोकांचा विरोध होता हे शब्दश: दिलेले आहे. त्याच्यानंतर रेणके साहेबांना भारत सरकारने जो आयोग नेमला भटक्या विमुक्तांचा, त्याचे अध्यक्ष नेमण्यात आले. मलाही त्यांनी प्रेमाने दोन वेळा दिल्लीला बोलावले आणि मी, रेणके साहेब आणि त्यांचे उपाध्यक्ष पटणी, आम्ही

लोकांनी पाच सहा तास बसून एक योजना आयोगाकरिता, जे बजेटिंग करायचे होते, मला वाटतं हजार-बाराशे कोटींचे बजेट असेल ते, ते आम्ही करायचा प्रयत्न केला. अजून त्यांना त्याच्यात यश आलेले आहे असे नाही. पण लोकशाहीच्या राजकारणामध्ये ह्या गोष्टी चालत असतात. कारण की ते राजकारण वेगळं असतं. आपले गं. बा. सरदार जे अध्यक्ष होते, आपल्याला माहीत आहे की, ते गांधी, मार्क्स आणि संत वाङमय याचे एक विलक्षण असे ते मिश्रण होते. तर त्यांना सारखे वाटायचे की सगळ्या दलितांना एकत्र यावे. सगळ्या दलित-आदिवासींनी एकत्र यावे. पण जे आपण बघतो की दलित ही सुद्धा एक वेगळी जात झाली आहे. आदिवासींची वेगळी जात होऊ शकली नाही. कारण त्यांना तशाप्रकारचे नेतृत्व महाराष्ट्राच्या पातळीवरपण मिळाले नाही आणि देशाच्या पातळीवर सुद्धा मिळाले नाही. ज्यांना शेड्युल कास्ट म्हणतात त्यांना ते मिळाले. भटक्या विमुक्तांना तर मुळीच मिळाले नाही.

त्याच्यामुळे हे आज जे प्रश्न आहेत आपल्या समाजामधले, भारतामधले ते प्रश्न अजून त्या पद्धतीने चालू आहेत. आणि गंमतीची गोष्ट अशी की आदिवासी ज्यांची ८ टक्के लोकसंख्या शासनाच्या शेड्युल ट्रायब च्या भाषेप्रमाणे आहे, त्याला आदिवासी म्हणायचे की नाही हा भाग वेगळा आहे. इतकी मोठी लोकसंख्या असताना, राजकारणाच्या दृष्टीकोनातून त्याला महत्व असताना सुद्धा अजून पार्लमेंटने संमत केलेली National Tribal Policy आपल्याकडे नाही. आणि होल्थ पॉलिसी म्हटले तर दोन पॉलिसी आहेत. एक National Health Policy जी Allopathy च्या दृष्टिकोनातून आहे. आणि एक National AYUSH Policy खरे म्हणजे एका राष्ट्राला एकच आरोग्य पॉलिसी असायला पाहिजे, दोन पॉलिसी आहेत आणि इथे National Tribal Policy चा अजून पत्ताच नाही. हे जे विरोधाभास आपल्याला दिसतात, आपल्या लोकशाहीमध्ये, त्याच्यामध्ये आपल्या सगळ्यांचा संबंध आहे, आपण त्याच्याकरता काहीतरी कार्य करत असतो, आपआपल्या परीने. पण हे समजून घेण्याचे कारण असं की, ह्या ज्या स्वयंसेवी संस्था आहेत आणि महाराष्ट्रात जी परंपरा आपल्याला लाभलेली आहे रानडे, गोखले, आगरकर, ज्योतीबा फुले, आंबेडकर ह्यांच्या माध्यमातून आणि मग आपल्याला जे गांधींचे पुढे दिसते की, गांधींनी एका बाजूला ब्रिटिशांच्या विरुद्ध चळवळ करणे National Independence करीता, आणि दुसरीकडे रचनात्मक कार्यक्रम २१-२२ कलमी जे काही असतील ते, त्या दोन्हींचे मिश्रण घालून जे करायचे प्रयत्न केले, ते स्वयंसेवी संस्थांना आजही करायला लागते.

म्हणजे एका बाजूला समजा आपण जंगल जमिनींच्या प्रश्नांचे आदिवासींच्याबद्दल बोलत असतो, तसेच मग आदिवासींचं कुपोषण दूर कसे करायचे त्याच्याकरता केवळ शासनाला दोष न देता आपल्याला जर तशी संधी मिळत असेल तर ते शास्त्रशुद्ध पद्धतीने करून दाखवायचे. त्याची Replicability करुन दाखवायाची. असे अनेक प्रश्न आहेत. म्हणजे शिक्षणाच्या बाबतीमध्ये आहेत त्या दोन्हींचे मिश्रण करण्याचा प्रयत्न आपल्याला करायला लागतो. तर ते मॉडेल आपण साधारण एका बाजूला चळवळ आणि एका बाजूला रचनात्मक कार्यक्रम असं पाळत आलेलो आहे.

आदिवासी उत्थान कार्यक्रम जो एक आमचे रचनात्मक मॉडेल आहे. आणि आपण जे आत्तापर्यंत बऱ्याचशा परिषदा, चर्चासत्रे घेतली आणि Advocacy चे काम केले, ते एक चळवळीचे काम आहे आणि आपण चळवळ करणारे लोक आहात. देवाजी तोफा आणि मोहन यांनी जे गडचिरोलीमध्ये चळवळीच्या माध्यमातून रचनात्मक कार्य करून दाखविलेले आहे, ती आपल्या सगळ्या आदिवासी क्षेत्रामध्ये कसे करता येऊ शकते ही एक महत्वाची गोष्ट आहे. कारण याला विरोध कायम होत राहणार. विरोध कायम होत असतो. जरी फॉरेस्ट

राईटस् ॲक्ट वगैरे आपल्याला माहिती आहे, पार्लमेंटमध्ये किती जरी पास झाले, तरीसुद्धा अंमलबजावणीच्या वेळेस जे झारीतले शुक्राचार्य असतात ते सुद्धा आपल्याला माहिती आहेत. त्यांचा विरोध कायम होत राहणार. त्या विरोधाला सामोरे जायला एका बाजूला चळवळ आणि एका बाजूला आपण रचनात्मक कार्य करून दाखविणार, हे आपल्याला कायम करत राहावं लागणार आहे.

आज आमच्यामध्ये पंडित विद्यासागर आहेत, पंडित विद्यासागर हे फिजिक्सचे प्रोफेसर आहेत. परंतु त्यांनी समाजाकरिता, समाजाच्या पातळीवरती सायन्सला कसं आणता येईल याच्याबद्दलचे बरेचसे काम केलेले आहे. तसेच विद्यापीठाचा कारभार जरी कुलगुरुंच्या खुर्चीवर ते बसले नाहीत औपचारिकरित्या, बऱ्याचदा त्यांचे नाव त्याच्यामध्ये होतं, परंतु किमान पाच वर्षे तरी त्यांनी कुलगुरुच्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडलेल्या आहेत. आणि आमचं भाग्य असं की त्यांनी आता महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे अध्यक्ष होण्याचे मान्य केलेले आहे. १ एप्रिल २०१३ पासून महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे पंडित विद्यासागर हे अध्यक्ष असतील. मला त्यांना याच्याबद्दल Thanks द्यायचे आहेत. हे त्यांनी मान्य केलेलं आहे आणि त्यांचा जो अनुभव आहे, तो त्यांचा विचार आहे सायन्सबद्दल, समाजाबद्दल, हा जो विचार आहे त्या विचाराला एक धोरण म्हणून एक मार्गदर्शन म्हणून ते आपल्याला लाभणार आहेत.

आपण सगळे लोक इतकी वर्षे महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदे संबंधित आहात, हाकारा मध्ये आपल्या सगळ्या लोकांचे लेखन आहे. पण अलीकडे हाकारामध्ये त्यांचे लेखन नाही. एक माध्यम आहे ते लोकांपर्यंत पोहचण्याचे, त्या माध्यमाचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे. ते एक सार्वजनिक माध्यम आहे. ती काही कुणाची मालकी नाही. आम्ही आता गेल्या ३०-३२ वर्षामध्ये जे हाकारा काढले त्याच्यामधले बेस्ट ऑफ हाकारा असे काही निवडक लेख करून एक पुस्तक छापत आहोत. आणि त्याचा सगळ्यांना उपयोग होईल असा आमचा विश्वास आहे. आज जे जे आदिवासी भागामध्ये एम फील, पीएच डी करणारे विद्यार्थी आहेत, वेगवेगळ्या विषयांचे, ते आज कायम आमच्याकडे हाकाराची मागणी करत असतात. कारण त्यांना तशा प्रकारचे लेक कुठेच सापडत नाहीत. माहिती सापडते, सेन्सेस मध्ये सापडेल, वेगळ्या प्रकारच्या सर्व्हे मध्ये सापडेल. पण त्याच्यात जे विचारपूर्वक लेख आपण लोकांनी केलेले आहेत पूर्वी, तशा प्रकारचे विचार त्यांना सापडत नाहीत. तर हे निमित्त साधून मी आपल्याला थोडस भूतकाळात नेले.

आपले आत्ताचे जे आदिवासी आयुक्त आहेत ते स्वत: आदिवासी आहेत, महाराष्ट्रातील आदिवासी आहेत. तर आम्ही जो ५०० स्वयंसेवकांचा मेळावा नाशिकला घेतला होता दोन महिन्यापूर्वी, आमच्या आदिवासी उत्थान कार्यक्रमात ज्यांनी कार्य केले, जे आदिवासी स्त्री-पुरुष जे १०-२० किलोमीटरच्या पलीकडे कधी आपल्या आयुष्यात गेले नाहीत ते गडचिरोली पासून १००० किलोमीटर पर्यंत मेळाव्याला आले. आणि त्यांनी स्वत: डायसवर येऊन त्यांना आदिवासी उत्थान कार्यक्रमातून काय मिळाले, काय फायदा झाला, काय नाही हे त्यांनी स्वत:च्या तोंडाने सांगितले. त्याला मंत्री पद्माकर वळवी होते. ते आमचे मित्रच आहेत आणि आयुक्तही होते नाशिकचे. त्याच्यामुळे त्यांना खूप इच्छा आहे की, अशा प्रकारचे काम होत राहावे. ते काम महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्याच माध्यमातून होईल असे नाही. कारण एकंदर राज्यभराचे काम एखाद्या संस्थेला देण्याची पद्धत शासनात नसते. हे एक अपवाद म्हणून झाले. आरोळेंचे आणि आमचे आणि ते मुंबई हायकोर्टाच्या आदेशानुसार झाले. पण वेगळ्या-वेगळ्या ज्या संस्था आहेत त्यांनी या संधीचा फायदा जरुर घ्यावा आणि जे काही रचनात्मक कार्य आदिवासी विकास विभागामार्फत होण्यासारखे आहे ते जरूर करावे.

# मा. श्री. देवाजी तोफा

(सामाजिक कार्यकर्ते, मेंढा लेखा, ता. धानोरा, जि. गडचिरोली)



मी कोणी वैज्ञानिक, संशोधक, अभ्यासू किंवा नेता नाही. साधुसंत तर नाहीच नाही. मी एक सामान्य माणूस आहे. शास्त्रीय पद्धतीने मी बोलू शकणार नाही. आदिवासींच्या माहितीसाठी मी एक-एक खिचडी करून बोलणार आहे. गावाचं काम सांगायला लागलो तर लाबंच लांब होईल. मला शॉटकर्टमध्ये बोलता येत नाही. आजचा कार्यक्रम ज्या आदिवासी उत्थान कार्यक्रम आणि महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांनी आयोजित केला आहे, त्यातील उत्थान, मानव विज्ञान यांचे अर्थ कळत नाही. वाचता येतं; पण अर्थ मला कळत नाही. त्यामुळे माझ्या बोलण्यामध्ये चुका होतील, तर तुम्हाला माफ करावा लागेल आणि चर्चाही करावी लागेल.

मी गडचिरोली जिल्हयातून आलो आहे. जंगलामध्ये राहणारे आम्ही आदिवासी लोक. पण लोकं म्हणतात म्हणून आम्ही आदिवासी म्हणतो. मी आदिवासी आहे की कोण आहे, हे मलाच कळत नाही. अनेक शब्दांच्या गावात वर्षांपासून, लहानपणापासून त्या परिसरात आहे. लोकं आम्हाला आदिवासी म्हणतात. मूळ निवासी, गोंड, माडिया, वनवासी म्हणतात. हे सगळं मी ऐकत आलोय. पण खरं कोण आहे, हेच मला कळत नाही. अनेक अर्थांनी आम्हाला संबोधतात. मी सांगेल त्यावर विश्वास ठेवू नका; कारण 'दुसऱ्यावर विसंबला त्याचा कार्यभाग बुडाला' अशा म्हणी लिहून ठेवलेल्या आहेत.

४०-५० वर्षांच्या पूर्वी फुलपँटवाले दिसले की, आम्ही जंगलात पळून जात होतो. मी पळून जाणारा माणूस आहे. पण आता तिकडूनही जंगल संपलं आणि इकडूनही संपलं, पळणार कुठे? थांबावं लागलं, म्हणून संघर्ष करावा लागला. आम्ही का पळून जात होतो, हेच कळत नाही. चांगले कपडे दिसले की पळायचो. मी ऐकून होतो की, हे सुधारलेले लोक आहेत. पुणे-मुंबई, नागपूर इथले लोक सुधारलेले आहेत. सुशिक्षित आहेत. श्रीमंत आहेत, पैसावान आहेत, बुध्दीवान आहेत आणि समजदार आहेत.

आणि आम्ही लोकं स्वत:ला मानतात की नाही, पण हे मागासलेले आहेत असं मी ऐकलेलं आहे. अशिक्षित, अडाणी, गरीब आहेत. हे सगळं त्यांच्यावर लेबल लावलेलं आहे. आणि त्याच्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड पैदा झाला, की खरोखर आम्ही मागासलेलं आहोत ? आणि त्यांना सुधरवण्यासाठी अनेक लोक त्या गावामध्ये आलेले आहेत. शासनसुध्दा पोचलेलं आहे, संस्थांचे लोक पोचलेले आहेत. वेगवेगळया आदिवासींकडे वेगवेगळे लोक आलेले आहेत. काही लोक व्यापारी म्हणून घुसले. पण आदिवासींची कमजोरी पाहून त्यांचे शोषणच होत गेलेले आहे, असं सांगण्यात येत आहे, आणि होतंही आहे असंही दिसते. पण हे शोषण कोण करतो आणि कोण शोषण करायला लावतो हे समजून घेतलं पाहिजे. आम्ही त्या परिसरात काही विचारवंत लोकांबरोबर राहतो, ते मी समजून घेतलं आहे.

आदिवासींची संस्कृती, त्यांची न्यायव्यवस्था आणि त्यांची जीवन जगण्याची पद्धती ही परंपरेने आलेली आहे. ती कागदामध्ये लिखीत नाही. ती डायरेक्टच त्यांच्या जीवन जगण्यामध्ये, संस्कृतीमध्ये आहे. आदिवासींच्या परंपरेमध्ये सामुदायिक पद्धती पूर्वीपासून आहे. हे

सामुदायिक काम आहे, कोणी सांगितलं? ही सामुदायिक पद्धती कशी निर्माण केली? तिचे नियम कसे लावले? जंगलाचे नियम, प्राण्याचे नियम, न्याय कसा लावावा, हे कोणत्या विद्यापीठामध्ये त्या लोकांनी शिक्षण घेतलं? कोणत्या गुरूनी सांगितलं? या गोष्टी त्यांच्या विचारामध्ये, परंपरेमध्ये, जीवन जगण्यामध्ये दिसतात. ही सामुदायिक व्यवस्था तिथे पाहायला मिळते. तुम्ही आदिवासींना ''**सांगा**'' म्हटले की, कोणी सांगणार नाही. एकदम आतमध्ये निघून जातात. तुमच्यासमोर येणार नाहीत. जेव्हा ते बोलतात, तेव्हा त्याच्यातून लक्षात येते की, ते काय बोलतात आणि कसं काम करतात. वेगवेगळया प्रदेशातल्या वेगवेगळया आदिवासींमध्ये हे अनुभव येतात. आता इथं वैदू लोकांचं नाव निघाले. आमच्याकडे वैदूंना त्यांची माहिती सांगा म्हटले, तर ते म्हणतील ''**नाय, नाय हे चोरी करण्यासाठी आले आहेत**'', असा काही समज आहे तिथे.

दारू हा आदिवासींच्या जीवनामधला महत्त्वाचा भाग. विशेष कार्यक्रमामध्ये दारूचे महत्व आहे. दारूलाही त्यांनी पद्धतशीरपणे नियम लावलेले आहेत. कोणता कार्यक्रम घ्यायचा, कोणी प्यायचे ? कसं प्यायचे ? ही शिस्त त्यांचेमध्ये आहे. पण त्याला कोणीही मानत नाही. आणि आता ती पूर्ण विस्कळीत झालेली आहे. सरकारी दारू आल्यामुळे तर आणखीनच धोका वाढला आहे. आता दारू ही आदिवासींचे शोषण करण्यासाठी सोपी कल्पना आहे. तो एक व्यवसाय झाला आहे.

त्याचा अभ्यास केला तर हे समजेल की, दारू त्यांना खरोखर लागते का? मग हे कोणी ठरवलं, कोणी निर्णय घेतला ? हे कोणी काही सांगत नाही. पण दारू मात्र लागतेच. त्यात दारू देवाला वाहतात एक नैवेद्य म्हणून. पण त्याची माहिती घेतली तर कळते की, देवाला काही लागत नाही. पण हे पारंपरिक व्यवस्था आहे ती टिकवून ठेवलेली आहे. त्याच्यात भावना, श्रध्दा आहे. त्याच्यातही मोहाच्या झाडाला अधिक महत्व देतात. मोहाची फुले सुद्धा देवाला वाहतात. फुले नाही मिळाली तर झाडाची साल देखील चालते. पण प्रत्यक्ष दारूच चालते, असं काही कुठे लिहिलेले नाही. पण पारंपरिक व्यवस्थेत ते टिकवून ठेवलेलं आहे. आता काही लोकांनी मान्य केले आहे की, हे लागत नाही. पण मानसिकता बदलत नाही. दुसरं एक वैशिष्टय की ते दारू पिऊन भांडणं करतील, पण आपल्या समाजामध्ये निपटारा करतील. त्यांच्या सामाजिक पातळीवर दंड वगैरे घेत असतील. कोंबडी, दारू घेतील, पण जेवढी लोकं बसलेली असतील तेवढी त्याचा हिसाब-किताब ठेवतील. शिल्लक ठेवायचं नाही, कारण ऑडिटचा प्रश्न येतो. तिथे भांडणे होणार नाहीत. पोलिस स्टेशनात जाणार नाहीत.

माझ्या बोलण्यातून हे लक्षात येईल की, आदिवासी स्वयंशासन, वन अधिकार कायदा, स्वराज्य व्यवस्था, स्वतंत्रतेकडे जात आहे. म्हणून त्यांच्या व्यवस्थेकडे लक्ष देणे जरूरी आहे. त्यांच्या जीवन जगण्याच्या पद्धतीकडे. पण महिलांना काही ठिकाणी बाजूला ठेवलेलं आहे. माझ्या पाहण्यात आहे. त्यांना जर सहभागी केले तर वाईट गोष्टी घडणार नाहीत, हे आमच्या अभ्यासातून लक्षात आलेलं आहे. आणि हा अभ्यास गट महत्त्वाचा आहे. हे अभ्यास गट सर्व गावात आहे; पण त्याची ओळख झाली पाहिजे. आज मोहन भाई, डॉ. सतीश गोगुलवार, अभय बंग असे मोठमोठया लोकांचे अभ्यासगट आहेत. लोकांसमोर चर्चा झाली पाहिजे. या चर्चेतून लक्षात येते की, एकमेकांच्या अनुभवातून शिकणे महत्त्वाचे आहे. आता शासनाच्या ग्रामसभांतून सर्व सहमतीने निर्णय घेणे सुरू आहे. सर्व सहमती म्हणजे एकही माणूस विरोधक नको. त्याच्यातून अनेक जण अनेक प्रश्न विचारतात.

पण सर्वसंमती नवरा-बायकोची होत नाही, तर गावाची कशी होणार? म्हणूनच आम्ही ठरवले की, जिथे होत नाही असेच काम हाती घ्यायचे. जे होत आहे ते कोणीही करील. म्हणून एखादे काम होत आहे की नाही, ते करून बघायचे. मराठीत म्हण आहे की, 'केल्याने

होत आहे रे आधी केलेचि पाहिजे.' करून बघायचं, झाले तर झाले, नाही झाले तर काही नुकसान होणार नाही. नाही झाले तर पुन्हा करण्यासाठी अडचणी भरपूर आहेत. पण अडचणी आम्हाला रोखू शकत नाहीत. उलट अडचणी पुढे जाण्याची संधी आहे. जास्तीत जास्त अडचणी येऊ द्यात, तरच ही माणसं एकत्र येतील, बसतील. अडचण नाही आली तर कोणीच घरातून बाहेर निघत नाहीत. म्हणजे गरजेतून लोकं एकत्र येतात. म्हणून हा अभ्यासगट महत्त्वाचा आहे. दुसरं ग्रामसभेबद्दल मी सांगत होतो. ग्रामसभेमध्ये डायरेक्ट निर्णयामध्ये महिला-पुरूष येतात. दिल्ली-मुंबईमध्ये आहे ते इनडायरेक्ट आहे. त्याच्या घोषणा देखील आम्ही सगळयांनी मिळून केलेल्या होत्या की,''दिल्ली-मुंबईत आमचे सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार.''

जल, जंगल, जमीन यावर गावाचा समाजाचा अधिकार असा त्याचा एक मुद्दा होता. दिल्ली-मुंबईत आम्ही आमचे प्रतिनिधी पाठवतो. ते पैसा, अधिकार आमच्यापर्यंत पोहोचवतात. आम्ही आमच्या गावाचे कसे नियोजन करायचे ते निर्णय घेऊ. त्यात सगळया लोकांचा सहभाग असेल. आम्ही हे करून बघितलं तर त्याला यश येत गेलं. होत गेलं आणि आदिवासींचे हे वेगळेपण समजून घ्यावं लागेल. आदिवासींना सांगावं लागेल की आम्ही करणार आहोत. आता कायदा झालेला आहे, वन अधिकाराचा कायदा, पण आदिवासींना किती झाला फायदा. तीन वर्षे झाली, पण त्याचं काहीच झालेलं नाही. कारण जागृती झालेली नाही. तेच कारण फक्त महत्त्वाचं आहे. पण काही लोकांना भीती वाटते की, गावाची सत्ता गावाच्या हातात गेली तर आमचं काय? प्रतिनिधींना, मंत्री-संत्रीनाही हे वाटत आहे. पण भीती वाटण्याचे कारण नाही.

या महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचं काम आमच्या एटापल्ली भागात चालू आहे. तिथे गोंड, माडिया लोक आहेत. पण हे स्वत:ला गोंड, माडिया मानत नाही. 'कोया' म्हणतात. कोया, कोयतूर अगदी लंगोटी लावलेल्या म्हाताऱ्याला विचारले की, तू कोण आहे, तुझी जात कोणती आहे, तर माहिती नाही, तुझा धर्म कोणता माहीत नाही; पण तू कोण आहे तर 'मी कोया' सांगतो. कोयाचा अर्थ 'मी माणूस' आहे. असा होतो. तिथं जातीचा, धर्माचा काही संबंध नाही.

माणूस जन्मल्यानंतर त्याचा जमिनीवर हक्क आहे. त्याला जगण्यासाठी मागण्याची गरज नाही. पण भारतीय घटनेने मानवाला दिलेले अन्न, वस्त्र, निवारा हे मूलभूत अधिकार, समानतेने देण्याची जबाबदारी आता सरकारची आहे. पण आमचे आदिवासींचे काय? घरात राहणे सगळे मान्य. पण आदिवासींची व्यवस्था तशी नाही. म्हणून त्यांना तुम्ही इंजिन द्या, विहीर द्या. कितीही तुम्ही द्या. अगदी पैशाची गंगा वाहू द्या. शेळया-मेंढया द्या. घर, गोटूल द्या. त्याचा कशाचा उपयोग त्याला नाही. कारण ही व्यवस्था त्यांची नाही. स्वावलंबन, शांतता, स्वातंत्र्य आणि प्रेम त्यांचेमध्ये आहे. समुहाने राहणे. आदिवासींमध्ये ही प्राकृतिक संसाधने व्यक्तिगत नाहीत. बाहेरून लादलेली व्यवस्था त्यांना मान्य नाही. ही जमीन निसर्गाने तयार केलेली आहे. तिच्यावर समान अधिकार आहे. मग प्रश्न पडतो की, या आदिवासींना कोणत्या प्रकारे सुधरावयाचे? सुधरावणारे कदाचित सुधरतील, पण आदिवासींना नाही. त्यांचाच विकास होईल पण आदिवासींचा नाही.

विकास म्हणजे काय? व्याख्या काय आहे विकासाची? आता कपडयामध्ये तर सुधारणा झाली. पण हा विकास नाही. तो माणूस बनत आहे का? त्यांना माणूस बनण्याचे शिक्षण देणे गरजेचे आहे. तसेच त्यांच्याकडून शिकणेही आवश्यक आहे. त्यांची परंपरागत व्यवस्था जंगलवाट आधारित आहे. जंगल ही एक आई आहे, जीवन आहे, पर्यावरणाचे रक्षण त्यांना शिकवण्याची गरज नाही. पण आता मात्र त्यांचेही पर्यावरण प्रदूषित झाले आहे. आणि त्यांची जंगलं, जमीन ते मानतात की

नाही तेही बघणे जरूरीचे आहे. आता तर जंगलच नष्ट होत चाललेले आहे. लोकांना भीती वाटू लागली आहे की, हे जंगल नष्ट झाल्यावर आपण जगू की नाही. खूप लोकं असे आहेत, पण मोजके आहेत, त्यांच्यापर्यंत पोचण्यासाठी.

आता जो कायदा आलेला आहे, तो केवळ आदिवासींच्यासाठी नाही, तर गैर आदिवासींसाठी सुद्धा चांगला कायदा आहे. वन अधिकार कायदा आणि पेसा कायदा सुद्धा. पेसा कायद्याचे बद्दल मी एवढे सांगणार नाही, कारण मी तेवढा अभ्यास केलेला नाही. पण हा वनअधिकार कायदा हा जनाधिकार कायदा आहे. म्हणून आम्ही मंत्री महोदयांना सांगितले आहे की, डायरेक्ट दिल्ली टू गल्ली आणि गल्ली टू दिल्ली. मधले दलाल आम्हाला नको. माननीय जयराम रमेश यांनी आम्हाला एक प्रश्न विचारला होता की, 'डायरेक्ट दिल्ली टू गल्ली मायनस मुंबई', तर मायनस मुंबई नाही. दिल्ली मुंबई आमचेच सरकार, आमच्या गावात आम्हीच सरकार' दोन्ही सरकारने डायरेक्ट गल्लीला यायचं आणि जंगल, तिथलं जमीन, त्याचे नियोजन, त्याचं व्यवस्थापन, संरक्षण, वापर समदं गावात झालं पाहिजे.

हा कायदा मेंढालेखा एका गावाला झालेला नाही, तर जम्मू-काश्मीर सोडून संपूर्ण भारतात हा कायदा झालेला आहे. आणि तो कार्यक्रम चालू आहे. पण ही बीमारी लवकर दुरूस्त होणार नाही. हळूहळू इलाज चालू राहील. लोकशाही लवकर रूजणारी गोष्ट नाही. हुकुमशाही रूजेल तात्पुरती. युरिया खत टाकले तर लवकर हिरवागार दिसेल, पण एकदा रूजला की मागे हटणारा नाही. म्हणून या लोकशाहीमध्ये लोकसहभागातून होणे गरजेचे आहे. गडचिरोलीतल्या ८०० गावांमध्ये वनहक्क कायद्याचे दावे दाखल आहेत. सामुदायिक हक्क जास्त महत्त्वाचे आहेत, पण व्यक्तिगतकडे अधिकारी आणि लोकंही जास्त वळू लागलेत. जर सामुदायिक हक्क लोकांनी हातात घेतले नाहीत, तर या जंगल जमिनी आदिवासींच्या राहणार नाहीत. म्हणून आम्ही १९६४ च्या ग्रामदानी कायद्याच्या आधारावर जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोचलो आहोत. सामुदायिक अधिकार जर गावांना मिळाला तर आदिवासींच्या जमिनी व्यक्तिगत राहणार नाहीत, गावाच्या नावावर राहतील आणि बाहेरची व्यक्ती सरळ व्यक्तिगत माणसाकडे घुसणार नाही.

आमच्या गावात आम्हीच सरकारमध्ये 'ग्रामसभा' सुप्रीम राहणार आहे. यावर राष्ट्रपती, पंतप्रधान नाही. कारण ते निवडलेले असतात. ग्रामसभा स्वयंभू आहे. तिला कोणीही निवडून दिलेले नाही, म्हणून सुप्रीम आहे. बाकीचे लोक मग अभ्यासगटाला मदत करतील आणि जे निर्णय घेतील ते अभ्यासपूर्ण घेतील. ग्रामसभेला ग्रामसेवक, कृषी अधिकारी, पटवारी सगळेच लोक आले पाहिजेत. एकाच ठिकाणी सर्वांना माहिती मिळाली पाहिजे. सातबारा सुद्धा त्या सभेत मिळाला पाहिजे. आदिवासींना जंगलाचे रस्ते माहीत आहेत, पण पटवाऱ्याचे ऑफीस कुठे ते माहित नाही. दोन्हींमध्ये समन्वय असला पाहिजे.

या अधिकाऱ्यांमध्येही सगळे चांगले नसतात. म्हणूनच शासन आणि शोषण यात काही फरक नाही. यात आदिवासींचे बरेच शोषण होते. स्वयंशासनाकडे जाताना सगळे लोक आले पाहिजेत, तर सगळयांचं चांगलं होतं. हे काल्पनिक नाही. ग्रामसभा म्हणजे परमेश्वराचं ठिकाण असतं. तिथं खोटंच बोलता येत नाही. कारण लोक विचार करतात की, आपल्या बोलण्याचा अर्थ चुकीचा निघायला नको. म्हणून ग्रामसभा हा जनाधिकार कायद्यात महत्त्वाचा अधिकार आहे. आणि स्वयंशासनाच्या 'पेसा' कायद्यामध्ये देखील ग्रामसभेला जास्त महत्त्व दिलेलं आहे. पण ही ग्रामपंचायत नाही. सामाजिक पोड, मोहल्ला, पाडा, टोला याला हे अधिकार दिलेत. कारण सत्तेचं विकेंद्रीकरण झाल्यामुळे छोटया-छोटया वार्डांमध्ये निर्णयांचे अधिकार आले. विकासाचे नियोजन ते करतील, पण बाहेरून लादून काही होणार

नाही. आयते जर करून दिले तर लोकांची मानसिकता गुलामीकडे वळते. मानसिकता बदलण्याची गरज आहे, ती गावकऱ्यांची बदलावी लागेल. अधिकाऱ्यांची, मंत्र्यांची देखील बदलावी लागेल.

वनाधिकार कायद्यामध्ये शासन आणि संस्थांच्या लोकांनी सांगितले की, प्रथम तुम्ही वनाच्या व्यवस्थापनाकडे जा. वनसंरक्षण समिती स्थापन करून व्यवस्थापन करा. पण वनाकडे जात असताना जनाकडे आणि मनाकडे पाहणे गरजेचे आहे. म्हणून पहिलं व्यवस्थापन मग जन आणि नंतर वनव्यवस्थापन. बरेच वेळा अधिकार त्रास देतात असं म्हटलं जातं. पण मन, जन आणि वनाची परिस्थिती चांगली राहिली तर अधिकारी त्रास देणार नाहीत. गावात सुद्धा विरोधक असतात. पण ते विरोध करतात म्हणून विरोधक नाहीत. त्यांच्यावर सुद्धा प्रेम करण्याची गरज आहे. तो तुमचा शत्रू नाही. खरा मित्रच आहे. कारण 'हो' ला 'हो' म्हणणारे एकाच विचाराचे, एकाच समाजाचे असतील ते पुढे जात असताना 'खड्डा' आला तरी काहीच विचार न करता त्यात पडतील व दुसऱ्याला देखील पाडतील. म्हणून विरोधातूनच विकास साधता येईल.

मेंढा गावामध्ये खूप विकास झाला आहे, असे नाही. समदे खूप सुधारलेले, शिकलेले आहेत, असंही समजू नका. तिथले सगळे लोक साधुसंत किंवा देवासारखे वागतात, असंही समजू नका. जगामध्ये जेवढया समस्या आहेत, तेवढया त्या लहानशा मेंढालेखा मध्ये आहेत. पण अडचणी आल्यावर त्या कोणत्या पद्धतीने सोडवायच्या हे गमक त्यांना कळलेलं आहे. दुसरे असे की केवळ पुरूष बसून गावाचे प्रश्न सुटणार नाहीत, महिला बसल्याशिवाय गावाचं काम होणार नाही. त्या बोलणार नाहीत, पण कामामध्ये पटाईत. मेंढालेखामध्ये महिलांचा पराक्रम आहे. पुरूष लोकांचं कसं आहे की, येतील, बसतील, चर्चा करतील, काही लोकं काहीच बोलणार नाही. आणि काही समस्या सांगितल्या तर ते तुम्हाला दुसऱ्याच मुद्दयाकडे घेऊन जातील. गप्प बसलेले सभा संपल्यावर 'मी बोलणार होतो, 'पण' असे म्हणून लोकांना तुकडया-तुकडयात विभागतील. त्यांचेकडून काम होणार नाही. पण महिलांमध्ये असं नाही. एकदा महिलांनी निर्णय घेतला की, त्या मागे हटत नाहीत. महिला बोलत नाहीत, कारण त्यांच्यावर पुरूष प्रधानतेचं दडपण आहे. महिला सुद्धा माणूस आहे. त्यांना माणसासारखं वागवलं पाहिजे. आदिवासींमध्ये काही दोष आहेत. पण जे चांगलं आहे ते घेणे, वाईट सोडून देणे आणि नवीनमधून शोधण्याचा प्रयत्न करायला पाहिजे.

या सर्व गोष्टींचा अभ्यास केल्यामुळे लोकशिक्षण होते. आणि लोकशिक्षणातूनच काम उभे राहते. समन्वयातून चांगले काम होऊ शकते.

या अंकातील ज्या मान्यवरांच्या लेखांचे शब्दांकन केले आहे, ते मान्यवर व शब्दांकन कर्ते खालीलप्रमाणे -

**श्री. प्रशांत कुलकर्णी** (शब्दांकन कर्ते)

*मान्यवर*
१) श्री. बाळकृष्ण रेणके
२) श्री. मोहन हिराबाई हिराराल
३) श्री. वाहरु सोनवणे
४) डॉ. मिलिंद बोकील

**श्री. अभिजित भालेराव** (शब्दांकन कर्ते)

*मान्यवर*
१) श्री. देवाजी तोफा
२) प्रा. रा. के. मुटाटकर
३) श्री. सुनिल कुमरे
४) श्री. कुंडलिक केदारी

**कु. आरती वाघमारे** (शब्दांकन कर्ते)

*मान्यवर*
१) डॉ. पंडित विद्यासागर
२) ॲड. सुरेखा दळवी
३) श्रीमती उल्का महाजन

## मा. श्री. बाळकृष्ण रेणके

(माजी अध्यक्ष, भटक्या विमुक्त जाती-जमाती आयोग)



मुटाटकर सरांनी सांगितल्याप्रमाणे हाकारा भटक्या विमुक्त जातीच्या प्रश्नांना उठवण्यासाठी तत्पर आहे. मानव विज्ञान परिषदेचे लोकही भटक्या विमुक्त जातीच्या लोकांच्या प्रश्नांबद्दल गंभीर आहेत. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या कार्यकर्त्यांचं योगदान या ठिकाणी घेतलं आहे. तुम्हा लोकांचे आम्ही आभार मानले आहेत. ही अंतरिक जवळीक आहे. देवाजी तोफा भाषणात म्हणाले की, 'मला शास्त्र माहीत नाही मी बोलू शकणार नाही.' मी म्हणेन, 'देवाजी तुम्ही स्वत:चं स्वतंत्र एक शास्त्र स्थापन केलं आहे.' 'आदिवासी विकास धोरण स्वरूप आणि दिशा' या कार्यक्रमात भटक्या विमुक्त जातींबद्दल काही बोलावं या अपेक्षेने तुम्ही मला बोलावलंत.

या घडीला भटक्या जमातीला आपलसं करणारा एक मोठा भाऊ मिळाला म्हणून आम्हाला आनंद वाटतो. हीच भावकी आपण चळवळीच्या रुपामध्ये एकत्र येऊन टिकवू या. जिथे जिथे संघर्ष करायचा आहे. मग तो भटक्या विमुक्तांचा असेल, आदिवासीसाठी असेल, मानवतेच्या प्रस्थापनासाठी असेल. वेगवेगळे भाग न ठेवता सगळे मिळून माणुसकीचं, माणसाला माणसासारखं जगता आलं पाहिजे, यासाठी आपण ती भावकी मजबूत करून चळवळ चालवू या. हे आपण एकमेकांच्या सहकार्याने करु या असं वचन मी देतो.

भटक्या विमुक्तांच्या बाबतीत काही गोष्टी या सेमिनारच्या अहवालात याव्यात, सरकारपर्यंत पोहोचाव्यात. कारण तुमच्या आवाजाला सरकारी दरबारी किंमत आहे. भटक्या विमुक्त जमाती ह्या तशा देशभर विखुरलेल्या आहेत. नॉर्थ ईस्ट सोडला, कारण त्या शेड्यूल आहेत. एक गोष्ट प्रकर्षाने मी इथं स्पष्ट करू इच्छितो व त्या अनुषंगाने आपण विचार करावा. अहवाल सादर केल्यानंतर या अहवालावर काम, अभ्यास करून शिफारसी करण्यासाठी National Advisory कडे हा अहवाल पाठवण्यात आला होता. ही राष्ट्रीय सल्लागार परिषद आहे आणि ह्याच्या अध्यक्ष आहेत सोनिया गांधी. तो ६०० पानांचा अहवाल वाचायला वेळ कोणाला आहे, म्हणून त्यांनी एक गट नेमला. त्याचा सार काढून आमच्यासमोर ठेवा. त्या अभ्यास गटाचं अध्यक्ष होते नरेंद्र जाधव. त्याचे सभासद होते अरुणा रॉय आणि गोडबोले. या चार जणांचा तो गट.

त्यांच्या चार मीटिंग झाल्या, त्यापैकी तीनांना मी हजर होतो. सगळी चर्चा झाली. नंतर काय शिफारस झाली ते सांगतो. एक नॅशनल सेमिनार घेण्यात आला. सर्व राज्यांच्या प्रिन्सिपल सेक्रेटरींना बोलावण्यात आलं. वेगवेगळ्या राज्यात काम करणाऱ्या एन.जी.ओ.चे प्रतिनिधींना बोलावलं. त्याचं उद्घाटन माझ्या हस्ते झालं. सेमिनारच्या समारोपाचे भाषण संगीता गोयराला या भारत सरकारच्या प्रिन्सिपल सेक्रेटरीने केलं. त्यांनी सांगितले की या दिवसभराच्या सेमिनारने आयोगाच्या अहवालावर शिक्कामोर्तब झालं आहे. दुर्दैवाने या सेमिनारला अरुणा रॉय व गोडबोले उपस्थित राहू शकले नाही. हर्षनंदा राणी, नरेंद्र जाधव उपस्थित होते. या सगळ्या मंथनातून

अहवाल झाला आणि शिफारस केली गेली ती अशी, भारतातल्या जवळपास २०० डीनोटीफाइड कम्युनिटी, सुमारे २०० विमुक्त जातींची कायदेशीर यादी करुन विकासाच्या बाकीच्या शिफारसी स्वीकारल्या जाव्यात. आयोगाने सर्व राज्य सरकारांबरोबर चर्चा करून, अभ्यास करून, त्यांच्या संमतीने सुमारे ७५० भटक्या विमुक्त जमातींची यादी सरकारला दिली आहे. त्यांच्या पोटजातींसह १६२० जाती होत्या. या ७५० जमातींना बाजूला ठेवून त्यांनी फक्त २०० जमातींची शिफारस केली आहे. बाकीच्यांना वाऱ्यावर सोडून दिलं आहे. ६०० पानांचा अहवाल वाचायला ज्यांना वेळ नाही त्यांनी ती आंधळेपणाने स्वीकारली.

सोनिया गांधींची शिफारस आहे म्हणून ती टाळायची कशी, या भूमिकेतून सरकारने ते समजा स्वीकारलं, तर या ज्या भटक्या जमाती आहेत कडकलक्ष्मी, नंदी वाले, दोरीवर चालणारे, मदारी या सगळ्यांवर अन्याय होणार. हा अन्याय दुर्लक्ष करून होते का, अभ्यास कमी म्हणून होतो का, पक्षपातीपणामुळे होतो का, तिथं भटक्या जातींबद्दल ब्राह्मण्य जपणारी मंडळी आहेत, म्हणून होतं. हे असं होतं म्हणून याद्वारे अशी शिफारस करण्यात यावी की, कमिशनने शिफारस केलेल्या यादींवर नीटपणे अभ्यास करून, तपासून, ज्यांना जगण्याचा अधिकार नाही, ज्यांना अंथरायला जमीन आणि पांघरायला आकाश अशा अवस्थेत आज माणसाचं जीवन जगू शकत नाही, अशा लोकांना डावलू नये. अशा प्रकारचा एक विचार सरकारपुढे ठेवण्याची गरज आहे. ही पंतप्रधानांना, सोनिया गांधीना कळविण्याची गरज आहे.

दुसरा विषय जो लक्षात येतो. आदिवासींच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर विस्थापन होतं. माझ्या अभ्यासाप्रमाणे ३,००,०००/- कुटुंबांचं विस्थापन झालेलं आहे. देवाजी तोफांनी जे सांगितलं, जगण्यात स्वावलंबीपणा, सन्मानाने जगायचं, त्यांच्या परंपरा, संस्कृती जिवंत ठेवून त्यांचं संगोपन होऊन जगता आलं पाहिजे. या दृष्टीकोनातून गावाची रचना झाली पाहिजे. त्यावर विचार झाला पाहिजे. मला हा विचार मांडताना विनोबा भावेंची आठवण येते. त्यांनी घराच्या बाबतीत सांगितलं होतं, 'माणसाला जमिनीपासून अलग करणे म्हणजे झाडं जमिनीपासून उपटून टाकणे असं आहे.' त्यांनी अमेरिकेचं उदाहरण दिलं होतं. त्यावेळेस अमेरिकेमध्ये दर दहा माणसांमागे एक माणूस मनोपरुग्ण आहे. आताच्या परिस्थितीत अजून जास्त असेल. त्याचं कारण आहे की, माणसं जमिनीपासून अलग केली जातात.

जमीन आणि माणसाचा संबंध राहिला तर त्यांना पर्यावरण संतुलनाचं काम होतं, त्यांना स्वच्छ हवा मिळते, स्वच्छंदीपणाने जगू शकतात. म्हणून किमान प्रत्येक कुटुंबाला पाव एकर जमीन मिळाली पाहिजे. अशा तऱ्हेने गावाची रचना झाली पाहिजे. गांधी आणि विनोबा भावे आता नुसते नाव घेण्यापुरते आहेत. गांधी म्हणतात 'तुमच्या मागे कोण-कोण आहेत', पण माझ्या मागे फक्त सरकारी भिंतच आहे. आजच्या परिस्थितीमध्ये पाव एकर नाही तर नाही पण जगण्यासाठी त्याला घर असावं, असं घर असावं, की पाहुणे आले की झोपण्यासाठी जागा, घरात नवरा-बायको, सासू-सासरे, त्यांना वेगळी जागा. मुलांना अभ्यास करायला जागा असावी. शेळी, कोंबड्या पाळायला जागा असावी. सरपण ठेवायला जागा असावी, फुलझाडे लावायची जागा असावी.

चांगल्या पद्धतीने जगायला घर मिळावं, इंदिरा आवास योजनेच्या ज्या योजना राबवलेल्या आहेत त्या योजनेतल्या ७०% घरांवर छत नाही. पुष्कळशा घरांना खिडक्या व दारं सुद्धा नाहीत. निपाणीमध्ये इंदिरा आवास ची घरं बांधली होती. त्यात भटक्या विमुक्तांची माणसं जरा जास्त होती. त्या योजनेचं उद्घाटन करायचं होतं आणि कर्नाटक मधल्या त्या खात्याच्या मंत्र्याला बोलावलं होतं. मलाही बोलावलं होतं. रात्री मुक्कामाला गेलो. दुर्दैवाने किंवा सुदैवाने म्हणा, त्या रात्री मोठा पाऊस आला अवकाळी. सकाळी १० वाजता उद्घाटनाचा

कार्यक्रम, एकही घर जमिनीवर नव्हतं, सगळ्या विटा जमिनीवर विरघळून जमीनदोस्त झालेल्या होत्या. कार्यक्रमाचं उद्घाटन होताच मंत्री परत गेले आणि आम्ही परत आलो.

सुदैवाने यासाठी म्हटलं की, उद्घाटन झाल्यावर लोकं राहायला गेले असते आणि पाऊस आला असता तर घोळ झाला असता. दुसरी अडचण, ज्याठिकाणी थोडेबहुत स्वत:च्या खिशातले पैसे घालून लोकांनी घरं नीट दुरुस्त केली, खिडक्या दारं आहेत, छत तयार होतं त्याचं नाव बी.पी.एल. लिस्ट मधून काढून टाकण्यात येतं. पक्कं घर आहे, लाईट आहे. पुन्हा या माणसाला विकासाची काही संधीच नाही. म्हणून जी जमीन आहे घरं बांधण्यासाठी, महाराष्ट्रात यशवंतराव चव्हाण पालमुक्त योजना म्हणून काढलेली आहे. पूर्वी ४०,०००/- रूपये होते या कामासाठी ते म्हणाले इंदिरा आवास सारखं बांधूया. त्याच्याप्रमाणे ७०,०००/- रुपये करु या. योजनेसाठी निकष ठरवले की दरसाल प्रत्येक जिल्ह्यात २० घरं बांधायची. ही योजना येण्यासाठी आम्ही भांडत होतो, कमिशनचा भाग होता.

आता नीट होणार असं वाटलं म्हणून आम्ही लोकांना संघटीत करायला सुरुवात केली. यवतमाळला खरोखर फिरत असलेल्या ८०० कुटुंबामध्ये जागृती करून संघटन केलं आणि आर्णी गावामध्ये त्यांना वसवलं. ग्रामपंचायत, जिल्हा पंचायत सगळ्यांना बोलावून त्यांना जागा मिळवून दिली. त्यांना जिल्हा परिषदेने मंजुरी दिली. एका गुंठ्यात एक पाल बसवलं. आम्ही आशा दाखवली. जिल्हा परिषदेने रोड तयार करुन दिले, विजेचे खांब रोऊन वीज दिली, पालात वीज दिली. एन.जी.ओ. आणि जिल्हा परिषद यांनी मिळून बोअर घेतली. पिण्याच्या पाण्यासाठी घरासाठी सरकार म्हणताय की वर्षाला २० घरं देऊ. आमचं काम सगळं थांबलं. आम्ही जागरूक करून सगळ्यांना एकत्र आणलं. हे २० द्यायला लागले आणि आम्ही २०,०००/- जमा केले तर कस व्हायचं? हा जगण्याच्या अधिकाराचा प्रश्न आहे. आम्ही ही भाषणं ऐकून म्हातारे झालो. एका रात्रीतून विकास होणार नाही, सबुरीनं घ्या. असं ऐकत ऐकत आम्ही ६५ वर्षे घालवली.

आता आम्हाला तातडीनं माणूस म्हणून जगण्याचा अधिकार पाहिजे. त्यामध्ये आम्हाला पक्कं घर पाहिजे. भारताचा विकास एक मिनिटं किंवा पाच मिनिटं थांबला तरी हरकत नाही. पण जे जनावरासारखे जगतात त्यांना आसरा देणं हे भारताचे कर्तव्य आहे. हे लोकांना पटविणे, पण राजकर्त्यांना कसं पटवायचं. आम्ही हरतऱ्हेने प्रेशर आणायचा प्रयत्न केला, त्याला फळ अंशत: मिळालं. पंचवार्षिक योजनेत अकौंट खोललं गेलं. २००९-१० वर्षात १३ कोटी रुपये मंजूर झाले. आम्ही हिशेब काढला, वर्षाला ७५ पैसे दरडोई. पुढच्या वर्षी भांडून पुन्हा, १० कोटींचे १०० कोटी होतील. आता त्या वर्षाचा अहवाल सर्वांसाठी उपलब्ध आहे. सामाजिक न्याय विभागाचा जो अहवाल आहे त्या अहवालाच्या ४३ नंबर पानावर लिहिलेलं आहे की भटक्या विमुक्तांच्या विकासासाठी १० कोटी रुपये राखून ठेवले होते. त्यातील एक लाख रुपये त्या वर्षात खर्च झाले आणि उरलेले ९ कोटी ९९ लाख रुपये हे परत सरकार जमा झालेले आहे. हीच अवस्था तेरा हजार कोटींची झाली तर. यासाठी सगळ्यांनी मिळून काहीतरी मार्ग काढला पाहिजे. ठेवलेल्या पैशांचा पुरेपूर लाभ गरजू लोकांना झाला पाहिजे. हे बंधन घालण्याबाबत आपल्याला सरकारबरोबर बोलावं लागेल.

आज त्यांच्या जीवनधाराचा प्रश्न आहे. वर्ल्ड बँकेचा अहवाल काय सांगतो ? २०१० च्या प्लॅनिंग कमिशन चा रिपोर्ट काय सांगतो. वर्ल्ड बँकेचा रिपोर्ट म्हणतो, आतातर्यंत भारतामध्ये जमिनीचे फेरवाटप जे झालं आहे ते ३% आहे. आणखीन distribution जर ५% झालं तर दारिद्र्य रेषेखालच्या ३०% लोकांचं दारिद्र्य नष्ट होण्याची शक्यता आहे. जर ती जमीन नीटपणे वापरता आली तर! त्यात पुढे, थायलंड, चीनला कशी distribute झाली, आणि त्यांचं दारिद्र्य कसं नष्ट झालं आहे

त्याचा अहवाल देऊन भारताला सल्ला दिला आहे. त्यांचा गांधी म्हणजे वर्ल्ड बँक. प्लँनिंग कमिशनचा रिपोर्ट म्हणतो, प्लॅनिंग कमिशनचा रिपोर्ट तयार होतो, त्यातील सगळे मेंबर, व्हाईस चेअरमनकडे जातो, तो मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे जातो. मंत्रिमंडळामध्ये चर्चा होते, सही होते, त्यानंतर देशाच्या National Development Committee म्हणजे प्रत्येक राज्याचा मुख्यमंत्री तिथं त्या मिटींगला येतो. त्यात त्यावर शिक्कामोर्तब होतं. मग ते लोकांना उपलब्ध होतो. त्यात असं म्हटलंय की २००९ पासून भारत सरकारने जमिनीचं फेरवाटप करण्याकडे दुर्लक्ष केलंय. त्यामुळे दारिद्र्य निर्मूलनाचा रेट कमी झाला आहे. जीवनधार निर्माण करण्याची ताकत, देशातील गरीब माणसाची अवस्था, याचा विचार केला तर शेती हे जीवनाधार निर्माण करण्याचं प्रभावी साधन आहे. प्रश्न येतो की जमीनच कमी आहे. जमिनीच्या काही कमिट्या बसवल्यात. अजून एखादी बसवा व बघा की किती जमीन आहे. देवस्थानकडे जमीन किती आहे, या मोठ-मोठ्या कंपन्याची गरज किती आहे व किती शिल्लक आहे. त्यांना गरज आहे शंकर एकरची आणि त्यांच्याकडे असते हजार एकर. इकडे माणसे मरताहेत किडा-मुंगीसारखी. का नाही कायदा करता येत की पाच वर्षांपेक्षा जास्त दिवस जमीन पडून राहिली तर सरकार जमा होईल व आदिवासींना वाटण्यात येईल.

प्लॅनिंगसाठी आपल्याला मागणी करावी लागेल. भारतातल्या जमिनीचं मॅपिंग करा. ज्यांना जीवनाधाराची गरज आहे अशा कुटुंबांचे मॅपिंग करा. महाराष्ट्रात किती पालधारक आहेत याचं जर तुम्ही मोजमाप केलं नाही, तर डोंबलाचं प्लॅनिंग करणार ? कम्युनिटी वाईज मॅपिंग करा तर गदारोळ झाला. लोकसभेत ते मान्य केलं. ते tally करावं म्हणून टाटा सामाजिक संशोधनकेंद्राच्या मदतीनं सोलापूर जिल्ह्यात पाच तालुक्यात सेन्सस केला. तो माही ताळा करणार व ५% ते १०% फरक आला तर तो भारताच्या पातळीला करता येईल. विस्थापित झालेले आदिवासी आम्ही म्हणतो तीन लाख, सरकार म्हणतं नाही. जे.एन.यु.आर.एम.आ अंतर्गत रोड तयार करतात, ब्रीज तयार करतात. त्यामध्ये जी झोपडपट्टी उठली जाते, हे दोन्ही Parallel झालं पाहिजे. हे दोन वेगळ्या डिपार्टमेंटसना दिले. नुसतं पंतप्रधानांनी म्हणून टाकलं आपल्या भाषणामध्ये की, एका वेळेला झालं पाहिजे. वन विंडो पाहिजे, कंपन्यासाठी वन विंडो आणि पुनर्वसन करण्यासाठी वन विंडो नाही. शहराच्या विकासासाठी योजना जरी चांगली असली तरी पण त्याच्यामध्ये मानवतेच्या दृष्टीकोनातून भारताचे पंतप्रधान जे म्हणतात ती गोष्ट तरी अंमलात आणा. असं एकही उदाहरण दिसणार नाही की एकाच वेळी पुनर्वसन झालंय व डेव्हलपमेंट झाली. जमिनीचे Distribution संदर्भात जो महत्वाचा अनुभव आहे. १९६० साली एक टूम निघाली को-ओपेरेटीव्ह फार्मिंग करून त्यांना शेती द्यायची. या सोसायट्या करण्यासाठी प्रचारक नेमले होते. कारण भटके विमुक्त अज्ञान आहेत. त्यांना काही माहिती नाही. सरकारी नियम वगैरे त्यांना जागरूक करायचं.

महिन्या ४५० रुपये त्या प्रयत्नातून ज्या-ज्या सोसायट्यांना जमिनी दिल्या त्या सगळ्या सोसायटीवर प्रस्थापितांचा कब्जा आहे आणि त्या सोसायटीचे मेंबर मुंबई-पुण्यामध्ये भीक मागताना दिसतात. नुसतं घर बांधून देणं नाही तर आम्हाला प्रोटेक्शनची गरज आहे. या परंपरेने चालत आलेल्या विषम व्यवस्थेत डोळ्यांना बरं वाटत नाही. हा जाती व्यवस्थेचा प्रभाव आहे. म्हणून आमचं भलं न सोसवणाऱ्या लोकांपासून आमचं संरक्षण पाहिजे. म्हणून अशा जागा नसतील तर एकत्र कराव्यात. त्यांच्यासाठी गावं एकत्र करता येतील. सेझ करता येतो मग भटक्यासाठी स्पेशल डेव्हलपमेंट झोन का नाही करता येत ? यांच्यासाठी गावं वसवा. अशा पद्धतीने या सरकारवर तळातल्या लोकांच्या जगण्याच्या अधिकाराला प्राधान्य देणारं धोरण आणि प्लॅनिंग आणि म्यॅपिंग

***(पृष्ठ क्र. २० वर पहा)***

## मा. प्रा. डॉ. पंडित विद्यासागर

(माजी संचालक, 'महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ' पुणे विद्यापीठ)



मी त्यावेळेस माझ्या Ph.D. ला सुरूवात केली त्यावेळी विषय होता Biophysics शी संबंधित होता. त्याकाळी फार क्वचित असं घडत होतं की, भौतिकशास्त्रातला विद्यार्थी एखादा असा विषय घेईल की त्याचा संबंध कुष्ठरोगाशी असेल. Ph.D. माझ्या चा विषय होता, कुष्ठरोग लवकर कसा ओळखावा; आणि त्यामध्ये जे संशोधन केलं ते आजही landmark संशोधन म्हणून मानलं जातं. त्याच्यात आम्ही असं दाखवलं होतं की, C- Fiber जे आहे ते कुष्ठरोगामध्ये पहिल्यांदा affect होतात. त्याच्या निदानावर जर आपण electrophysiological study केला किंवा स्पंदनांचा अभ्यास केला तर त्यातून ते दिसू शकतं. तेव्हापासून माझा अशा गोष्टींशी संबंध राहिलेला आहे.

त्यानंतर विज्ञान प्रसारासाठी मी अगोदर बरचसं काम केलेलं आहे. आदिवासी खेड्यामध्ये जाऊन व्याख्याने वगैरे दिलेली आहेत. त्याच्यामधून एक गोष्ट मला जाणवली की, आपण विज्ञान समजा लोकांपर्यंत न्यायचं असेल किंवा आपल्याला ते लोकांना सांगायचं असेल तर लोकांना जवळचा वाटणारा फॉर्म जर निवडला तर ते आपण चांगल्याप्रकारे सांगू शकतो. जी गोष्ट गेली अनेक वर्ष डोक्यात होती ती मी प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. मी काय केलं की, विज्ञानातील मूलभूत संकल्पना ओव्यांच्या स्वरूपात आणल्या. १००० ओव्या लिहिलेल्या आहेत. त्याच्यामध्ये मी विज्ञान आणि समाज असा एक घटक घेतलेला आहे. समाज आणि विज्ञान यामध्ये पर्यावरण हा एक महत्त्वाचा भाग आहे. पर्यावरणाच्या ओव्यांचा उपयोग आमच्या मुलांनी वारकऱ्यांच्या दिंडीमध्ये केला. त्याच्यावर विद्यार्थ्यांनीच प्रवचनं केली. मला असं वाटतं की, त्याच्यात एकही असा शब्द असणार नाही जो मुलांना समजणार नाही, ज्याला लिहिता वाचता येतंय त्याला, किंवा दुसऱ्याने वाचून दाखवलं तरी त्याला ते समजेल. पर्यावरणविषयक जे प्रश्न आहेत तेही त्याला समजतील असं मला वाटतं.

या पुढच्या टप्प्यात आपण विज्ञान साक्षरता याकडे थोडसं लक्ष द्यायला पाहिजे. कारण आपण शाश्वत विकासाच्या गोष्टी करतो. याचा समन्वय आपण कसा साधू शकतो किंवा त्यासाठी आपण काय करू शकतो किंवा स्थानिक पातळीवरील प्रश्नाचं आकलन निरनिराळया स्तरावर व्यवस्थित होतंय की नाही हा खरा महत्त्वाचा प्रश्न आहे, असं मला वाटतं. कारण शाश्वत विकासाबाबत आंधळे आणि हत्ती यासारखी स्थिती होऊ शकते. प्रत्येकजणाचं perception वेगळं आहे आणि प्रत्येकजण आपल्या दृष्टीकोनातून त्याच्याकडे पाहतोय असं पण काहीकाही वेळा दिसतं.

• • •

*(पृष्ठ क्र. १८ वरुन)*

लवकरात लवकर झालं पाहिजे, यासाठी आपण बुद्धीच्या जोरावर दडपण आणू शकू का ? आणि लोकांनी रस्त्यावर येणाऱ्या लोकशक्तीच्या जोरावर.

दुसरी गोष्ट, यांच्या कलांचे जतन होणं गरजेचे आहे. सागर युनिव्हर्सिटी येथे बीडिया जमात आहे. तेथे कलाकार गुलाबोदेवी म्हणून डान्सर आहे. निम्बुडा निम्बुडा.... हे त्यांचं परंपरागत गाणं आहे. दत्त नावाची सिनेसृष्टीशी संबंधीत महिला आमच्या गुलाबोदेवीच्या झोपडीत जाऊन आठ दिवस राहिली. व्हीडीओ चित्रण केलं तिच्या डान्स, गाण्याचं. त्या गाण्यावर मग ऐश्वर्या राय नाचली. तिनं केस केली की माझं परंपरागत गाणं, नाच चोरला. ही झोपडीत राहणारी बाई. ५०,०००/- रुपये देऊन तडजोड झाली आणि गुलाबो देवीला पद्मभूषण देण्याचे ठरवले. म्हणजे कसे कुठे कनेक्शन आहेत. इकडे डान्स चालू आहेत कोट्यावधी रुपयांचे आणि ती घेते १००० रुपयांची सुपारी कार्यक्रमाची. खरा वासुदेव भीक मागतो सकाळी. वासुदेवाचे सोंग घेणारे लोकं टीव्हीवर येतात, मानधन घेतात. या लोकांच्या या कला, यांचं पोट भरण्याचं साधन न बनता, पोट भरण्यासाठी यांना दुसरं काहीतरी दिलं पाहिजे आणि यांच्या कलेला प्रतिष्ठा कशी मिळेल हा आपल्यापुढचा प्रश्न आहे. त्याचं जतन, वृद्धी, कौशल्य कशी करायची ? त्याला मॉडर्न डेव्हलपमेंटशी कसं जोडायचं ? हे सगळे प्रश्न आपल्यापुढे आहेत.

• • •



आदिवासी विकास धोरण - स्वरुप व दिशा या चर्चा सत्राला महाराष्ट्रातील वरीलप्रमाणे मान्यवर कार्यकर्ते व स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

# महाराष्ट्राचे आदिवासी विकास धोरण सद्यःस्थिती व दिशा

**ॲड. सुरेखा दळवी**
(आदिवासींमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या)




सरकारचं आदिवासी धोरण हे वेगवेगळ्या राज्यघटनेतील तरतुदींचं आहे, ब्रिटीश काळातील आहे. अधिकृतरित्या असं कोणतंही धोरण नाही. १९९९ मध्ये वेगळं आदिवासी विकास मंत्रालय सुरु केलं, त्या वेळेला एक चर्चा सुरु झाली होती. त्याचं काही घोषित झालं नाही. आता पुन्हा नव्यानं केंद्र सरकारने अशा प्रकारे धोरण करण्याचं ठरवलं आहे. महाराष्ट्रातून देवाजी भाऊ आणि अभय बंग त्या समितीवर आहेत. देवाजी भाऊंनी सांगितल्याप्रमाणे आदिवासींबद्दल आपण चर्चा करताना आदिवासी कोण हा प्रश्न, केवळ आदिवासींनाच नाही तर सरकारच्या वेगवेगळ्या धोरणात दिसून येतो. आदिवासी कोणाला म्हणायचं, तर ज्याच्याकडे जातीचा दाखला आहे तो. आपण अनुसूचित जमातींवर चर्चा करतो. आदिवासी जमाती आणि अनुसूचित जमाती केंद्र सरकारचं आदिवासी विकास खाते आहे. विकास करताना शब्द आदिवासी आहे; परंतु राज्यघटनेत आणि एकंदरीत देशाचा नागरिक यात आदिवासी सरकारकडे नाही, त्या अनुसूचित जमाती आहेत.

एकंदर महाराष्ट्राबद्दल आपण जो विचार करतो त्यात पाचव्या अनुसूचीमध्ये जी १० राज्ये आहेत त्यात महाराष्ट्रात सर्वाधिक आदिवासी आहेत. आपण नकाशा जर बघितला अनूसूचित क्षेत्रातला तर त्या नकाशावर जे आदिवासी दिसातात, ते महाराष्ट्राच्या हद्दीवर दिसतात. म्हणजे सगळे मध्यभागी नाहीत. बाकी देशात आदिवासी पोटाचा किंवा गाभ्याचा भाग होतो. कारण तो मध्यात येतो. अस्तित्वाच्या दृष्टीने आणि चर्चेच्या दृष्टीने पण आदिवासी केंद्रस्थानी नाहीत. त्यामुळे हे महत्वाचे आहे की आदिवासींच्या चर्चा काय करायच्या ? यात सरकारचा दृष्टीकोन दिसतो. महाराष्ट्राच्या सोशल व इकॉनॉमिक डिपार्टमेंटने जो रिपोर्ट दिलेला आहे, त्यामध्ये दरडोई उत्पनाचा जो उल्लेख आहे, त्यामध्ये सुद्धा आदिवासी खूप तळाला आहे. केंद्र सरकारने जो विकास अहवाल तयार केला आणि मानवी विकासाच्या अहवालात राज्याचा २००२ साली जो अहवाल तयार झाला होता, त्यात सुद्धा आदिवासी पुन्हा मागे दिसला.

डी. आर. डी. ए. मार्फत ज्या काही योजना राबविल्या जातात त्यांचा १९९६-९७ चा रिपोर्ट आहे, त्यात त्यांनी म्हटलं आहे की, ६३.७३% आदिवासी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. आदिवासी विकास खात्याने जी आकडेवारी दिलेली आहे आणि त्यांचा जो

बेंचमार्क सर्व्हे आहे, त्यात असं म्हटलंय की, ९१% आदिवासी कुटुंबे दारिद्र्य रेषेखाली आहेत. म्हणजे ही संख्या वाढत चालली आहे जर एवढा पैसा खर्च होतो तरी आदिवासींची परिस्थिती आहे तशीच आहे. त्यात मानवी विकास अहवालामध्ये त्यांनी जे काही केलं आहे त्यामध्ये, यशदाचा जो काही अहवाल आहे तो प्रसिद्ध व्हायचा आहे. ह्यामध्ये आरोग्य, शिक्षण, राहणीमान उंचावण्याचा स्तर, त्याचा निर्देशांक हे सगळे एकत्र करून त्या ३५६ तालुक्यांचे निर्देशांक त्यांनी तयार केले आहेत. आदिवासी आणि बिगर आदिवासी यांच्या विकासाबाबत किती तफावत आहे.

याचं एक उदाहरणं द्यायचं झालं, तर पहिले १५ तालुके आहेत, त्यात ठाणे जिल्हा आहे. त्यात पाच तालुके, वसई सोडला तर बाकीचे औद्योगीकरण झालेले आहे. ठाणे, उल्हासनगर, अंबरनाथ हे पहिल्या पाचमध्ये आहेत. तळापासून शेवटचे पाच आहेत, यात पण ठाणे जिल्हाच आहे. त्यात मोखाडा, विक्रमगड, तलासरी, जव्हार, डहाणू हे तालुके पुन्हा शेवटी येतात. हा सलग आदिवासी पट्टा आहे, जिथे कुपोषण, बालमृत्यू जसा मेळघाट गाजतो तसा ठाण्याचा गाजतो. एका जिल्ह्यात प्रचंड तफावत आहे. महाराष्ट्रामध्ये जी आकडेवारी पुढे येते, त्यात शेवटचे जे जिल्हे येतात ते सगळेच्या सगळे आदिवासी आहेत. ह्याला योगायोग म्हणायचं की, सरकारच्या आतापर्यंतच्या केलेल्या जाणीवपूर्वक प्रयत्नांचा आणि सामाजिक, राजकीय व्यवस्थेचा हा परिपाक आहे.

त्यामुळे पंतप्रधानांचा सगळ्यात आवडता जिल्हा म्हणून सगळ्या कार्यक्रमांसाठी नंदुरबारची निवड होते. नंदुरबार हा कायम ३५ वा. सगळी सरकारी यंत्रणा जिथे कामाला लागलेली असते, तिथं हे एक वास्तव आहे. आपल्याकडे ४५ जमाती आहेत. त्यातल्या आदिम ज्या काही आहेत त्यात त्यांचा मुद्दाम वेगळा समावेश केला गेला. त्याला प्रिमिटीव ग्रुप म्हणत होते, आता वल्नरेबल म्हणजे पी.वि.टी.जी. particularly vulnerable tribe group असं म्हणतात. नवव्या पंचवार्षिक योजनेमध्ये त्यांनी निकष लावले होते; त्यात होतं, शेतीपूर्व तंत्रज्ञान, त्यांची थांबलेली, घटती लोकसंख्या, अत्यंत कमी साक्षरता. नवव्या पंचवार्षिक योजनेत एवढा पैसा खर्च झाला आणि त्यात आपल्याकडे अशा जमाती शिल्लक आहेत याचा तो कबुली जबाब होता. जेमतेम तगवणारी एक अर्थव्यवस्था आहे, भौगोलिक विलगता आहे, त्यांची विभिन्न संस्कृती आहे, बुजरेपणा आहे. आत्यंतिक दारिद्र्य आणि शिकार व अन्न गोळा करणारे, अशा प्रकारच्या तीन जमाती आहेत. माडिया गोंड, कोलाम आणि कातकरी आहेत.

कातकरी तर आता शहरातल्या प्रचंड मोठ्या विळख्यामध्ये, शहरीकरण जिथे होतंय त्या टप्प्यामध्ये आहे. ही सगळी सुरुवात ब्रिटीश काळापासून किंवा त्याच्याही आधीपासून म्हणजे बाजारू समाज व्यवस्थेशी हा समाज जोडला जाण्याची प्रक्रिया सुरु झाल्यापासून सतत वादाचा एक मुद्दा आहे. आदिवासींना मेनस्ट्रीममध्ये आणणं. मेनस्ट्रीम आणि आदिवासींचं जगणं ह्या दोघांमधला संघर्ष आणि खुल्या अर्थव्यवस्थेत देश हा ग्राहक बनल्यानंतर आदिवासी ग्राहक बनण्याची प्रक्रिया आहे. मी कातकरी महिलांना विचारले की, त्यांच्यासमोर कोणते प्रश्न आहेत ? सगळ्यांचे प्रश्न थक्क करणारे होते. या सगळ्या स्त्रिया सांगत होत्या की नवरा मारतो, दारू पिऊन छळतो. जे अन्य समाजाचे प्रश्न आहेत. पूर्वी फॉरेस्ट वाल्यांचा जाच, त्रास होता. आज रेशनचे प्रश्न आहेत. समग्र आदिवासी एक नाही हे जसं आहे, तसं दुसरीकडे आदिवासींमध्ये ३-४ प्रकारांनी आपल्याला वेगवेगळी विभागणी करावी लागेल. एक म्हणजे जो अजूनही जंगलाच्या, निसर्गाच्या, जमिनीच्या, जलाशयाच्या आधारे आपली उपजीविका करतो आहे. आजही तो बाजारी व्यवस्थेखाली न येता जगण्यासाठी जंगल, जमीन, पाणी आणि स्वत:चं ज्ञान, परिश्रम हा त्याचा जगण्याचा आधार आहे. त्याची मूल्यव्यवस्था

जोडलेली आहे. हा एक घटक अजूनही अस्तित्वात आहे. दुसरं, सरकारच्या आजवरच्या धोरणांचा परिणाम म्हणून अन्य आणि विशेषत: शेड्यूल एरियाच्या बाहेरचा असणारा किंवा आदिवासी उपयोजना क्षेत्राच्या बाहेर असणारा आदिवासी ५०% पेक्षा अधिक आहे. हा अन्य समाजासारखाच जगायला लागलेला आहे. तो जरी ग्रामीण कष्टकरी मजूर अशा पातळ्यांवर जगतोय, केवळ जंगल हे त्याचं जगण्याचं साधन नाही. तिसरा घटक आहे, आतापर्यंतच्या प्रयत्नात जो शिकला, त्याच्या आकांक्षा ह्या आताच्या शिकलेल्या मुलांसारख्या आम्हाला नोकरी मिळावी, आम्ही पुढे जावं अशा आहेत. आपण जेव्हा म्हणतो तेव्हा तिन्ही प्रकारच्या आदिवासींबद्दल काय म्हणायचं ? असा वेगवेगळ्या अंगाने विचार केला पाहिजे.

आदिवासींचा विचार करायचा झाला तर राज्यघटनेची चौकट, घटनेने दिलेले अधिकार आणि त्याला अनुसरून केलेले वेगवेगळे कायदे यांच्या अंमलबजावणीचं काय झालं नेमकं ? आदिवासींच्या विकासाचं बजेट हा वेगळा भाग आणि त्याचं राज्यघटनेने दिलेलं संरक्षण आणि अधिकार यांच्याबद्दलचा दुसरा भाग. आदिवासींच्या विकासाचा मूळ गाभा हा नेहरुंचे पंचशील मानलं गेलं होतं. त्यात होतं की आदिवासींची संस्कृती, परंपरा यांचं जतन करण्याचं स्वातंत्र राहील. दुसरं, त्यांचा जगण्याचा आधार आहे ते जंगल आणि जमीन त्यावर आक्रमण केलं जाणार नाही. तिसरं, बाहेरचं प्रशासन त्यांच्यावर थोपवलं जाणार नाही. चौथं, स्थानिक तरुणांना याबद्दल तयार करून विकास कार्यक्रमाच्या अंमलबजावणीमध्ये समाविष्ट करून घेतलं जाईल. शेवटचं, आदिवासींमध्ये विकासामध्ये त्यांच्यावर किती पैसे खर्च झाले याच्यावर त्याचे परिणाम मोजले जाणार नाही. तर तिथंच त्याचं जीवनमान किती उंचावलं, स्तर कसा बदलला यावर त्याचं मोजमाप केलं जाईल. दुर्दैवाने यापैकी एकही गोष्ट घडलेली नाही. आदिवासींच्या विकासाचा जो काही निधी आहे तो वेगळ्या पद्धतीने, वेगळ्या खात्यामार्फत जरी खर्च झाला तरी हा मोठ्या बजेटचा एक छोटा हिस्सा आहे. म्हणजे फक्त पैशापुरतं वेगळेपण आहे. मोठं डेव्हलपमेंटचं पॅकेज आणि मग लाईन डिपार्टमेंटकडे तो पैसा द्यायचा. यामध्ये योजनांचं वेगळेपण कुठेच दिसत नाही.

स्वातंत्रोत्तर काळामध्ये स्वातंत्र, समता, आणि सामाजिक न्यायाच्या जोडीने आदिवासींचे हक्क संरक्षणाच्या ज्या काही तरतुदी आहेत, त्यामध्ये प्रशासनाची व कायद्याची चौकट ही मात्र वसाहतवादाची होती तीच आपण कायम ठेवली आहे. त्या चौकटीतच काम सुरु आहे. आपल्याकडे एखादा अधिकारी वाईट वागतो असं दिसलं तर त्याची बदली आदिवासी भागात करून टाका. आदिवासींकडे कोणीही निकामी माणूस पाठवून द्या, हे आजही सरसकट म्हटलं जातं. आदिवासींवर वनहक्क कायद्याच्या निमित्ताने एकीकडे कबुली जबाब आला की सतत एक प्रकारचा ऐतिहासिक अन्याय होत आलेला आहे. दुसरं विकासाची जी काही संकल्पना आहे, त्या संकल्पनेत अजूनही बऱ्याच त्रुटी आहेत. अजूनही काही विभागामध्ये माणसे भरलेली नाहीत. डॉक्टर मंजूर आहेत, पण डॉक्टरच नाहीत. दुसरं, विकासाकरता जी साधनं आहेत त्या नैसर्गिक साधनांचा Access and Control हा आदिवासींकडे कुठेच नाही. तिथे त्यांची फसवणूक होत आहे, हे सगळे मुद्दे आपल्याला लक्षात घ्यायला लागतील. राज्याची १९७५ पासून जी.टी.एस.पी. आलेली आहे. त्यानंतर वेगवेगळे कायदे आलेले आहेत. त्यात १५ जिल्हे आणि ४३ माडा पॉकेट आणि ३४ मिनी माडा पॉकेट आहेत. १४ जिल्हे ३८ तालुके हा मोठ्या प्रमाणात आदिवासींचा एरिया असेल तर तो दुर्लक्षित करण्यासारखा नाही.

मुख्यत: ८-१० मुद्यांवर विचार करावा लागेल, चर्चा करावी लागेल आणि माहिती मिळवावी लागेल. आदिवासी आयुक्त, आदिवासी मंत्रालय, सेक्रेटरी, आदिवासी विकास संशोधन संस्था या तिन्हीकडे आपण

मागणी केली तर आदिवासींविषयीची अधिकृत माहिती कुठेही मिळत नाही. किती आदिवासींना जमीन वाटप केलं, किती आदिवासींच्या जमिनी काढून घेतल्या याबद्दल माहिती मागितली, सरप्लस जमीनींचं किती वाटप केलं ? मिळत नाही. १९७८ मध्ये फक्त आदिवासी संशोधन संस्थेने अभ्यास केला आहे, आदिवासी जमिनींचा. अन्यथा आदिवासी जमिनींचा अभ्यास कुठेही नाही. आदिवासींच्या जमिनीचं काय झालं ? किंवा आदिवासींच्या सिंचनाकरता जो पैसा वापरला गेला तो आदिवासी क्षेत्रात जर खर्च झाला असेल तर त्यातून किती आदिवासी शेतकरी लाभार्थी झाले, याची आकडेवारी आपल्याला कुठेही मिळत नाही. आर्थिक शोषणाचे मुद्दे कोणते, तसंच राजकीय प्रक्रिया जी काही आहे त्यात हमारा गाव हमारा राज किंवा आपण सक्षमीकरणाच्या गोष्टी करतो.

घटनात्मक आणि कायदेशीर हक्काची पूर्तता किती झाली ? निसर्ग संसाधनांवर अधिकाराची प्रक्रिया किती झाली? वनहक्क कायद्याच्या अंमलबजावणीबद्दल अजूनही पूर्णपणे चर्चा आपण सुरु केलेली नाही. अपवादात्मक काही गावं झाली. पाच वर्षे झाली सरकारने यावर पावले उचललेली नाहीत. तसेच संस्थांनी, सामाजिक कार्यकर्त्यांनी करावं, लोकांनी करावं पण सरकारची जबाबदारी पुढे सरकत नाही. १९९९ पासून आजपर्यंत पेसा कायद्याची अंमलबजावणी होऊ शकलेली नाही. इथं महत्वाचा मुद्दा येतो, गाव आदिवासींचं व सरकारचं गाव महसुली. हवं कशाला म्हणावं महसुली गाव आणि आदिवासी गावाचा महसूल. पुन्हा इथं आदिवासी जंगलचा राजा म्हणताना जंगलामध्ये सर्वात महत्वाचं म्हणजे टिंबर, गौण आदिवासींचं जगणं गौण वनौपजामध्ये जातं. जमीन जर विकासाचं पहिलं साधनं म्हणत असू तर जमिनीपासून आदिवासीला तोडण्याची प्रक्रिया इंग्रजांच्या काळापासून खूप मोठ्या प्रमाणात आहे. मोठ्या प्रमाणात खाणी आणि धरणे ही आदिवासी क्षेत्रामध्ये आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात विस्थापन होताना दिसते. आता तर दिल्ली-मुंबई कोरीडोर हा रायगड पासून सुरु होत आहे आणि ठाणे, नाशिक, नंदूरबार म्हणजे जवळपास सगळा आदिवासी भाग जातोय. पुनर्वसनाचं जे काही पॅकेज जमिनीच्या सहापट किमती. म्हणजे सगळं पैशामध्ये मोजमाप होतंय. त्यात आदिवासींच्या हक्कांचं आणि अस्तित्वाचं काय होणार हा एक मोठा प्रश्न आहेच. त्यामुळे दळी आणि एकसाली जमिनीबद्दलचे ठराव होऊनही आजही अतिक्रमणे आणि वनग्रामाचे प्रश्न सोडवूनही सुटत नाहीत. कारण राजकीय इच्छाशक्ती आणि लोकशक्तीचा दबाव या दोन्ही पातळींवर आपण कमी पडतोय. त्यांची जीवनमूल्ये इतर समाजासारखी नाहीत. त्यांना मागास म्हणून हिणवताना त्यांची कोणती जीवन मूल्ये ही शाश्वत आणि मानवी जीवनाला पुढे नेण्यासाठी आवश्यक आहेत, याच्याबद्दल कुठेही आपण सांगत नाही. सामुदायिक लग्नांचा कार्यक्रम भूमी-सेनेने सुरु केला होता, त्यावेळेला मुख्य होतं की शोषणातून मुक्ती. आज सरकारने कन्यादान योजना त्याच्याशी जोडून टाकली.

आदिवासींमध्ये कुठेही कन्यादान होत नाही. त्यांची संस्कृती आहे किंवा पद्धती आहे त्याचं संरक्षण करण्याची गरज आहे. राजकीय व प्रशासकीय व्यवस्थेची चौकट या सगळ्या जगण्याला आणि त्यांच्या अस्तित्वाला पूरक आणि सुसंगत कशी होईल याची नव्याने मांडणी करण्याची गरज आहे. शिक्षणाची नीती, सगळ्यांनी मराठी शिकवावं, इंग्रजी शिकवावं, ज्या आदिवासीला मुळातच कुठली लिपी नाही, तिथं या शिक्षणाच्या नीतीबद्दल इतका प्रयोग सुरु आहे. तसेच आरोग्यामध्ये कुपोषण, बालमृत्यूमुळे येतं. एकंदरच आदिवासींचं जगणं हे त्यांना निसर्गामधून काय-काय गोष्टी मिळत होत्या त्याच्याशी जोडणे. आदिवासी विकास योजनांचा निधी किती असला पाहिजे? सुखटणकर समितीनंतर तो ९ टक्क्यांवर आला. पण हा नऊ टक्क्यांचा बॅकलॉग किती मोठा आहे की, तो निधीची

*(पृष्ठ ३६ वर पहा)*

# पाचवी अनुसूची, पेसा व वनहक्क कायदा


## श्री. मोहन हिराबाई हिरालाल

(आदिवासींमधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते)





हा जो विषय मला दिला आहे पाचवी अनुसूची आणि पेसा कायदा. त्याला मी थोडसं दुरुस्त करून वनहक्क कायदा २००६ शी जोडतो. कारण तो एक-दुसऱ्याशी संबंधित आहे. अनुसूचित जमाती आणि त्यांचे क्षेत्र आपल्याला माहिती आहे. पेसा हा कायदा खूप आशादायी म्हणून आला होता. पंचायत राज अनुसूचित क्षेत्रामध्ये दुरुस्तीचा कायदा. सगळे कार्यकर्ते, विचारवंत यांना आशा निर्माण झाली होती की, आदिवासी भागामध्ये खरोखरंच विकासाचे काम व्हायचे असेल आणि तो विकासाचा निर्णय घेण्याचा राजकीय हक्क आदिवासी समाजाच्या हातामध्ये यायचा असेल तर, पहिल्यांदा कायद्याने विचार केला होता की ग्रामसभा कशी असेल?

भारत सरकारचा जो कायदा होता, त्यात त्यांनी लिहिलंय की जिथे आदिवासी राहतात. पाड्यांवर, छोट्या-छोट्या वस्तींवर आणि आपले परंपरेने कामकाज चालवतात, त्यांना **ग्रामसभा** म्हणून मान्यता देण्याची गोष्ट या कायद्याने केली, ही खूप महत्वपूर्ण गोष्ट आहे. पण या कायद्याचे स्वरुप आपण लक्षात घेतले तर, हा जरी केंद्र सरकारचा कायदा असला तरी तो पंचायत राज या दुरुस्तीकरता म्हणून केलेला कायदा होता.

आपल्या राजकीय रचनेप्रमाणे पंचायत राज हा विषय राज्य सरकारच्या कक्षेमध्ये येतो. केंद्र सरकार केवळ सूचित करू शकतं आणि त्याची अंमलबजावणी मात्र राज्य सरकारने करायची होती. त्यासाठी एका वर्षाचा कालावधी केंद्र सरकारने दिला होता. पण अनुभव असा आला की, केंद्र सरकारने इतकी चांगली वाट करून दिली असताना राज्य सरकारने त्यात दुरुस्ती करताना योग्यप्रकारे त्याची अंमलबजावणी केली नाही. त्याचा दोष केंद्र सरकारला लागू होतो. कारण राज्याने याची काटेकोर अंमलबजावणी करावी यासाठी ज्या प्रकारची सुस्पष्ट तरतूद भाषेत असायला हवी होती ती नव्हती. हे नंतर अनुभवातून लक्षात येते. सगळ्यात महत्वाची ग्रामसभेची व्याख्या होती, ती दुरुस्ती करताना महाराष्ट्र सरकारने काय केले तर चक्क महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिनियमातील सर्व व्याख्यांच्या ज्या आठ गोष्टी होत्या, त्यात ग्रामसभेची व्याख्या होती, त्या जशाच्या तशा कायम ठेवल्या. आणि सांगितलं की, केंद्राच्या कायद्याप्रमाणे तसंच आहे.

ग्रामपंचायतीच्या सर्व मतदारांची मिळून बनलेली सभा म्हणजे ग्रामसभा. ही पेसाच्या भावनेच्या अगदी विरुद्ध होती. म्हणून महाराष्ट्रामध्ये 'पेसा' ची अंमलबजावणी त्याच्या मूळ भावनेप्रमाणे व्यवस्थित न होण्याचे मुख्य कारण या ग्रामसभेची व्याख्या त्याच्या

योग्य भावनेप्रमाणे दुरूस्त न करणे हे आहे. काय व्हायला पाहिजे होते की, ज्या-ज्या ठिकाणी नैसर्गिक वस्ती आहे आदिवासींची व त्यांच्यासोबत अनेक वर्षांपासून राहणाऱ्या गैर-आदिवासींची. त्या छोट्या छोट्या वस्त्या, पाडे, टोले जिथे प्रतिनिधींची गरज नाही, त्यांना ग्रामसभा म्हणून घोषित करायला पाहिजे. त्यांच्या हातात आपले निर्णय घेण्याची राजकीय सत्ता त्यामुळे यायला हवी होती. पण आता हा मूळ आत्माच मारून टाकला आहे. उरली-सुरली जी ताकत होती, तो हा पेसा कायदा, स्पष्ट असं म्हणत होता की, जे गौण उत्पादन आहे, वनौपज आहेत त्यांचे मालकी हक्क ग्रामसभेला देण्यात येतील. इथे एक आशेची जागा होती की, आदिवासी समाज हा जंगलावर आधारीत जगणारा, प्रेम करणारा समाज आहे. त्याने जंगल वाचविले आहे. म्हणून जिथे-जिथे आदिवासी आहे तिथे जंगल आहे. आणि असं असताना त्याला गौण उत्पादनाचा मालकी हक्क दिला पाहिजे, अशी तरतूद पेसा कायद्याने करून दिली आहे. पण प्रत्यक्ष अंमलबजावणी करताना सरकारने काय केले ? त्याच्यातले जे महत्वपूर्ण उत्पादन आहे, ज्याला किंमत आहे अशी दोन उत्पादने होती, एक बांबू व तेंदू पाने, हे त्या गौण उत्पादनाच्या व्याख्येतूनच वगळून टाकले.

आदल्या दिवशीपर्यंत महाराष्ट्र सरकार गौण उत्पादनं म्हणून कागदपत्रात त्याचा उल्लेख करत होते, तेच पेसा लागू करत असताना एका रात्रीमध्ये ही गौण उत्पादनं नाहीत, असे सरकारने घोषित करून टाकले. ही सरळ सरळ धोका देणारी गोष्ट होती. केंद्राच्या कायद्याची पायमल्ली होती; पण केंद्राने कायदेशीर कारवाई केली नाही. केंद्र सरकार कोर्टात जर गेलं असतं तर राज्य सरकारला हे बदलावं लागलं असतं. पेसाच्या मागे काही राजकीय बळ नव्हतं की जे हे करेल. गौण वनौत्पादांमध्ये दोन मुख्य आहेत बांबू आणि तेंदू. ३३ गौण उत्पादनांची यादी केली की, ज्यांच्यावर मालकी हक्क खरोखर द्यायला हवा होता. अत्यंत विदारक गोष्ट आहे की, ज्या ३३ गौण उत्पादनांवर राज्य सरकारने मान्य केलेल्या कायद्याने, सरकारने घोषित केले की, ह्याची मालकी आता ग्रामपंचायतीकडे आहे. आणि एका वर्षाच्या आत महाराष्ट्र सरकारने आदेश काढला की, ह्या सगळ्या अनुसूचित क्षेत्रातल्या ग्रामपंचायती अंबलबजावणी करायला अक्षम आहेत. म्हणून महाराष्ट्र सरकारने त्यांचा अधिकार काढून घेऊन आदिवासी विकास महामंडळाला एजंट म्हणून नेमलं आहे आणि ह्या सर्व गौण उत्पादनांची खरेदी-विक्री करण्याचा सर्व अधिकार आदिवासी विकास महामंडळाला असेल, इतर कोणीही ते कलं तर तो गुन्हा होईल, अशा प्रकारचा आदेश चक्क महाराष्ट्र सरकारने काढला.

ज्यांना मालक म्हणून जाहीर केलं त्या मालकाला विचारण्याची गरज सुद्धा पडली नाही की, तू अक्षम आहे की सक्षम आहे. परस्पर निर्णय घेऊन टाकला व अधिकार आदिवासी विकास महामंडळाला दिला. महामंडळाने हे काम कधीच चांगलं केलं नाही. कायद्याने इतकी चांगली तरतूद केली असताना त्याचा प्रत्यक्ष फायदा आपल्या आदिवासी समाजापर्यंत पोचला नाही.

सुदैवाची गोष्ट अशी की, या सगळ्या पार्श्वभूमीवर भारत सरकारने अनुसूचित जमाती व अन्य परंपरागत वननिवासी वनहक्क अधिनियम २००६, याला आपण सर्वसामान्यपणे 'वनहक्क कायदा' म्हणून ओळखतो, ते आणायचं ठरवलं. त्या वेळेला मात्र जे लोक कायद्याची रचना करत होते, त्यांनी या सगळ्या गोष्टी लक्षात घेतल्या. पहिल्यांदा असा कायदा आला की, ज्याने ग्रामसभेची नीट व्याख्या केली. या कायद्यामध्ये ग्रामसभा म्हणजे ग्रामपंचायतीची ग्रामसभा नाही, तर एका छोट्या गावाची, वस्तीची, पाड्याची, तिथल्या राहणाऱ्या प्रौढ स्त्री-पुरुषांची मिळून बनवेली ग्रामसभा, असं केंद्र सरकारने सुद्धा म्हटलं आणि महाराष्ट्राच्या त्या वेळच्या नोडल एजन्सीने, पुण्याची आदिवासी विकास व संशोधन संस्थेने त्याला समर्थन दिले. ही ग्रामसभेला मान्यता देणारी गोष्ट पहिल्यांदा घडली.

दुसरी गोष्ट जी पेसाच्या कायद्यामुळे आपण घालवून बसलो होतो, आणि राज्य सरकारने ती हिरावून घेतली होती, ती केंद्र सरकारने याठिकाणी गौण उत्पादनांची व्याख्या करताना दुरुस्त केली. राज्य सरकारची बदमाशी लक्षात घेऊन भारत सरकारनेच गौण व्याख्येमध्ये सर्वात पहिल्यांदा बांबू लिहिलं. बांबू, तेंदूपत्ता, मोह फुले, डिंक वगैरे इतकी वनौत्पादन. पुन्हा कुणी गडबड करेल किंवा एखादं सुटेल म्हणून शेवटी असं म्हटलं की ह्याचसारखी इमारती लाकूड नसलेली सर्व वनौत्पदाने ही गौण उत्पादने आहेत. त्यामुळे कुठेही गडबड करायला जागा नाही. फक्त टिंबर सोडा, बाकी पाने, फुले, फळे, गवत, झाडे असतील ही सर्व गौण उत्पादन असतील अशी, सुस्पष्ट व्याख्या केली. म्हणून एक वेगळी संधी याठिकाणी सर्व आदिवासी आणि त्यांच्यासोबत परंपरेने राहणारे गैर-आदिवासी, म्हणजे ७५ वर्षांपासून जी गैर-आदिवासी कुटुंबं त्या भागात किंवा जवळपासच्या भागात त्यांच्यासोबत राहतात, त्यांनासुद्धा हा हक्क मिळाला.

हा एक गैरसमज आहे की, हा हक्क फक्त आदिवासींना मिळालेला आहे. आदिवासींना ७५ वर्षांची अट नाही. त्यांना काही पुरावा द्यायचा नाही की किती वर्षांपासून राहतो. ते जर आदिवासी असतील व आदिवासी असल्याचा पुरावा त्यांच्याकडे असेल तर त्यांना इतर कुठलीही अट आगू नाही. पण अन्य परंपरानत वननिवासी जे गैर-आदिवासी आहेत, त्यांना मात्र ही अट लागू आहे व ती योग्य आहे. अन्यथा बहुसंख्य गैर-आदिवासी जे पैशासाठी जंगल लुटायला तयार आहेत ते आदिवासींचा हक्क हिरावून घेण्यासाठी जंगलात घुसतील व हे हक्क हिरावून घेतील. ही कायद्याची भीती अगदी योग्य आहे.

या कायद्याचे दुसरे वैशिष्ट्य असं आहे, हा कायदा करत असताना भारत सरकारने वन आणि पर्यावरण मंत्रालयामार्फत हा कायदा केला नाही. पुष्कळ लोकांचा गैरसमज होतो की, हा वनाशी संबंधित आहे म्हणजे तो वन मंत्रालयाचा असेल. पण वस्तुस्थिती अशी आहे, हा कायदा जेव्हा घातला तेव्हा वन आणि पर्यावरण मंत्रालयाने त्याला प्रचंड विरोध केला. अजून सुद्धा त्यांचा विरोध आहे. म्हणून सुज्ञपणे भारत सरकारने असा निर्णय घेतला की, हा कायदा आदिवासी मंत्रालयामार्फत करायचा. त्याचं कारण त्यांनी प्रस्तावनेमध्ये नमूद केलेलं आहे हे फार दुर्मिळ आहे की, सरकारने अशा प्रकारची भाषा वापरणे की, **जे आदिवासी व वननिवासी वनात व वनाजवळ राहत होते, त्यांचे वनावरचे अधिकार होतेच. त्यांना ब्रिटिशांच्या काळात किंवा स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारत सरकारने मान्यता दिली नाही, ही एक मोठी ऐतिहासिक चूक झाली आहे.**

सरकार चुका करतं पण सरकारने चुका कबूल करणं ही फार दुर्मिळ गोष्ट आहे. चूक अथवा अन्याय हा शब्द. अशी गोष्ट मान्य करणं किंवा आम्ही काहीतरी देत आहोत असं नाही, तर हे त्यांचे अधिकार होतेच, आम्ही फक्त मान्य करत आहोत आणि ते कायद्यामध्ये मान्य करून टाकले. हे मान्य झालेले अधिकार कोठे आहेत हे दाखविण्याचे काम आदिवासी व गैर-आदिवासी जे परंपरेने राहतात त्या समाजांचे आहे ते उघडच आहे. हे त्यांनीच दाखवलं पाहिजे, हे खरं आहे. म्हणून त्यात तरतूद आहे की, त्यांनी दावा केला पाहिजे. कायदा बनत असताना परंपरेने जे हक्क होते ते सामुदायिक होते; परंतु मधल्या काळात व्यक्तिगत मालकीचा हक्क हा सगळीकडे पसरला. शेती ही पहिली व्यक्तिगत मालकीची नव्हती, ती नंतर झाली. त्यावर तुमचे नाव, पत्ता राहील. त्याच्यामुळे व्यक्तिगत शेती करणाऱ्या लोकांना त्यामध्ये हक्क मान्य होईल.

१५ डिसेंबर पूर्वी ज्यांनी शेती केली आहे त्यांना, अन्याय होऊ नये म्हणून छोटी गोष्ट आली व ती मोठी होऊन बसली. सगळे जण छोट्याशा जमिनीकरता धावायला लागले. संस्थांनी, संघटनांनी सुद्धा हा व्यक्तिगत हक्काचा मुद्दा लावून धरला. पण सामुदायिक हक्कांकडे दुर्लक्ष व्हायला लागले. व्यवस्थेला सुद्धा हेच हवं होतं.

व्यक्तिगत जमीन दिली तर थोडीशी जाईल आणि सामुदायिक हक्कांमधून सर्व वनच जायची शक्यता आहे, हे त्यांना माहिती होतं. लोकांनी स्वत:हून काही प्रयत्न करावेत, या भूमिकेत ते नव्हते. त्यांना एकप्रकारे settement करायचं होतं. एकदा ज्यांचे हक्क आहेत, तेवढे दावे होतील ते आम्ही देऊ. म्हणजे बाकीच्यांना असं म्हणता येईल की, तुम्ही दावा केला नाही म्हणजे तुमचा हक्क नव्हताच. कायद्याच्या दृष्टीने ते बरोबर होते. पुरेसा वेळ, माहिती दिल्यानंतर जरी तुमचा हक्क आहे, तुम्ही दावा करा म्हटल्यावर जरी कोणी म्हणत नसेल तर, त्याचा हक्क नसेल म्हणून तो म्हणत नसेल, असं म्हणणं सोयीचं होतं. मग ती वनजमीन कोणत्याही संस्था, संघटनांना इतर कोणालाही द्यायला सरकार मोकळे होणार आहे. हे लक्षात घेऊन सामुदायिक हक्कांकडे लक्ष दिले पाहिजे असं संस्था संघटनांना वाटत होते. परंतु प्रत्यक्षामध्ये हे दावे रिजेक्ट होत होते. अशा परिस्थितीमध्ये मेंढा-लेखा ग्रामसभेने इतर मित्रांच्या मदतीने अभ्यास केला. एक किचकट कागदोपत्री दावा ज्याची भीती आदिवासींना वाटते. ती भीती घालवून तो सोपा व सुरळीत कसा करता येईल याचा प्रयत्न केला. त्याच्यातून असा एक दावा तयार केला की जो सरकारला रिजेक्ट करता येणार नाही.

**मेंढा-लेखा ही देशातील पहिली ग्रामसभा ठरली की जिला १५ डिसेंबर २००९ ला महाराष्ट्राचे तत्कालीन राज्यपाल जमीर यांच्या हस्ते ग्रामसभेला १८०० हेक्टर वनभूमीवर हक्क मान्य केल्याचे अधिकार अभिलेख हातामध्ये आले.** ज्यामध्ये गौण उत्पादनांवर मालकी सुद्धा अंतर्भूत आहे. वनावर प्रबंधन, व्यवस्थापन करण्याचा हक्क अंतर्भूत आहे. नंतर नंतर सरकार अटी घालायला लागलं. त्याचा संघर्ष सुरु आहे. परंतु मेंढा-लेखामुळे देशात एक वाट मोकळी झाली. १८०० हेक्टर म्हणजे ४५०० एकर जमीन व ४५० लोकसंख्या असलेल्या एका छोट्या आदिवासी गावाला इतक्या जंगलावर अधिकार मिळू शकतो, कायद्याने. म्हणजे काय त्याची क्षमता आहे. त्याचा backlog काय आहे हे लक्षात घ्यायचे असेल तर पहिल्या वर्षी जेव्हा गावाने बांबूवर आपल्या हक्काची अंमलबजावणी करायचं ठरवलं व त्याकरता लढा दिला, त्याला वन विभागाने प्राणपणाने विरोध केला. सगळा विरोध थकल्यानंतर त्यांनी शेवटचं हत्यार वापरलं. त्यांनी म्हटल की बांबू म्हणजे भारतीय वन अधिनियमाप्रमाणे अजूनही टिंबर आहे, इमारती लाकूड आहे. भारताने दुसरा कुठलाही कायदा लागू केला तरी आम्हाला फक्त वन कायदाच लागू आहे. शेवटचा उपाय त्यांनी केला, जर तुम्ही बांबू विकणार असाल तर आम्ही वाहतूक परवाना देणार नाही. आणि तो बेकायदेशीर होईल म्हणजे खरेदी करणारा खरेदीच करणार नाही. त्यावर गावाने एक अभिनव आंदोलन केलं. पहिल्या वर्षात नफा कमी दिसतो. कारण थोडीशी कापणी झाली होती; परंतु दुसऱ्या सेशन मध्ये एक कोटी रुपये टर्न ओव्हर झाला व पन्नास लाख रुपयांचा नफा एका वर्षात झाला. यावरुन या आधीच्या काळात आदिवासींची किती संपत्ती इतरांनी लुटुन नेली, हे तुमच्या लक्षात येईल.

यात एका गावाची जरी गोष्ट आली असली तरी मेंढा लेखाने दावा करण्याची जी यादी तयार केली, त्याची एक मार्गदर्शिका आम्ही काही मित्रांनी तयार के ली. आणि तिचा आधार घेऊन मग गडचिरोली जिल्ह्यामध्ये जे प्रयत्न झाले, त्यात जिल्हाधिकारी कार्यालय सुद्धा सहभागी झाले आणि १२ जून २०१२ चा आकडा आहे की गडचिरोली जिल्ह्यामध्ये एकूण ८०६ गावांमध्ये चार लाख ऐंशी हजार एकर पेक्षा जास्त वनभूमीवर या सामुदायिक हक्कांना मान्यता मिळालेली होती. याची टक्केवारी बघितली तर देशाच्या सामुहिक वन हक्क क्षेत्राच्या ८६% क्षेत्र हे एकट्या गडचिरोली जिल्ह्यातील आहे. तर महाराष्ट्रातील त्या तारखेच्या सामुहिक वन हक्काच्या क्षेत्रापैकी ९८% क्षेत्र फक्त गडचिरोली जिल्ह्यात आहे. मेंढा-लेखा नंतर आणखी सहा ग्रामसभांनी मागील वर्षी बांबू कापून त्यापासून उत्पन्न

घेतले आहे. त्यांना टीपी देण्याचा अधिकार ग्रामसभेने नियुक्त केलेल्या व्यक्तीने सही करून प्रत्यक्ष अंमलात आणला आहे. आणि आता ही सामुहिक वन हक्काची मार्गदर्शिका गडचिरोली जिल्ह्याधिकाऱ्यांनी स्वत: प्रकाशित केली आहे.

## चर्चा

**वाहरू सोनावणे**

वनहक्क प्राप्त करण्याच्या संदर्भामध्ये दिलेल्या अधिकारांमधून ते प्राप्त करून घेतले, ही प्रेरणा देणारी गोष्ट आहे. माझा पुढील प्रश्न असा आहे की, आदिवासी, हा जन्मत:च, जो अगोदर जंगलात राहत होता. तो निसर्ग संस्कृती आत्मसात करून आपले जीवन जगत होता. मग निसर्ग संस्कृती काय आहे. फक्त लोकं असंच म्हणतात की निसर्गाच्या सान्निध्यात राहतात. त्यांना खाऊ-पिऊ मिळते असे नाही. एक जीवन मूल्य कसं निसर्गापासून तो आत्मसात करतो ते जीवन मूल्य लक्षात घ्यायला पाहिजे. मी नेहमी म्हणत असतो की वारा उच्च दाबाकडून कमी दाबाकडे वाहत असतो. पाणी हे कुठल्या नदीचे, झरण्याचे असेल ते वरून खाली वाहत-वाहत समतल महासागराकडे जात असते. त्याची दिशा समान असते. कोणतंही झाड कोणत्याही धर्माच्या माणसाला माझे फळ खाऊ नको असे म्हणत नाही किंवा कोणतेही झाड असे म्हणत नाही की माझ्या सावलीत बसू नका. म्हणजे भेदभाव करत नाही.

निसर्ग नियम काय आहे तर समता, प्रेम, बंधुता. हे जीवन आदिवासी पूर्वीपासून जगत आहे. आदिवासींच्या जीवनातून सामूहिकता काढून टाकली तर ते जीवन आदिवासीचे जीवन राहत नाही. तो गीत एकटा म्हणणार नाही. लग्नात बायका समुहात गीत म्हणतात. आदिवासी एकटा नाचणार नाही. प्रत्येक कृतीत समूहाला एक मोठी किंमत, मूल्य आहे. हे जीवन कसं नष्ट झालं ? इंग्रजांनी या जीवनावर हस्तक्षेप केला व जल, जंगल, जमीन पासून आदिवासींना तोडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी कायदा केला आणि आदिवासींना हक्कापासून दूर केलं. पाणी प्यायचे असेल तर कोणाला विचारण्याची गरज नाही. घरासाठी दांडी तोडायची असेल तर कोणाला विचारण्याची गरज नाही. तो त्याच्या गरजांपुरता तोडत होता. व्यापारासाठी कधीही जंगलतोड केली नाही. हे जीवन आदिवासींच्या वाट्याला होतं. १८६५ ला इंग्रजांनी हा कायदा केल्याचे ऐकिवात आहे. आदिवासीला नियमामध्ये बंदिस्त करून टाकले व त्याच्या मुक्त जीवनावर आघात केला आहे. हे जीवन परत मिळवून घ्यायचे असेल तर काय करायला पाहिजे ?

घोषणा दिल्या, लाठ्या झेलल्या. पण २००६ चा वनहक्काचा कायदा झाला आणि आम्ही खुश झालो. ही एक प्रकारची तुकडेफेक आहे. बाकीची जमीन कोणीही मागितली तर देऊन देणार. आम्हाला दु:ख आहे की आमच्या हक्काच्या जमिनी कायदा करून आमच्याकडून काढून घेतल्या. ते जल-जंगल वरचा पूर्ण अधिकार आम्हाला मिळाला पाहिजे, तरच निसर्गावर आधारित जीवन आम्हाला जगता येईल. इथं जी वैचारिकता, तत्व आपण मांडत आहोत, इथंही विचार केला पाहिजे. आमचे तत्वज्ञान कोणत्या दिशेमध्ये गेले पाहिजे. कोणते जीवन प्राप्त करण्यासाठी आमचे जीवन असणार आहे, यासंदर्भात आपण विचार केला पाहिजे. मला प्रश्न आहे की, देवाजी तोफांनी जे सांगितलं, 'दिल्ली चे सरकार म्हणजे आमचे सरकार, गावचे सरकार आम्ही सरकार', हे जे तत्वज्ञानाची मांडणी होत आहे. तर गावाची व्यवस्था व दिल्लीची व्यवस्था ही एकच आहे का ? कोणत्या अर्थाने आपण आमचे सरकार म्हणतो हे स्पष्ट होत नाही. ज्या तऱ्हेने आम्ही गावात आमचे सरकार म्हणत असू ती व्यवस्था, नियम, आचारसंहिता, तिथले नियंत्रण करण्याच्या गावच्या पद्धती आहेत ती व दिल्ली मधील जी व्यवस्था आहे ही काय आहे, त्याचे सुसंगतपणे नातं कसं आहे. त्यासंदर्भात

मला काही सांगता येत नाही. ग्रामसभेचा जो कायदा झाला आहे, त्याच्या अनुषंगाने फक्त विचार करू. तर अशा पद्धतीने जो बदलावं आला आहे तो आपल्या बाजूने आहे. पण ही लढाई आपण जरूर करावी. जल, जंगल, जमिनीवर पूर्ण अधिकार जो तिथं राहतो त्याचा असेल. त्या जीवनाकडे आपण कशी वाटचाल करू, त्याचा आपण विचार करू.

**प्रा. रा. के. मुटाटकर**

सुरेखा व मोहन यांनी जे विषय घेतले ते एकमेकांशी थोडेसे संबंधित आहेत. आदिवासी विकास विभाग कसा निर्माण झाला ते माहिती आहे. मुख्य मुद्दा असा आहे की, आदिवासी विकासात सरकारने एक बाजू मांडली की, हे लोक वेगळे आहेत. त्यांच्यासाठी उपाययोजना दिल्या पाहिजेत. दुसऱ्या कुठल्याही गोष्टीबाबत उपयोजना नाही, ही एक जमेची बाजू आहे. जे दलित आहेत, अनुसूचित जातीचे आहेत ते सुद्धा शासनाच्या मागे लागतात, आम्हाला का उपयोजना देत नाही? हे आपण मान्य केलं की आदिवासींचा वेगळ्या पद्धतीने विचार केला पाहिजे. त्याकरता वेगळं खाते, वेगळं बजेट केलं पाहिजे. महाराष्ट्राचे बजेट ९% आहे. पण हे सगळं थोतांड आहे, ९% कधीच मिळत नाहीत. ९% Scheduled tribe आहेत, पण ९% आदिवासी आहेत की नाही माहिती नाही. दुसरी गोष्ट त्यातील खरे किती व खोटे किती माहिती नाही. आज सगळ्या मोठ्या जागांवर खोटे आदिवासी बसलेले असतात. मी समाजाचे नाव घेत नाही पण इथे आय. ए. एस. चा जो कोटा आहे भारतातला, त्यातला ४०% कोटा हा खोट्या आदिवासींनी घेतला आहे. ते आपल्यावर राज्य करतात. महाराष्ट्रात सुद्धा ते आयुक्त होतात, सेक्रेटरी होतात.

२००२ चा महाराष्ट्राचा Human Development Report होता, त्यात नंदूरबार ३५ वा होता. २०११-१२ चा जो रिपोर्ट आहे, त्यातही नंदुबार ३५ वा आहे. त्या अनुषंगाने Planning Commission, U.N.D.P., Planning Board यांच्या वतीने असं ठरवण्यात आलं की तीन जिल्हे घेऊन त्याचं Strategic Planning करावं. ते इंदिरा गांधी इन्स्टिट्यूट मार्फत करावं. त्यामध्ये जालना, नंदूरबार व यवतमाळ, गडचिरोली होता, पण नक्षली असल्यामुळे बाजूला टाकला. त्यातील नंदूरबारचा अभ्यास मला करायला सांगितला. आरोग्य व शिक्षण हा भाग होता. त्यात मांडलं आहे, विकासाच्या योजनांचे दोन भाग करू. एक लोकांचा व दुसरा शासनाचा. जो आदिवासी विकास विभाग आहे, त्यात काय अधिकार आहेत, आहेत आयुक्तांना, अधिकाऱ्यांना ? त्याची जी मांडणी केली, कमिटीसमोर मला दोनदा Presentation करायला मिळालं. त्यात सेक्रेटरींना हवं होतं की आदिवासी विकास विभागाला जास्त पॉवर मिळाव्यात.

आज सगळे म्हणतात की, आदिवासी विभाग पोस्ट ऑफिसचं काम करते. पैसे आले की लाईन डिपार्टमेंटला देऊन टाकायचे. पण लाईन डिपार्टमेंट त्याचं काय करतं, याचा अधिकार कुणालाही नाही. त्यात सांगितलं की, तुमचा जो आय.टी.डी.पी. चा प्रोजेक्ट ऑफिसर आहे, कलेक्टर व झेड.पी. चा सी.ओ. हे तिघं काम बघतात. त्या प्रोजेक्ट ऑफिसरला त्या कलेक्टरसमोर त्याच्या परवानगीशिवाय खुर्चीवर बसायची छाती नाही. हे सगळे आय.ए.एस. असतात. त्या मिटींगमध्ये चीफ सेक्रेटरीकडून चुकूनसुद्धा पंचायत, ग्रामपंचायत हा शब्दसुद्धा निघाला नाही. शब्द निघाले, की आमचा कलेक्टर असतो, ग्रामसेवक, पटवारी असतो.

जगातील कुठलंही सामाजिक परिवर्तन कर्मचाऱ्यांमार्फत झालं असेल तर माझं चालेन्ज आहे. ही नोकरशाहीची वृत्ती आहे म्हणून Government Sector ला सुचवलं. ते मान्य झालं नाही व होणारही नाही की, ट्रायबल कमिशनरच्या ऑफिसमध्ये एक जॉईन्ट डायरेक्टर हेल्थ पाहिजे, जॉईन्ट सेक्रेटरी/डायरेक्टर पी.डब्लु.डी. पाहिजे. हे असल्याशिवाय त्या त्या

खात्यामध्ये जे काम चालतं त्याची निगराणी करणार कोण ? इतके लॉजीस्टिक दिलेलं आहे, तोंडी झालेलं आहे, पण त्या पातळीवर काही नाही. राज्यमंत्री असताना पद्माकर वळवींना मी म्हटलं, तुमच्या खात्यात एक विकासाची योजना मला दाखवा. आहेत त्या जगविण्याच्या आहेत. अशा Government Sector कडून आपण काय अपेक्षा करणार?

१९७४ ची कमिटी आहे, त्यांनी म्हटलं आहे, पाडा, वाडा, वस्ती हे unit of social action आहे. महसुली गाव हा शब्दच किती मूर्खपणाचा आहे. आपलं देऊळ गावात असतं की महसुली गावात ? आपला रोजचा व्यवहार कुठे होतो ? धडगाव तालुक्यामध्ये २६३ महसुली गावं आहेत, पाडे अनेक आहेत. त्या २६३ गावांना फक्त २५ ग्रामपंचायती आहेत. ग्रुप ग्रामपंचायत हे फ्रॉड आहे. कारण इतके गाव-पाडे मिळून तुम्ही ग्रामपंचायत करता, त्याची गावसभा कुठे बसणार, मीटिंग केव्हा होणार ? हे होणं शक्य नाही. एका ग्रामसेवकाला अशा अनेक ग्रामपंचायती असतात. म्हणजे या सगळ्याचा बट्ट्याबोळ केलेला आहे. कागदावर सगळं आहे. खरेतर विकास करायचा हे कोणी ठरवायचं ? मंत्र्याने ठरवायचे ? कमिशनरने, सेक्रेटरीने ठरवायचं की गावच्या लोकांनी ? आपली यंत्रणा जी आहे ती अतिशय अकार्यक्षम आहे. ही अशी परिस्थिती आहे.

**राजू पांढरा**

पेसा कायदा १९९६ साली झाला. त्यात कुठल्या गोष्टी वगळल्या हे सांगितलं. पेसा कायद्यापासून तुम्हाला लांब ठेवायचं असेल तर एका बाजूला नगरपालिका करायच्या व त्यामध्ये ती गावं ओढून टाकायची. त्या गावाचं Reschedule करून टाकायचं. अशी केस मुंबई हायकोर्टात चालू आहे व निकाल लवकर लागणार नाही. आदिवासी भागातील निवडणुका ह्या बेकायदेशीर आहेत. हे कसं थांबेल हे बघावं लागेल. जी जी गावं अशी समाविष्ट झाली तिथे महानगरपालिका झाल्यामुळे तिथले दावे सरकार अजून स्वीकारत नाही. ही सगळ्यात खेदाची बाब आहे. पाचव्या अनुसूचीची जबाबदारी ही राज्यपालांवर आहे; पण ते ही जबाबदारी पार पाडताना दिसत नाहीत. आदिवासी सल्लागार समितीचे मुख्य हे मुख्यमंत्री आहेत, जे आदिवासी नाहीत. आदिवासी सल्लागार समितीने जेवढ्या सक्षमतेने काम करायला हवं तेवढं होत नाही. आज महाराष्ट्राचे २६ आमदार आहेत. पण राज्यपालांना जशा सूचना करायला हव्यात तसं काही होताना दिसत नाही. उलट या पेसा कायद्यानंतर २००३ मध्ये ज्या तरतुदी केल्या होत्या, त्याप्रमाणे ५०% वर लोकसंख्या असेल तर तिथला सरपंच कुणीही होऊ शकेल, म्हणजे आदिवासी लोकसंख्या ५०% असेल तर आदिवासी होऊ शकेल.

एका बाजूने आदिवासी सामुदायिक हक्क विसरून जातो. मेंढा मध्ये तो झाला, पण बऱ्याच ठिकाणी तो हक्क नाकारला जातो. जंगलाच्या आजू-बाजूची जी जमीन आहे, त्याला ३५ सेक्शन लावलेलं आहे. परस्पर महसूल खात्याच्या जमिनी जंगल खात्याला सुपुर्द केल्या आहेत. ३५ सेक्शन हे १९२७ च्या कायद्याप्रमाणे आहे. तो ब्रिटिशांच्या काळातला आहे. त्या कायद्याने ते जमिनीचे अधिकार काढून घेतले. मी ७/१२ चा उतारा काढतो तेव्हा त्यावर लिहिलेलं असतं; पण त्याला हे माहिती नसतं. शहापूरमध्ये असं झालं की, त्याची २२ एकर जमीन आहे, त्याला ३५ सेक्शन लागलेला आहे. बाकीच्या लोकांना मोबदला मिळाला; पण याला नाही. जेव्हा तो महसूल खात्याकडे गेला तेव्हा त्यांनी सांगितलं की, तुझी जमीन वन खात्याकडे आहे. एका बाजूने वन हक्काचा कायदा जमिनी काढून देतं आणि तेच दुसऱ्या कायद्याने काढून पण घेतं. हा याच्यात विरोधाभास आहे. यावर विचार व्हायला हवा. त्याच काळामध्ये कोळशाच्या खाणीसाठी व लोखंडाच्या खाणीसाठी सरकारने जमिनी वाटल्या आहेत.

**कुंडलिक केदारी**

वनहक्क कायद्यामध्ये सामुदायिक ज्या योजना होतात त्याचा बटट्याबोळ झाला आहे. त्याचा पुरेपूर फायदा झाला नाही. सामुहिक वनाधिकार कायद्यामध्ये, आदिवासी पाड्यातून जंगलात जी कुलदैवतं आहेत किंवा मंदिरं आहेत तिथपर्यंतचा पट्टा असेल तर वनाची परवानगी घ्यावी लागते. कायद्यामध्ये फक्त २० मिटर रस्ता करायची परवानगी आहे. अत्यंत दुर्गम भागात जी मंदिरं आहेत, आदिवासींची जी दैवतं आहेत तिथं रस्ता अद्यापही झालेला नाही. त्याच्यावर काही करू शकतो का ? यावर खुलासा व्हावा. मी जुन्नर भागातून आहे. तिथं अशा प्रकारची समस्या आहे.

**पुष्पाताई अत्राम**

आम्ही सर्व समाजाचा विचार करत असताना आदिवासी समाज अशा परिस्थितीत का आहे, याचं परीक्षण इथं बुद्धीजीवी लोकांनी केलेलं आहे. त्यांना सर्वसामान्यांच्या सोबत आणण्याचा प्रयत्न आहे; पण हा माणूस सुधारत का नाही ? याचं मूळ कारण असं आहे की, नेहरूंनी सांगितलेल्या २० कलमी कार्यक्रमात सांगितलंय, त्याचा इमान-इतबारे उपयोग केला तर त्याचं उत्थान झाल्याशिवाय राहणार नाही. त्याची शिक्षण-पद्धती मराठीत हवी. कारण त्यांची मातृभाषाही आहे. त्याच्यामधून शिक्षण दिलं तर हा कुठेही मागे राहणार नाही. कारण हा लढवय्या समाज आहे. त्याच्यामध्ये शौर्य आहे. मग तो मागे का आहे ? याचा विचार इथं होत आहे हे आमच्यासाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. यासाठी अहोरात्र प्रयत्न होत आहेत. कागदावर कार्यक्रम होत असतात; पण वस्तुस्थिती पाहत असता तिथं काहीच नाही. त्याला आपल्याबरोबर आणायचे असेल तर त्याची लंगोटी आपल्या दारी अन् आपला टाय पट्टा त्याला जाईल. नेमलेले लोक इमान-इतबारे काम करतात. २६ आमदार इमान-इतबारे काम करतात. तुम्ही त्यांची इस्टेट पहा, दहा पिढ्या संपणार नाही एवढी त्यांची इस्टेट, का ? तीही वर्षात ? ज्या माणसाला आम्ही निवडून देतो तेही इमान-इतबारे काम करत नाहीत. म्हणजे इमान नावाची वस्तू या देशात राहिली नाही.

आधी समाज इमान-इतबारे काम करतो. तो प्रामाणिक आहे म्हणून भिकारी आहे. आज मी तीस वर्षापासून संघटना चालवते. झोपडपट्टीमध्ये मी बालवाडी काढली. पण शासनाला जेव्हा आम्ही पैसा मागतो तेव्हा नाही मिळत. एखादा क्राईम करायचा म्हटलं तर पैसाच पैसा. इमान-इतबारे काम करणाऱ्याला पैसा नही. प्रामाणिकपणा आता या देशात राहिला नाही. म्हणून आदिवासी या अवस्थेत आहे याचं दु:ख आहे. तसा कायदा जोपर्यंत होत नाही तोपर्यंत जल-जंगल-जमीन आमच्या ताब्यात राहणार नाही, अशीच यंत्रणा चालू राहील. आम्हाला असे वाटते की आम्ही अजूनही गुलाम आहोत. विशेषकरून महिलांचा सहभाग नाही. पुरुषप्रधान संस्कृतीमुळे मातृप्रधान संस्कृती नष्ट झाली. पण आदिवासी समाजामध्ये आमची सामाजिक पत अजूनही आहे.

**सुरेखा दळवी**

इथे काही प्रश्नांची उत्तरे अपेक्षित नाहीत. ही एक चर्चा आहे. एक प्रश्न होता की, शेड्यूल एरियामध्ये कोणताही प्रकल्प आणताना ग्रामसभेला विचारलं नाही. हे कायदेशीर की बेकायदेशीर ? आता जे प्रश्न आले ते सगळे माहितीच्या पातळीवर. शेड्यूल एरियामध्ये ग्रामसभेशी कन्सल्ट करणं हे मानायचं, नाही मानायचं हा पुढचा मुद्दा आहे. त्यांना हे सांगितलं पाहिजे, त्यांच्याशी सल्ला-मसलत केली पाहिजे. त्यांचं म्हणणं ऐकण्यासाठी स्वतंत्र ग्रामसभा लावल्या पाहिजेत. या ग्रामसभा, ग्रामपंचायतीच्या नव्हेत, प्रकल्पासाठी म्हणून व्हायला हव्यात. रस्त्याचा एक प्रश्न होता, तर रस्ता कोणता आहे हा मुद्दाच येत नाही, गावात गरज असेल व वनहक्क कायद्यात असं आहे की ७५ पेक्षा कमी झाडं तोडावी

लागणार असतील, सरकारी पैसा आहे, ग्रामसभेची शिफारस आहे व एक हेक्टर पेक्षा कमी जमीन प्रकल्पासाठी असेल तर रस्ता किंवा सामुदायिक सुविधा कलम ३२ नुसार त्याचे प्रस्ताव केल्यानंतर मान्यता मिळेल. २० मीटर ही मर्यादा कुठेही नाही.

३५ सेक्शन च्या मुद्याचं उत्तर आता देण्याची गरज नाही. त्याचा विषय वेगळा असल्यामुळे आता त्यात जात नाही. वाहरूनी सुरुवात केली, आदिवासींचं जगणं हे समूहाने जगणं आहे आणि सरकारचे कार्यक्रम बहुतांशी व्यक्तिगत आहेत. व्यक्तींचा विकास हा समूहाच्या विकासाचा एक भाग असतो. व्यक्तीचा विकास समूहाच्या विकासाबरोबर होणं गरजेचं असतं. त्याचा समतोल कसा साधायचा, व्यक्तिगत विकासाचा किती भाग असावा आणि सामुहिक विकासाचा किती? आणि निर्णय प्रक्रिया मात्र पूर्णपणे सामूहिकच असली पाहिजे, याचा आपला आग्रह. हे कसं रेटायचं याबाबत सर्वांची एकवाक्यता असण्याचा मुद्दा मांडलेला आहे. दुसरा मुद्दा होता वाहरूचा, जीवनमूल्य व जीवनशैलीचा. पुन्हा शिक्षणाकडे मी जोडत आहे. आदिवासींच्या जगण्याच्या संसाधनाकडे, त्याच्या जीवनमूल्यांकडे, तो कसा बघतो आणि बिगर आदिवासी कसा बघतो आणि या दोघांना काय शिकवलं जातं. आदिवासी हा केवळ एक विषय अभ्यासाचा होता कामा नये. तो बिगर आदिवासींना आदिवासींकडे पाहण्याचे एक दृष्टी देणारा कार्यक्रम असला पाहिजे.

अन्यथा आदिवासी म्हणजे व्यसनी, अंधश्रध्दाळू, मागास, जंगलाचा असं केवळ नाही. त्यापलीकडे आदिवासींचं जगणं आहे, हे इतर समाजाला कळलं पाहिजे आणि आदिवासीला सुद्धा आदिवासीचं जगणं ही न तोडणारी शिक्षण प्रक्रिया असली पाहिजे. कारण शिकला व आदिवासीपासून तो दूर गेला असं होता कामा नये. त्याकरता काय-काय शिक्षण व्यवस्थेमध्ये करावं लागणार आहे ? कारण नाहीतर आदिवासीकरता नवोदय विद्यालयापासून अधिक पुढे जाण्यासाठी, आम्ही कॉम्पिटिशन मध्ये मागे राहता कामा नये. म्हणून त्या प्रकारची अधिक सुविधा मिळणाऱ्या फाईव्ह स्टार शैक्षणिक संस्था उभ्या करण्यापर्यंत जे प्रस्ताव येतात, त्याऐवजी या शिक्षणक्रमामध्ये काय असलं पाहिजे, काय ज्ञान, मानसिकता असली पाहिजे हा महत्वाचा मुद्दा आहे. गावाच्या बाबतीत इथे आपल्याला अधिक आक्रमकपणे गांव म्हणजे आदिवासीचं आणि आदिवासींची निर्णयप्रक्रिया याकरिता कायद्याची मदत घेता-घेता एक मोठ्या व्यापक आंदोलनाच्या पातळीवर कसं जाता येईल, त्यादृष्टीने काही गोष्टी कराव्या लागतील. शासकीय प्रशासन व्यवस्था यावर मोठ्या प्रमाणात आदिवासी भागातून आदिवासी चळवळीतून आणि आदिवासी कार्यकर्त्यांकडून आलं पाहिजे. शासकीय अधिकाऱ्यांची आपापल्या सोयीनुसार मांडणी असते. घटनात्मक चौकट काय म्हणते आणि त्याची अंमलबजावणी होती की नाही. आदिवासींची जीवनदृष्टी, जीवनमूल्य, आणि जीवन संसाधनं, या अनुषंगाने आजची व्यवस्था, राजकीय व्यवस्था काय आहे, प्रशासकीय, आर्थिक व्यवस्था काय आहे व कायदेशीर चौकट काय आहे या सगळ्या अंगाने तपासावं लागेल.

आपल्याला अभ्यास करावे लागतील. एक ठोस व एकवाक्यता असणारी मांडणी सरकारकडे करावी लागेल. आदिवासी धोरण जर सरकार ठरवत असेल तर त्यानिमित्ताने बदलत्या जागतिकीकरणाचं वास्तव लक्षात घेता ५५% शहरीकरण झालेलं आहे. १३ शहरं आता आदिवासी उपयोजना क्षेत्रात आहेत. नव्याने ही संख्या वाढत जाणार आहे. त्या शहरीकरणाच्या टप्प्यामध्ये आदिवासींच्या हक्कांचं रक्षण कशाप्रकारे करायचे हा मुद्दा येणार आहे. अनेक मुद्यांना आपल्याला स्वतंत्रपणे भिडावं लागणार आहे. एकवाक्यता येईपर्यंत चर्चा पुढे न्याव्या लागतील आणि एक ताकदीचं आंदोलन उभं करावं लागेल.

**मोहन हिराबाई हिरालाल**

पाचव्या अनुसूचीबद्दल मी बोलावं असं अपेक्षित होतं. पाचव्या अनुसूची मध्ये राज्यपालांना जे अधिकार दिले व जी सल्लागार परिषद आहे ती किती निष्क्रीय आहे की, राज्यपालांना दिलेला अधिकार कुठेच वापरलेला नाही. यामध्येच त्याची गोम आहे. आदिवासींमध्ये एक गैरसमज आहेत की पाचव्या अनुसूचीमध्ये हे दोष आहे आणि जर सहावी अनुसूची आली तर सगळं छान होणार आहे. दुरून डोंगर साजरे अशा प्रकारचा हा प्रकार दिसतो. आम्ही या दृष्टीने अभ्यास केला, मिलिंद भाऊ व मी त्रिपुराला गेलो. तिथं सहाव्या अनुसूचीचं मंत्रिमंडळ आहे, त्यांच्या मुख्यमंत्र्याची भेट घेऊन आलो आणि आमचा पूर्ण भ्रमनिरास झाला.

सहाव्या अनुसूचीची अजून वाईट परिस्थिती आहे, हे लक्षात घेऊन सगळ्यात मोठा शहाणपणा, उत्तर-पूर्वेकडील सगळ्या राज्यांमध्ये सहावी अनुसूची आहे. परंतु त्या सगळ्यात शहाणं राज्य आहे ते नागालँड. त्यांनी म्हटलं की, आम्हाला पाचवी अनुसूचीही नको व सहावीही नको. आमची जी Village Council, District Council ची जी व्यवस्था आहे शासनाची, ती मान्य करत असू तरच भारतात राहू आणि भारत सरकारने ते मान्य केलं, त्यामुळे ही व्यवस्था कुठेही मान्य होऊ शकते. वाहरू जे म्हणत होते की, समुदाय असणं ही आमची संस्कृतीची नैसर्गिक ओळख आहे. आणि तो समुदाय कसा बनेल. त्यांनी असं नाही म्हटलं की, आदिवासी जातीत जन्मलेला समुदाय. कारण ही नंतर केलेली गोष्ट आहे की, आदिवासींना सुद्धा जातीव्यवस्थेसारखं करून टाकणं. हा हिंदू जाती व वर्ण व्यवस्थेचा परिणाम असलेली गोष्ट आहे. असा माणसांचा माणसासारखा जगणारा समुदाय बनणं अशाप्रकारची ती गोष्ट मांडली. जंगल, जमीन, पाणी या मुलभूत गोष्टी कोणाच्याही मालकीच्या असू नयेत. अगदी सरकारच्या सुद्धा नाही. जे मानवी समुदाय जगण्याकरता अवलंबून आहेत, तिथे राहतात व जे त्याचं चांगलं व्यवस्थापन करू शकतात, त्यांचा त्यावर हक्क असावा. ते सुद्धा मालक असणार नाहीत. ही मुलभूत गोष्ट त्यांनी फार चांगली मांडली आहे. त्यासाठी सगळ्या मानवी समाजाने मिळून प्रयत्न करण्याची गरज आहे. या दिशेने प्रयत्न करत असताना, परिवर्तनाचे काम करत असताना कशा प्रकारची वाटचाल असेल ती ?

तर ही संधी लोकशाही व्यवस्थेमध्ये मिळते, हे लक्षात घेऊन त्या राजवटीतल्या मर्यादा लक्षात घेऊन सुद्धा भारतीय संविधानाने जी एक संधी, अवसर त्यामध्ये उपलब्ध करून दिला आहे, तो काय आहे की, या देशाचे मालक कोण आहेत ? या देशाचे लोक म्हणजे आम्ही देश आहोत. हे भारतीय संविधानाचे जे पहिलं वाक्य आहे ते खूप महत्वाचं वाटतं, जो लोकशाहीचा पाया व आधार आहे. ते जितकं आम्ही देश बनू, समाज बनू तितकं हातात येणार आहे.

देवाजी तोफांनी सांगितल्याप्रमाणे ती गुलामाची मानसिकता आहे, तो मूळ प्रश्न आहे अडचणीचा. देश स्वतंत्र झाला; पण सगळ्या गोष्टींवर लोक सरकारवर अवलंबून असतील, कायद्यावर, प्रशासनावर अवलंबून असतील, तर ते गुलामच राहणार. भारतीय संविधान म्हणतं की, तुम्ही देश बना, निर्णय घ्या. भारतीय संविधान अंमलात आणताना एक दोष झाला आहे की, देशाचा निर्णय कोण घेणार ? कारण शासन व्यवस्था जी असते, राजकीय शक्ती किंवा सत्ता आपण म्हणतो, ती दोन गोष्टींनी अस्तित्त्वात येत असते. एकतर निर्णय घेण्याचा हक्क किंवा अधिकार आणि अंमलात आणण्याची शक्ती.

फक्त निर्णय घेणं म्हणजे सत्ता नाही. ती अंमलात आणण्याची धमक असणं म्हणजे राजकीय सत्ता आहे. आज देशाचे निर्णय कोण घेणार, लोकसभा घेणार. राज्याचा निर्णय विधानसभा घेणार. या तर्कशास्त्राप्रमाणे गावाचा निर्णय कोण घेणार, तर ग्रामसभा घेणार. भारत सरकार अजूनही हे पूर्णपणे मान्य करत नाही की ग्रामसभा घेणार. भारतीय संविधानाप्रमाणे हे अगदी तर्कशुद्ध आहे की, गावाचा निर्णय ग्रामसभा घेणार. म्हणून या ग्रामसभेची नीट व्याख्या करायला हवी. समाज जिथे राहतो, महिलांचा, ज्या महिलांना पितृसत्ताक पद्धतीमुळे बाजूला ठेवलं आहे. आपण खुल्या मनाने मान्य केलं पाहिजे आदिवासी भागात, बाकी संस्कृतीतल्या जरी चांगल्या गोष्टी असल्या तरी त्या पितृसत्ताक पद्धतीचा अवलंब असलेला समाज आहे. त्यातून बाहेर पडलं म्हणजे काय ताकत निर्माण होते, ते देवाजींनी त्यांच्या गावाची कथा सांगितली. पितृसत्तााकच समाज आहे, पण त्यांनी मन बदललं, निर्णय घेतला, महिलांना सहभागी करून घेतलं तर काय इतिहास घडू शकतो, तो इतिहास आपल्या समोर आहे.

पर्यावरण आणि संस्कृती वाचविण्याचे मोठं काम महिलांच्या सहभागाने झालं आहे, हा जगाचा इतिहास आहे. हे लक्षात घेऊन त्या दिशेने आपली वाटचाल करणं, आपलं ध्येय खूप समोरचं आणि पूर्ण मानवजातीचं असलं पाहिजे, व्यापक असलं पाहिजे. ते असं तुकड्यांमध्ये, त्यामधून आपण तुटून जाऊ ध्येयापासून, असं असता कामा नये. आपली निष्ठा विचलित होता कामा नये. दिशा स्पष्ट असली पाहिजे. तिथं आपल्याला पायऱ्या-पायऱ्यांनी जावं लागेल. जंगल हे समाजाच्या, समुदायाच्या हातात देणं ही एक संधी आहे, जी आपण मिळायला पाहिजे असं म्हणत होतो, पण हातात घेऊ शकत नव्हतो. कायदा नसताना समाज जर हातात घेऊन अंमलात आणू शकला असता, तर आनंदाची गोष्ट आहे; परंतु समाज असं करु शकला नाही. तो आणखीन भयभीत झाला, विघटीत झाला. एकट्या व्यक्तींमध्ये विभाजित झाला. अशा परिस्थितीत शासनाने तुम्हाला अशा अवस्थेत आणून ठेवलं की आता व्यक्तिगत, सामुदायिक हक्क दोन्ही आहेत आणि त्यांना हे मानसशास्त्र माहिती आहे. म्हणून त्यांना अपेक्षा होती की सगळे व्यक्तिगतच्या मागे धावावे. तिथं आपण हा पर्याय लोकांसमोर मांडला नाही की, जे मेंढ्याने केलं. त्यांनी लोकांना समजावण्याचा प्रयत्न केला की व्यक्तिगत हक्क नाकारू नका, आज जगण्याकरता ते आपल्याला आवश्यक आहेत.

पण हे लक्षात घ्या की, आपण जर पहिला सामुदायिक हक्कांचा दावा केला तर व्यक्तिगत हक्क कुठेही जाणार नाहीत. पूर्ण १८०० हेक्टर करता आपण गावासाठी हक्क मिळवले. त्यात व्यक्तिगत ८-१० त्याच्या पोटातच आहेत. शेवटी निर्णय घेण्याचा अधिकार ग्रामसभेला आहे. त्यातील ३५ एकराचे दावे ग्रामसभा नाकारणार तर नाही, उलट योग्य व्यक्तींना न्याय मिळेल असं बघेल. म्हणून सामुदायिक दाव्यांच्या मागे जाणं हे शहाणपण आहे. हे करत असताना हे विसरु नका की, एवढ्याने प्रश्न संपला. वाहरूच्या म्हणण्याप्रमाणे जर यात शासनाचा असा डाव असेल की जेवढं तुम्ही मागितलं तेवढं आणि बाकीचं काय करायचं ते आम्ही ठरवणार. त्याबद्दल आपल्याला जागरुक राहावं लागेल. मेंढा-लेखा गावं घोषणेद्वारे काय सांगतंय? आमच्या गावाचे निर्णय आम्हीच घेणार. एवढं संपल नाही, मुंबई-दिल्लीचे निर्णय काय होणार हेही आम्ही बघणार. तिथला पैसा, अधिकार, नियम, कायदे, योजना यांच्यावरही आमचा हक्क आहे. कारण ते सरकार आमचं आहे. जर ते आमचं नाही म्हटलं तर आम्ही वेगळ्या सापळ्यात अडकू. ते बदललं पाहिजे हे मान्य आहे. पण आज जर आम्ही मतदान करत असू, तर ते चुकीचं काम

करत असेल तर ते आमचं नाही असं म्हणणं म्हणजे जबाबदारी झटकणं आहे. ही व्यवस्था कोण बदलणार ? आम्ही लोक, समुदाय म्हणून जेव्हा ही ताकत उभी राहील, तेव्हा ते राज्याची, केंद्राची व्यवस्था सुद्धा बदलू शकतो.

म्हणून आज आपल्या हातात ही संधी आहे जिथं समुदाय नष्ट झालाय तो बनवू शकतो. सामुदायिक हक्कांच्या आधारे, जेव्हा जगण्याचा प्रश्न येतो तिथं ताकत नसेल, तर उपाशीपोटी संस्कृतीच्या कितीही गोष्टी केल्या तर त्या टिकत नाहीत. म्हणून एकीकडे नैसर्गिक संसाधनांची लूट केली त्यांना नष्ट केलं, त्याऐवजी त्याचं योग्य व्यवस्थापन करण्याचा अधिकार आमचा आहे व तो आम्ही घेतो. त्या आधारे उपजीविकेचा हक्क आम्ही घेतो. आम्ही गरीब नाही आहोत. कारण ही आमच्या हक्काची संसाधन होती ती आम्ही मानली नाहीत. ती घेण्याकरता आम्ही दुबळे ठरलो. तुम्ही हिसकावून ती आपल्या हातात ठेवली. म्हणून आम्ही दरिद्री राहिलो. जिथं नैसर्गिक संसाधनं समृद्ध आहेत तिथं त्यावर हक्क असणारा माणूस गरीब कसा ? त्याचं व्यवस्थापन आपल्या हातात घ्या, मालकी ही महत्वाची राहिलेली नाही. त्याचं व्यवस्थापन कोण करतं ? नियोजन कोण करतं? नियम कोण बनवतं ? ते लागू कोण करतं ? त्याच्या हातामध्ये सत्ता येते. ही राजकीय नसते तर ती आर्थिक सत्ता असते. ही आर्थिक व राजकीय सत्ता तेव्हा समुदायाच्या हातात जाते. प्रतिनिधी व बाजार जेव्हा हा त्याच्या नियंत्रणाखाली असेल तेव्हा बदलाची प्रक्रिया त्या टोकापासून सुरु होते. व्यापक लढ्यासाठी रणनीती आखण्याचे काम करावे लागते. त्यांच्या सगळ्या गोष्टींशी मी सहमत आहे, नाहीतर पैशांच्या मागे लागून आपण भटकून जाऊ. जिथे एक कोटींचा व्यवहार झाला व ५० लाख रुपये बँकेत आहेत. ह्या सापळ्यात अडकू नका.

पूर्ण मानवी समाजाच्या परिवर्तनाचं जे स्वप्न आहे त्यापासून आपण दूर जाता कामा नये. ही गोष्ट फार महत्वाची आहे. ही चर्चा घडवून आणण्यासाठी आदिवासी उत्थान कार्यक्रम व महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांनी जो पुढाकार घेतला, यासाठी मुटाटकर सरांची जी प्रेरणा अनेक वर्षांपासून भक्कमपणे काम करत आहे. इतकी चांगली चर्चा सुरु झाली आहे ही थोड्या-थोड्या विषयांना वाटून घेऊन आणि ज्या क्षेत्रांमध्ये जे विषय महत्वाचे आहेत, एकदम महाराष्ट्र पातळीवर न घेता क्षेत्रीय पातळीवर, ज्या भागात जो विषय महत्वाचा आहे, त्या-त्या भागामध्ये तशा प्रकारची चर्चासत्रे जर आयोजित करण्यात आली तर आपल्याला या विषयावर अधिक पुढे जाता येईल.

• • •

---

***(पृष्ठ २४ वरुन पुढे)***

तरतूद नाही, तो निधी नंतर खर्चीही पडला नाही. सात हजार कोटींचा निधी वापरलाच गेला नाही. त्यापेक्षा जास्त द्यायचा असेल तर आधी जो हक्काचा आहे तो मिळायला पाहिजे. कारण ९% हा लोकसंख्येच्या प्रमाणात झाला. दुबळ्याला थोडा अधिक द्यायचा असेल तर तो वाढीव द्यायला पाहिजे. पण आहे तोच खर्ची पडत नाही, त्यामुळे त्या निधीचं काय करायचं आणि सगळ्यात महत्वाचं की २४ आदिवासी आमदार आहेत. लोकप्रतिनिधी, आदिवासींची राजकीय इच्छाशक्ती, लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी आहेत; पण ते सगळे विखुरलेले आहे. आदिवासी विकासाचा मंत्री सुद्धा आदिवासी नाही. या अंगाने काही चर्चा होणं आवश्यक आहे. या सगळ्यांवर चर्चा करून जर काही आपल्याला मांडता आलं तर आदिवासी विकासाचा विचार वेगवेगळ्या पातळ्यांवर करता येईल.

• • •

# आदिवासींचे विस्थापन

**उल्का महाजन**
(सर्वहारा जनआंदोलन, रायगड )




जंगलाचा प्रश्न, आदिवासींच्या संस्कृतीवर होणाऱ्या आक्रमणाचा प्रश्न हा जसा आपण गेली अनेक वर्षे चर्चा करतोय आणि तो मूलभूत व अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे, तेवढाच दीर्घकाळ आणि अतिशय तीव्र राहिलेला प्रश्न आहे, तो म्हणजे विस्थापनाचा प्रश्न. देश स्वतंत्र झाल्यापासून ज्या-ज्या परियोजना, प्रकल्प आलेले आहेत त्यांच्यामध्ये जमिनी जाणं आणि विस्थापित होणं यांच्यामधलं संकट आणि दुख: जेवढं आदिवासींच्या वाट्याला आलंय तेवढं अन्य कुठल्या नाही.

आपण आकडेवारी जरी सातत्याने विस्थापित होत राहिलेला वर्ग आहे, तो आदिवासी समाज आहे. कारण आदिवासी जिथे आहेत तिथेच नैसर्गिक संसाधनाचं केंद्रीकरण आहे. आदिवासी ज्या संसाधनांबरोबर राहतात त्याच्यावरच डोळा असल्यामुळे आणि त्या संसाधनांची लूट चालू असल्यामुळे विस्थापन हा विषय सातत्याने आदिवासींसमोर उभा आहे. ब्रिटीश गेल्यानंतरही आपण आपल्या कायद्यामधून, धोरणामधून तोच दृष्टीकोन कायम ठेवला आणि नैसर्गिक संसाधनांना क्रयवस्तू बनवलं, हा आदिवासींच्या विस्थापनाचा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा होतो. त्यातून होणारं आक्रमण हा एक भाग झाला.

दुसरा भाग म्हणजे सामुहिकतेवर होणारं आक्रमण. याच्यातून होणारं विस्थापनही मोठया प्रमाणावर आहे. सामुहिकता तोडणं, व्यक्ती-व्यक्ती सुट्या करणं आणि मग त्यांना उखडणं सोपं जातं. एका बाजूला प्रत्यक्ष विस्थापन आणि दुसरं म्हणजे सामुहिकता तोडून होणारं विस्थापन. अशाप्रकारे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष ही दोन्ही प्रकारची विस्थापने आदिवासींच्या वाट्याला येतात. त्यात आपल्याला असं दिसतं की एका बाजूला संसाधनांची लूट आणि दुसऱ्या बाजूला कौशल्याची पण लूट. हातात असणारी साधनं आणि त्यावर काम करण्यासाठी लागणारं पारंपरिक कौशल्य, त्या कौशल्याचं सुद्धा हिरावलं जाणं. त्यामुळे ते उत्पादन आणि त्या उत्पादनाची प्रक्रियाच हातातून निसटणं हेही मोठ्या प्रमाणात दिसतं. चंगळवादी मूल्य व्यवस्थेचं आक्रमण तर सर्वच समाजावर होताना दिसतं, ज्याचा बळी निसर्ग आणि आदिवासी आहे.

२००४ चं आदिवासी धोरण चाळताना जाणवलं की वर्षानुवर्ष धोरणाचा गाभा तोच, त्यातून आपण उभे करत असलेले प्रश्न पण तेच, आणि त्यातून फारसा काही बदल घडतय असं दिसत नाही. सकारात्मक बदलाच्या ऐवजी थोपल्या जाणाऱ्या आक्रमणाचं प्रमाण मात्र प्रचंड वाढतंय. २००४ पासून एकच सकारात्मक

बदल म्हणता येईल, तो म्हणजे जंगलावरच्या आधिकाराची बाब कायद्याने पुढे आली आणि त्याचा वनहक्क झाला. त्याच्या अंमलबजावणीत सुद्धा आपण बघतो की इतके अडथळे आणले जातात की ती सुद्धा पुढे सरकत नाही. निदान वनाधिकार मान्य होणं आणि historical injustice ऐतिहासिक अन्याय झालेला आहे अशी मान्यता, धोरणात्मक पातळीवर मिळणं ही पण एक पुढे गेलेली वाट दिसते. आता जी धोरणं येऊ घातलीत त्याच्यामध्ये आता थोडं-थोडं संपादन हा भागच राहिलेला नाही. खाणींमुळे झालेलं संपादन हे आपण अनुभवलेलं आहे. गेल्या दशकापासून सुरू झालेलं आहे.

त्याचं एक रूप आपण पाहिलं, या Special Economic Zone नावाने. प्रचंड मोठ्या प्रमाणात हजारो हेक्टर जमीन ताब्यात घेतली जाणं आणि infrastructure development च्या नावाखाली, निर्यात वाढवण्याच्या आणि औद्योगिकरण वाढवण्याच्या नावाखाली हे प्रकल्प आणले जातात; पण प्रत्यक्षात जिथे संसाधने आहेत, infrastructure आहे, जिथे हे प्रकल्प मोठ्या प्रमाणावर थोपले जातात. देशात ज्याला formal approval मिळालं आणि जे notified झाले असे हजारच्या जवळ SEZ मंजूर झालेत. आणि ६००-७०० पाईप लाईनमध्ये आहेत, ते कधीही मंजूर होण्याची शक्यता आहे.

जिथे संपादनाला विरोध झाला तिथे थोपवलं गेलं. मी २२ वर्ष आदिवासी भागात काम करत आहे. आम्ही जेव्हा कामाला सुरूवात केली त्यावेळी आमचा अनुभव होता की, सुरूवातीचे लढे जमीनदारांविरूद्ध होते, खोतांविरूद्ध होते, मोटेल संस्कृती मुंबईच्या जवळ असल्यामुळे येत होती; त्याचं आक्रमण याप्रकारचे लढे होते. त्यानंतर औद्योगिकरणाचं आक्रमण अनुभवलं. त्यानंतर दौर आला तो Special Economic Zones (SEZ) चा. त्याच्यामध्ये ३५ हजार एकर जमीन, एवढं मोठ्या प्रमाणात संपादन होत होतं. Reliance जे प्रस्थापित करत होतं ते SEZ परतवून लावून कुठे स्थिरावतोय, तोच कित्येक पटींनी मोठं असं आक्रमण येतंय, त्याचं नाव आहे दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरिडॉर.

हे जे प्रकरण येऊ घातलंय देशभरात, त्यामध्ये ४ मोठे कॉरिडॉर आहेत, दिल्ली-मुंबई, दिल्ली-कलकत्ता, चेन्नई-बेंगलोर आणि चौथा मुंबई-बेंगलोर. त्या एका एका कॉरिडॉरचं क्षेत्र बघितलं तर दिल्ली-मुंबई कॉरिडॉर १४८३ किमी लांबीचा कॉरीडॉर आहे. आणि दोन्ही बाजूला १५०-१५० किमी म्हणजे ३०० किमी रूंदी आणि १४८३ किमी लांबी. त्याच्या Concept note मध्ये असं म्हटलंय की, त्याचं क्षेत्र ४ लाख ३६ हजार ४८६ चौ. किमी आहे. १०० चौ. किमी म्हणजे १०,००० हेक्टर. यात असं म्हटलंय की, त्याचे २४ nodes निश्चित केलेले आहेत. त्यामध्ये १२ investment region म्हणजे गुंतवणुकीची क्षेत्र आणि १२ industrial area म्हणजे औद्योगिक विभाग. एक investment region हा Minimum २०० चौ. किमीचा असणार आहे. आणि एक industrial area हा १०० चौ. किमीचा असणार आहे.

दिल्ली-कलकत्ताचं क्षेत्र आहे ३ लाख ८६ हजार चौ. किमी. चेन्नई-बेंगलोरचं नक्की नाही आणि मुंबई-बेंगलोर आता प्रस्तावित केलाय त्यामुळे ते अजून कळायचं आहे. त्यामध्ये वेगवेगळे special economic zone, national manufacturing zones, power plants, infrastructure development, पंचतारांकित कॉलनीज, टाऊनशिप असा प्रचंड मोठा प्लॅन आणि कितीतरी आता airports. कुठे जंगल अधिकाराखाली दावे करून काही हाताशी लागतंय, अशी सुरूवात होते ना होते तोच हा कॉरिडॉर येतोय. त्या असलेल्या क्षेत्रामध्ये असेल नसेल

ते धुऊन काढतील इतक्या वेगाने ही काम सुरू आहेत. या प्रचंड मोठया योजनांचे परिणाम हे चक्रवाढी लूट आहे, त्यातल्या construction ला माती, रेती, दगड वापरला जाणे, जमीनीची धूप होणे; हे सगळे परिणाम हे सामाजिक, आर्थिक, पर्यावरणीय, livelihood म्हणजे जीविताचं हिरावलं जाणं असेल. असे पटींमध्ये हे परीणाम आहेत. यामध्ये आदिवासींचं विस्थापन तर आहेच; पण शेतीवर अवलंबून असणाऱ्या विविध ग्रामीण समुहांचे अधिकार हिरावलं जाणं हेही असेल.

यात त्याला आधारभूत दोन गोष्टी आणल्या, म्हणजे, special economic zone चा कायदा केलाय आणि त्यानंतर national manufacturing zone या नावाने policy आणली. ते धोरण मुळातूनच वाचण्यासारखं आहे. जंगलात राहणाऱ्या आदिवासींना आणि समूहांना अधिकार मिळाला पाहिजे आणि ऐतिहासिक अन्याय दूर झाला पाहिजे म्हणून आपण ३० वर्षांच्या आधीपासून लढत आहोत, झगडत आहोत. तेव्हा आता कुठे हा कायदा झालाय SEZ चा. कायदा मात्र दीड दिवसात पास झाला; लोकसभा, राज्यसभा दोन्ही सभागृहांमध्ये.

Manufacturing zone च्या policy मध्ये केलेली शिफारस अशी आहे की, यासाठी लागणाऱ्या जंगल जमीनीची मागणी केल्यानंतर एक वर्षाच्या आत नाही मिळाली तर, 'मिळाली' असं मानन्यात यावं, अशी शिफारस आहे. Ground water extraction ACT बदलण्यात आलेला आहे. जमीन, जंगल आणि पाणी याबद्दलचे कायदे मोठया प्रमाणात बदलण्यात येत आहेत. हे सगळं बघताना, वाचताना हबकून जायला होतं की हे कुठे जाणार आहे, याची दिशा कुठे आणि कशी असणार आहे. आतापर्यंत आदिवासी यामध्ये भरडले जात होते; पण आता सूपात असलेल्या अनेकांना भरडलं जाण्याची शक्यता आहे.

जमीन लूट हा तर जागतिक अजेंडा आहे आणि त्याच्याबद्दल जागतिक बँकेने त्याचे document काढलेले आहेत. ही आव्हानं डोळयासमोर ठेऊन विस्थापन या गोष्टींची चर्चा घडावी असं मला वाटतं. जसं SEZ आणि manufacturing zone आहे, तसं तिसरा जो चेन्नई-बेंगलोरचा कॉरिडॉर प्रस्तावित आहे. पेट्रोकेमिकल, पेट्रोलियम investment region साठी ज्याला PCPIR या नावाने ओळखलं जातं, त्यातही असंच १५० ते २०० चौ. किमी चं एक-एक क्षेत्र असावं अशी तरतूद आहे आणि petrochemical साठी संपूर्ण समुद्रकिनाऱ्याची जी पट्टी आहे; म्हणजे गुजरातपासून पश्चिम बंगालपर्यंत ती सगळी आरक्षित केली आहे. समुद्रकिनारपट्टीसुद्धा याच्या प्रभावाखाली आहे.

या सर्व पट्ट्यांमध्ये SEZ असेल, किंवा कॉरिडॉरचे सगळे nodes असतील. तिथे आता एक प्राधिकरण स्थापन केलं जाणार आहे आणि त्या प्राधिकरणावर लोकशाही पद्धतीने निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना जराही वाव असणार नाही. एकही त्यात लोकप्रतिनिधी असणार नाही. त्यात सगळे नोकरशहा आणि त्या वसवणाऱ्या कंपनीचे प्रतिनिधी, यांचंच ते प्राधिकरण आहे. त्याला अनेक अधिकार देण्यात आलेले आहेत. यामध्ये जपान सरकारचा २६% वाटा आहे. त्यामुळे जपान सरकारचे आणि जपानी कंपनीचे प्रतिनिधी पण त्या प्राधिकरणावर आहेत. तसेच त्या-त्या नोडमध्ये त्यांनी international कंपन्यांना contract दिलेली आहेत. तिथली प्राधिकरणं जी स्थापन केली जातील त्याचा प्रमुख कमिशनर असेल.

कमिशनरला त्या सगळ्या परिसराचा कारभार

आणि त्याचे सर्वाधिकार असतील. त्या क्षेत्रातल्या पंचायत यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था या सगळयांच्या अधिकारावर या प्राधिकरणामुळे गदा येणार आहे. कारण त्यांना अतिशय कमी अधिकार दिलेत. कागदोपत्री तर ते आता असं काही म्हणत नव्हते; पण आपण अंदाज बांधू शकतो की असे पट्टेच्या पट्टे जर त्यांना चालवायला दिले आणि जे SEZ च्या कायद्यात सुद्धा म्हणून ठेवलेलं आहे की, याला जे कायदे सुसंगत नसतील त्याच्याआड येणारे कायदे हे notification द्वारे बदलण्यात येतील. ती notification संसदेसमोर मांडण्यात येतील. पण amendment च्या गोष्टी त्यात नकोत. notification जरी केलं जाईल आणि ठरवलं जाईल की, या कायद्याच्या अमूकच एक भाग या SEZ ला लागू आहे किंवा नाही. याचा अर्थ असा की, लोकशाही यंत्रणेची गळचेपी आणि लोकशाही प्रक्रियांची मुस्कटदाबी हा त्यातला एक भाग आहे. त्यामुळे ते एक पॅकेज आहे. हे जे आज जागतिक भांडवली यंत्रणा पुढे घेऊन म्हणतात की, आम्हाला कामगार कायद्याची अडचण नको, पर्यावरण कायद्याची अडचण ठेऊ नका, निर्णय प्रक्रियेमध्ये अडथळे नको, उलाढाल करायला मोकळा वाव द्या. आणि १० वर्षात.... कारण १० वर्षात त्यांना फार सवलत आहे. कुठलाही कर नाही. त्यामुळे ते एक प्रकल्प दाखवून त्यासाठी माती, रेती, दगड जेव्हा उपसतील, तेव्हा ते दुसरीकडे कसं divert करतील हे आजही आपण अनुभवतो. यांना जर रॉयल्टी बसवायची नाही तर अजून किती करतील हे आपण नुसते अंदाजच बांधू शकतो. या अशा वातावरणात हक्काचे, संसाधनांचे, सामुहिकता जपण्याचे, या देशाच्या राज्यघटनेच्या तत्वाचे, टिकवण्याचे लढे आपल्याला लढवायचे आहेत.

• • •



## आया-बा माझे कस्टाचे धनी

रोजचे जानं माळात सगळी
दारोठा करुनं भुयं भुजली
धान्य पिकवायलं...
बयं पिरंती हाती घेनं पंजं
आदर पंजाटाय आया–बा माझं
आठवून कनसरीलं...
मिरीग नकितर टिव टिव करं
भुयं सुकी ढेपुळ वली ती होयं
राब उगवायलं...
कोंबडा आरवं आया माझी उठं
उठलेवर बाची नांगराशी गाठं
भुय चिरणीलं...
उंदीर–घोडेवर नकिंतरा बाली
सेतां पानेनी आरवीं भरली
आवनी करायलं...
लाहा लाहा आरवीं रोपां वाढली
रवनुनं वरी लावंली नागंली
घेनं मानसाहंलं...
तरी–उडदां पिकां पिंकली
जोरं धरुनं हुरडेतं जोंधळी
आम्हांलं जगवायलं...
सेपाटली पारवा, गुरां–चोराहंलं
पोसंली सेतां, जसा पोशेहंलं
दिसं रातरीलं...
पानेची पाहळी कमी नायं झाली
पडून जोऱ्हात पिकां नासली
रडवला सगळेहंलं...
कस्ट आया–बा चे पानेतं गेलं
बोचकी बांधून गेली धंदेलं
पैसं कमवायलं...
धंदेलन जानं काम बुहू केलां
पगार करायचां दिस उजडलां
ठगवला हिशेबातं...
कस्टी नोको बा कसेचाही भेव
आता मालं तू साळा शिकवं
आपलं दिसं हे बदलायलं...



**श्री. रवी लक्ष्मण बुधर (प्रा.शि.)**
कोगदे, ता. जव्हार, जि. ठाणे
*('समर्पण' काव्य संग्रहातून)*

# आदिवासींचे सांस्कृतिक धोरण

**श्री. सुनिल कुमरे**
(आदिवासी लेखक व समीक्षक)

महाराष्ट्रातील वेगवेगळया क्षेत्रातून आलेले कार्यकर्ते बंधू आणि भगिनींनो, आदिवासींचे सांस्कृतिक धोरण कसं असावं यासंदर्भात आपण याठिकाणी चर्चा करणार आहोत. यापूर्वी आपण आदिवासी विकासाचे धोरण कसे असावे, कसे असले पाहिजे यावर देखील एक सारासार चर्चा केलेली आहे. मागील सत्रामध्ये चर्चा करताना एक लक्षात आले असेल की आपण ज्या आदिवासींसाठी काम करत आहोत, या माणसाला स्वत:च्या पायावर नीट उभेही राहता येत नाही. तो जंगलात राहतो. पहाडात राहतो. त्याला त्याच्या अत्यंत क्षुल्लक अशा ज्या गरजा आहेत त्या पूर्ण करता येत नाहीत. कोणताही आत्मसन्मान या माणसामध्ये नाही. जगण्याचे कोणतेही तंत्र त्याला अवगत नाही. समाजाच्या आणि राष्ट्रीय प्रवाहाच्या सर्व प्रवाहातून हा माणूस फेकला गेलेला आहे आणि म्हणूनच आपण सर्व स्वयंसेवी संस्था वेगवेगळे प्रकल्प घेऊन या माणसाला उभं करता येईल का, हा प्रयत्न आपण करीत आहोत.

यामध्ये ज्या काही स्वयंसेवी संस्था काम करत आहे, त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. त्यांनी आपल्या आयुष्याचा बराचसा वेळ इथे खर्च घालत आहेत. परंतु दुसरी बाब ही आहे की, आदिवासी माणूस आदिवासी माणसासाठी काही करीत नाही, हे देखील इथे नोंदले पाहिजे. गेल्या स्वातंत्र्योत्तर जवळपास ५० ते ६० वर्षाच्या कालावधीत आदिवासींनी काम केले नाही का ? तर केले आहे, भरपूर काम केलेले आहे. गेल्या ४०-५० वर्षांपासून वाहरू दादा सोनवणे काम करीत आहेत आणि डॉ. तुमराम हे स्वत: ३५-४० वर्षांपासून काम करत आहेत. आणि मग आदिवासींचा विकास झाला की नाही हाही एक महत्त्वाचा प्रश्न आहे.

सांस्कृतिक धोरणावर बरेच काही बोलण्यासारखे आहे. परंतु एकंदरीत आदिवासींना, आदिवासींच्या वेगवेगळया धोरणावर बोलण्याची गरज काय, आणि ती कोणी मांडायची? आदिवासी माणूस हे प्रगल्भपणे मांडू शकतो काय? आदिवासींच्या किती संस्था आहेत आणि त्यांनी काय-काय काम केलेले आहे, हे जर पाहिले तर रचनात्मकदृष्टया आदिवासींचे काम हे शून्य दिसेल. आपल्याला सामाजिक आणि साहित्यिक, सामाजिक पातळीवरचेही काम अत्यंत कमी दिसते. मुळात कामे झालेली आहेत. परंतु त्यांची नोंद शासन दरबारी झाली नाही. हे सर्व आदिवासी नेते, आदिवासी सामाजिक चळवळीतील कार्यकर्ते मंडळी ही सतत काम करत आहेत आणि त्यांना कोणताही शासकीय पुरस्कार किंवा त्यांची कोणती दखलही व्यवस्था घेत नाही.

आदिवासी साहित्याची चळवळ जी राबविली महाराष्ट्रामध्ये, महाराष्ट्रात म्हणण्यापेक्षा भारतामध्ये, पहिले साहित्य संमेलन भद्रावती येथे डॉ. तुमराम सरांनी घेतले आणि आणि आज संपूर्ण महाराष्ट्रामध्ये वेगवेगळया विद्यापीठामध्ये आदिवासी साहित्याची चळवळ रूजू झाली. ५० ते ६० कवी, लेखक आज चळवळीमध्ये राबून राहिले आणि एक आशादायक चित्र या महाराष्ट्रात निर्माण झाले. साहित्य चळवळ निर्माण करताना काय-काय कष्ट झाले, हे आपण सर्व इथे, वाहरू दादा आहेत आणि इतरही कार्यकर्ते आहेत त्यांना माहीत आहे. परंतु ही चळवळ आम्ही टिकवू शकलो का? आदिवासी साहित्याची चळवळ १९७९ ला सुरू झाली आणि आज जवळजवळ ३० ते ३२ वर्षांचा कालावधी झाला. किती साहित्य संमेलने आदिवासी साहित्याची झाली आहेत? आज आदिवासी साहित्य परिषद ही नामशेष झाली.

वणीला आपण परिषद घेतली होती आणि ती पुनरुज्जीवित करण्याचाही प्रयत्न केला होता. पुष्पाताई आत्राम इथे आहेत. पण ती पुनरुज्जीवित होऊ शकली नाही. त्यानंतर आम्ही स्वत:ची, त्यानंतरही दोन-तीन साहित्य संमेलने झाली; परंतु एखाद्या विशिष्ट राजकीय पक्षाच्या दावणीला बांधण्याचाही तो प्रयत्न झाला.

आणि म्हणून आम्ही स्वतंत्ररित्या २०११ मध्ये नवीन संस्था, संघटना आदिवासी साहित्याचा मंच उभारला ''आदिवासी साहित्य जागर आणि जतन अकादमी'' नावाने. आणि त्याचे पहिले साहित्य संमेलन, मी त्याचा स्वत: संयोजक होतो, चंद्रपूर येथे घेतले होते. ते संमेलन आणि आत्ताच २०१२ मध्ये एक संमेलन घेतले भंडारा येथे १७ नोव्हेंबरला. ही चळवळ आम्हाला सातत्याने राबवून राहावी लागली. खरं तर कविता संग्रह भरपूर आले, कविता भरपूर झाल्या आदिवासींच्या; परंतु समीक्षात्मक लेखन नाही. डॉ. तुमराम यांचे 'आदिवासी साहित्य स्वरूप आणि समीक्षा'हे आणि आता आलेले जे पुस्तक आहे 'आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन' हे मूलभूत जर दोन ग्रंथ सोडले, तर आदिवासींचे साहित्य क्षेत्रातील, वैचारिक क्षेत्रातील, समिक्षा क्षेत्रातील ग्रंथ आदिवासी साहित्याच्या दालनात नाही, ही फार मोठी ऋण बाजू आपल्या आदिवासी साहित्य क्षेत्रामधील आहे.

कथा नाहीत, कांदबऱ्या नाहीत, वैचारिक लेखन नाही, नाटकं नाहीत. रंगभूमी खूप लांब आहे आदिवासींची. केदारींसारखी फार मोजकी लोकं असतील, जी रंगभूमीच्या संदर्भात काम करत आहेत. त्यांचा चित्रपट आपण 'आत्मबोध' पाहिला, डॉ. तुमराम सर आणि मी स्वत: तो संपूर्ण परिसर आम्ही त्यांना दाखविला आणि काय आदिवासींचे दु:ख आहे, भामरागडातील आणि लाहेरीतील, नक्षलवाद्यांचे काय म्हणणे आहे, हेही या सांस्कृतिक धोरणामध्ये समाविष्ट व्हायला हवेत. आदिवासींचे अनेक नेते आहेत, कामे केलीत ना त्यांनी; परंतु त्यांची नोंद नाही झाली. त्यांच्या नावाने महाराष्ट्र शासन किंवा केंद्र शासन पुरस्कार वितरित करायला तयार नाहीत.

नारायण सिंह उईके सारखा एक ज्येष्ठ नेता आहे. त्यांच्या नावाखाली आम्ही काम करीत आहोत. अंबरदादा असतील किंवा गुलाब महाराज असतील यांच्या नावाचा उदोउदो महाराष्ट्र सरकार करीत नाहीत. सांस्कृतिक धोरणात ते देखील आलं पाहिजे. त्यांचे रेला नृत्य असेल, गोंड गुरडांचे एक पारंपरिक वादन आहे टिंगरीवरचे, जे रात्र-रात्र बसून त्या कथा सांगतात, जुन्या कथा सांगतात, ते देखील या सांस्कृतिक धोरणात यायला हव्यात. साहित्य क्षेत्रे सांस्कृतिक धोरणात यायला हवीत. आदिवासींचे वीर पुरूष आहेत, महापुरूष आहेत, जे स्वातंत्र्यासाठी लढले. हजारोंच्या संख्येने नावं देता येतील, एवढा मोठा आदिवासी क्रांतिकारकांचा समूह या देशामध्ये आपल्या नोंदीसाठी, घटनात्मक अधिकारासाठी आणि त्यांच्या केलेल्या कार्याचा गवगवा होण्यासाठी तयार आहे. आणि तरीदेखील ही सर्व मंडळी आदिवासींचा सांस्कृतिक इतिहास एक उपेक्षितपणे या देशामध्ये ताटकळत आहे. म्हणून या सर्व सांस्कृतिक धोरणाची एक चर्चा या विचार मंचावरून व्हायला पाहिजे.

आणि खरं पाहिलं तर या जागतिकीकरणामध्ये, आम्ही भंडाऱ्यामध्ये तोच विषय ठेवला की जागतिकीकरणात आदिवासींचे भविष्य काय? म्हणजे साध्या कुपोषणापासून, शिक्षणापासून, आरोग्याचे प्रश्न, हे जगण्या-मरण्याचे जरी प्रश्न असले तरीपण त्याच्यात अस्मिता आणि आत्मसन्मानाची चळवळ आहे. ही चळवळ मात्र आदिवासींच्या साहित्य चळवळीतून, धार्मिक चळवळीतून उभारणार आहेत. २००१ मध्ये मूल येथे डॉ. तुमराम सरांनी पहिली घोषणा केली होती की, आदिवासी धर्माचे पुनरुज्जीवन करायचे आहे आम्हाला आणि म्हणून आम्ही २००१ मध्ये ती घोषणा केली. त्याचे अध्यक्षीय भाषण आहे 'हाकारा' मध्ये.

आणि त्यांनतर २०१० ला आम्ही भारतातील पहिली धर्म चळवळ, संपूर्ण महाराष्ट्रातील वेगवेगळया जमातीच्या लोकांना बोलविले आणि त्यांचे आदिवासी धर्माचे काय प्रारूप असायला हवे हया संदर्भात एक फार मोठी चर्चा गडचिरोली येथे आम्ही घेतली होती. वाहरू दादा होतेच, आणि महाराष्ट्रातील वेगवेगळया जमातीच्या लोकांनी त्या विषयावर चर्चा केली, त्याचे लाईव्ह रेकॉर्डिंग आज माझ्याकडे आहे. या सांस्कृतिक चळवळीमध्ये, सांस्कृतिक धोरणामध्ये आदिवासींच्या साहित्यिक, धार्मिक आणि २१ व्या शतकामध्ये आदिवासी माणूस कसा आपल्या पायावर उभा राहणार आहे आणि आपल्या आत्मरक्षणासाठी जर नेटाने उभा राहिला, तर मला वाटत नाही की, आपल्यासारखे जे वेगवेगळे प्रकल्प आहेत ते तिथे राबविण्याची गरज पडेल. खरंतर त्याच्या शैक्षणिक, सांस्कृतिक धोरणातच त्याचा विकास दडलेला आहे. मगाच बोलता-बोलता वनवासीकरणाचा मुद्दा राहून गेला. एक मुद्दा आला होता, आदिवासी माणसांना गेल्या हजारो वर्षापासून राक्षस, चपट्या नाकाचे, काळे वनवासी, गिरीजन अशा वेगवेगळया शब्दांनी हिणवण्यात आले. खरंतर ही माणसे या देशातील मूळ माणसं आहेत. या देशातील मूळ धनी लोकं आहेत. त्यांचा असा अपमान होऊ नये, असे मला नोंदवावे वाटते आणि सांस्कृतिक धोरणात या सर्वकष बाबींची नोंद झाली पाहिजे एवढं बोलतो आणि इथे थांबतो. जय सेवा, जय वृक्ष!

## श्री. कुंडलिक केदारी

(आदिवासी लेखक व नाटककार)



आदिवासींचे सांस्कृतिक धोरण हा आदिवासी विकास धोरणाचाच एक घटक मी मानतो. कारण त्या सांस्कृतिक वैशिष्टयांमुळेच आदिवासी संस्कृतीला विशेष महत्व आहे. म्हणूनच आदिवासी विकास धोरणातच सांस्कृतिक धोरणाला स्थान मिळावं असं वाटतं.

सांस्कृतिक वैशिष्टये काय, त्यांची गरज काय याविषयी आधीच्या वक्त्यांनी स्पष्ट केलेलं आहे. त्यामुळे त्यावर मी अधिक वेळ घेत नाही. आदिवासींच्या धोरणामध्ये आदिवासींची भाषा, बोली, कला, संगीत, नृत्य, नाटय आणि आदिवासी परंपरा या सर्वांचा आदिवासी धोरणात समावेश व्हावा ही प्रथम मागणी आहे. ती कशा पद्धतीने असावी, तर आदिवासींच्या बोलीमध्ये ४५ जमातींच्या ७४ बोलीभाषा आहेत. असं म्हटलं गेलंय, लिहिलं गेलंय. काही मराठी, तर काही मराठी सारख्या व भिन्न सुद्धा आहेत. आदिवासी साहित्यामध्ये मौखिक साहित्यामध्ये त्यांची नृत्य, गीते, लग्नगाणी, कन्यादान गीते किंवा अशाप्रकारची अनेक गीते आहेत. त्यांचं संवर्धन आणि संरक्षण करण्यासाठी एक उपयोजना असावी. कारण पंरपरेने जी मौखिक गाणी आलेली आहेत, त्यांचं रेकॉर्डिंग कुठेही झालेलं नाही. पुढे ५० वर्षांनंतर लोकांना हे मिळणे कठीण आहे. जागतिकीरणाच्या झपाटयाखाली हे सर्व नामशेष होत आहे. आदिवासी विकास खात्याने नागरिकांच्या सनदीमध्ये याचा उल्लेख केलेला आहे की, या गोष्टी जतन करू; परंतु प्रत्यक्षात कार्यवाही मात्र होताना दिसत नाही. आदिवासी संशोधन व प्रशिक्षण

संस्थेने किती गोष्टी तयार केल्या आहेत व किती बाकी आहेत, हे पाहिले तर अजून बऱ्याच गोष्टी करायच्या राहून गेलेल्या आहेत. त्यात मौखिक साहित्याचं जतन महत्वाचं आहे. लिखित साहित्यात आता अनेक प्रकार येऊ लागलेत. त्यात कथा, कादंबरी, नाटक, समीक्षात्मक असे अनेक विषय आहेत. आदिवासी नृत्यामध्येही अनेक प्रकार आहेत - उदा. रेलॉ, ढेमसा, खारपा, जुल्फा इत्यादी. काही गोष्टी परंपरेने आलेल्या असल्याने त्यांचंही संरक्षण आणि संवर्धन व्हायला पाहिजे. संरक्षण करण्यासाठी शासकीय पातळीवर प्रयत्न व्हायला पाहिजे. आणि संवर्धन ही शासकीय पातळीवरची बाब नव्हे; आदिवासींनीच ते सर्व टिकवून ठेवणं आणि वाढवणं गरजेचं आहे.

नाटकांच्या बाबतीत आपल्याकडे बोहाडा, दंडार, तमाशा वगैरे याही गोष्टी काळाच्या ओघात नष्ट होण्याची शक्यता आहे. त्याचं पुनरुज्जीवन करण्याची जबाबदारी आपल्यावर आहे. त्याचबरोबर संरक्षणही जरूरीचे आहे. कलांच्या बाबतीतही फारसं वेगळं चित्र नाही. वारली कला सर्वांना माहीत आहे; पण आदिवासींमध्ये इतरही कलात्मक आहे, तिचा नामोल्लेख होताना फारसा दिसत नाही. धोरणात याही गोष्टींनाही स्थान असावे. याशिवाय या सर्वांच्या उत्थानासाठी वेगवेगळे मेळावे, उत्सव, शिबीरे इत्यादींतून आदिवासींचं गठन केलं जावं. आजची परिस्थिती पाहिली तर आदिवासींनी शिबीरे, मेळावे घेणं त्यांच्या आवाक्याबाहेरचं आहे. मराठी साहित्य संमेलनांना कुठेही, कधीही पैसे मिळालेले नाहीत. आदिवासी विकास खात्याला लोकसंख्येच्या प्रमाणात स्वतंत्र बजेट आहे. आणि योजनाही खूप आहेत. मग या विभागाने सांस्कृतिक योजनांवर फार खर्च केला असल्याचे दिसत नाही, असं माझं वैयक्तिक मत आहे. कारण त्यांना जर विचारलं की, तुमच्या सांस्कृतिक योजना काय आहेत, तर त्याचं उत्तर नकारार्थी आहे. म्हणून आमचं म्हणणं आहे की, आदिवासी विभागाच्या स्वतंत्र बजेटमध्ये आदिवासींच्या सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र बजेट असावं, असं वाटतं. अन्यथा या जागतिकीकरणामध्ये आदिवासींच्या या लोककला, संगीत, नृत्य लोप पावल्याशिवाय राहणार नाही. त्याचबरोबर आदिवासींच्या परंपरेतली काही सांस्कृतिक वैशिष्टये आहेत, उदाहरणार्थ माडियांमधील गोटूल, कोरकूंमधील चिडोली इ. अशा अनेक गोष्टी आदिवासींमध्ये आहेत. सामुहिक पद्धतीने करावयाच्या अनेक गोष्टी केवळ आदिवासींमध्ये आहेत. या सर्व गोष्टी जपण्याची आवश्यकता आदिवासींमध्ये आहे, तसेच शासकीय पातळीवर देखील त्याचे संरक्षण व संवर्धन कसे होईल, हे पाहण्याची जबाबदारी आहे. तेवढीच ती आपली सुद्धा आहे.

संस्कृतीच्या नावाखाली आदिवासी तरूणांना 'बेंजो सेट' दिला जातो. त्यांनी दारू पिऊन त्यावर नाचावे, अशी अपेक्षा जर आदिवासी विभाग करत असेल तर दुर्दैवाची गोष्ट आहे.

• • •

# आदिवासींचे सांस्कृतिक धोरण

**प्रा. डॉ. विनायक तुमराम**
(ज्येष्ठ आदिवासी साहित्यिक-विचारवंत)



आदिवासी माणसाच्या रक्तात बेईमानी नाही. अजूनही नम्रता, कृतज्ञता, इमानदारी कायम आहे, त्याची पावती मी देतो आहे. माझ्या विषयाला मी एका शेरपासून सुरुवात करतो.

पंछी ये समजता है की, गगन बदला है । इन्सान ये समजता है की चमन बदला है, लेकिन न तो गगन बदला है, न चमन । लाश वही है, सिर्फ कफन बदला है।

अशी एकंदर परिस्थिती सांस्कृतिक धोरणाची आहे. हा सांस्कृतिक शब्द संस्कृतीपासून निर्माण झाला आहे. संस्कृती कशाला म्हणावं इथून मी सुरुवात करतो. महाराष्ट्र संस्कृती कोश, मराठी विश्वकोश, महाराष्ट्रीय ज्ञानकोश या सर्व ग्रथांमध्ये संस्कृतीची व्याख्या दिली आहे. आणि ज्या-ज्या विद्वानांनी आदिवासी संस्कृतीचा, जीवनाचा, समस्यांचा, वेदनांचा, दुःखांचा, आव्हानांचा अभ्यास केलेला आहे त्या सर्व पाश्चात्य विचारवंतांनी, एतद्देशीय विचारवंतांनी कल्चरची व्याख्या दिलेली आहे. या सर्व व्याख्यांमध्ये महाराष्ट्र संस्कृती कोश यामधली व्याख्या मला फार आवडली. काय व्याख्या करतो आपण संस्कृतीची? तर संस्कृती या शब्दामध्ये ''त्या देशातल्या, त्या देशामध्ये राहणाऱ्या प्रत्येक समुदायाच्या, त्या समुदायामध्ये झालेल्या महारापुरुषांची, विचारांची, त्यांच्या चालीरीतींची, परंपरांची, भाषा, धर्म या सर्वांची ओळख करुन देणारी पारंपरिकता पिढयांपिढयांनी सरकत जाते'' याला आपण संस्कृती असं म्हणतो. आणि त्याच्यामध्ये थोरांचे विचार, साधुसंतांचे विचार, राष्ट्रपुरुषांचे विचार, शहीदांचे, हुतात्म्यांचे विचार या सर्वांचा अंतर्भाव संस्कृती या शब्दामध्ये होतो. या व्याख्येप्रमाणे आपले सांस्कृतिक धोरण काय असले पाहिजे, याचा विचार केला पाहिजे. सुनिल कुमरेंनी त्याला स्पर्श केलश्रला आहेतच, पुढचा विचार मी करतो.

संस्कृतीची साधी आणि सोपी व्याख्या मी करतो. माणसाच्या पोटाला भूक लागली असताना जेवण करणं, वेळेवर जेवण करणं याला म्हणतात प्रकृती. परंतु भूक लागली नसताना हॉटेलमध्ये, रेस्टॉरंटमध्ये, बारमध्ये जाणं आणि कचाकचा खाणं आणि पोट फुगवणं याला म्हणतात विकृती. पण माणसाच्या पोटाला भूक लागली असताना त्याच्यासमोर पंचपक्वान्न, भाजी, भाकरी ठेवलेली आहे. पहिला घास तोंडात घालणार तेवढयात एखादा भिकारी आला आणि म्हणाला की, 'बाबा मी दहा दिवसांपासून काही खाल्लेलं नाही. मला जेवण दे.' किंवा एखादा पशू-कुत्रा आला असेल आणि तो भुकेला असेल तेव्हा आपल्या पोटातली भूक मारून आपल्या ताटातलं जेवण त्याला देणं आणि त्याची भूक शमवणं, याला म्हणतात संस्कृती.

आदिवासींची संस्कृती मोठी आहे, महान आहे, असं तुम्हीच म्हणता. त्याचं कारण आदिवासी माणसाने या देशामधल्या हजारो वर्षे चिंध्या पांघरूण, झाडाची वल्कलं, लंगोटी नेसून आपलं सारं राज्य तुम्हा लोकांच्या स्वाधीन करून जंगलात, पहाडात आपलं जीवन व्यतीत केल. फक्त सांस्कृतिक धागे तेवढे ठेवले, म्हणून त्याची संस्कृती मोठी आहे. त्याने सर्व दिलं, वाटून दिलं, काहीही त्यांच्याजवळ ठेवलं नाही.

आता पॉलिसी हा शब्द आहे, त्याला पॉलिसीनं बोलणं म्हणजे हातचं काही राखून बोलणं असं म्हणतात. मराठीत 'कशाला पॉलिसी करतो तू' असं म्हणतात. फसवेगिरी अर्थाने. तीच ही पॉलिसी आहे की काय अशी मला शंका आहे. तुम्ही आमचं धोरण ठरवता, जरुर ठरवा, काहीच हरकत नाही; परंतु ते ठरविताना आदिवासी माणूस त्या प्रक्रियेमध्ये आहे की नाही, त्याला आपण किती सन्मान देतो, त्याच्या अस्मिता आणि आस्तित्वाचा किती आपण जागर केला. किती दखल घेतली, याचा विचार थोडाफार गरजेचा आहे. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ही दखल घेऊन राहिली, म्हणून मी या परिषदेचे आभार मानतो.

मित्रांनो, खरं दुखणं काय आहे, आमचा विकास अजूनही झाला नाही, असं जे आपण बोलतो. आम्ही आमचं कल्चर सांगतो, आमच्या भाषा सांगतो, नाटकं सांगतो, गाणी सांगतो. या ठिकाणी मी उल्लेख करतो की, आदिवासींच्या ज्या कल्चर्स आहेत, सिस्टम आहेत या सिस्टममध्ये माडियाच पुरस्कृत हा एक प्रकार आहे. अत्यंत सुंदर असं शिल्प कोरलं जातं आणि मेलेल्या माणसाच्या उरावर, थडग्यावर मांडलं जातं. हे शिल्प यावर मी डिझर्टेशन केलंय आणि मी एम.एस.डब्ल्यू. केलं, त्यावेळेला त्याचे फोटो मी घेतलेत. काय करतात माडिया, की माणूस मेल्यानंतर त्याला पुरतात आणि तेही उत्तर दक्षिण असं पुरतात, पूर्व-पश्चिम नाही पुरत माडिया लोकं. त्याच्या मागे आर्याच्या आक्रमणाचा इतिहास आहे. धारणा ही आहे माडियांची त्याचं डोकं नेहमी दक्षिणेकडे आणि पाय उत्तरेकडे असावेत. याची कारण मिमांसा कधी शोधली का? आपली धारणा ही आहे की, आर्यांचं आक्रमण/आगमन उत्तरेकडून दक्षिणेकडे झालं. आर्य-अनार्यांचा संघर्ष जो आहे त्याच्याशी त्यांच्या धारणा जुळलेल्या आहेत.

एखादा माणूस जर झोपला असेल उत्तर-दक्षिण. दक्षिणेला डोकं करून. शत्रू जर उत्तरेकडून आला तर पटकन उठून तो पाहू शकतो. हीच धारणा मेलेल्या लोकांच्या बाबतीतही या लोकांनी पाडली आहे. पुरल्यानंतर त्या माणसाच्या थडग्यावर सुरेख असा कोरीव स्तंभ त्या ठिकाणी ठेवतात. त्या मेलेल्या माणसाच्या आवडी-निवडी मग तंबाखू झालं, बीडी झाली, गांजा झाला, दारु झाली त्याला आवडणारी वस्त्र झाली, प्रावणं झाली. बाई मेली असेल तर तिला आवडणाऱ्या साडया लावतात सभोवताली. त्याला आपण म्हणतो पुरस्कृत किंवा कलीबंडा हे त्यांचं कल्चर आहे. केवळ माडियांमध्येच आहे अशातला भाग नाही, प्रत्येक जमातीमध्ये आपापल्या धर्म धारणा आहेत, सांस्कृतिक धारणा आहेत.

पश्चिम महाराष्ट्रामध्ये भिल्ल, कातकरी, मेळघाटमध्ये कोरकू वगैरे जमाती आहेत त्यांच्या जात पंचायती आहेत. हाही त्यांच्या सांस्कृतिक जीवनाचा एक भाग आहे. याचाही अभ्यास त्या धोरणामध्ये व्हायला पाहिजे. आणि सर्वांत मोठं हे आहे, हे माझं मी दुर्भाग्य समजतो. वाईट वाटून घेण्यात काही कारण नाही. पण जे लोक आदिवासी संस्कृतीवर, समाजावर पी. एच. डी. करून राहीले, काय करून राहिले, काहीच करत नाहीत. फक्त डिग्री मिळवण्यापुरता पी.एच.डी. चा अभ्यास करतात, बाकी त्या समाजाशी मिळून-मिसळून कधीही कामं करत नाहीत. आपण जे म्हणालात त्या लोकांमध्ये मिसळलं पाहिजे, त्यांची भाषा शिकली पाहिजे, त्यांच्या बरोबर जेवलं पाहिजे, त्यांची सेवा केली पाहिजे. हा

प्रकार पी.एच.डी. वाले करतात का? अनेक लोकांना आदिवासी साहित्यामध्ये पी.एच.डी. मिळाली. मी पाहतो त्यांचे प्रबंध आणि त्यांचं वागणं पाहतो. कसलीही त्यांना आदिवासींबद्दल कणव नाही. ग्रॅन्ट मिळते, युजीसीचं फायनान्स मिळतं म्हणून पी.एच.डी. करणं; त्या जातीशी काही देणं-घेणं नाही, त्यांच्या दुःखाशी काही देणं-घेणं नाही. ते कसे जगतात, काय खातात, कसे मरतात काही देणं-घेणं नाही.

ग्रिअर सन सारख्या माणसानी त्यांच्या भाषांचा प्रकल्प राबविला. लिग्व्हीस्टीक सर्वे ऑफ इंडियामध्ये त्या माणसाचं प्रामाणिक कार्य आपण मान्य केलं पाहिजे. तुमच्या पुण्याच्या पद्मगंधा प्रकाशनाने सांस्कृतिक धोरणाचा श्रीगणेशा केला हे माहित आहे का तुम्हाला. त्याला मी खरं धोरण मानतो. त्यांनी काय केलं लिग्व्हीस्टीक सर्वे ऑफ इंडियामध्ये ग्रिअरसन ने जे काम केलं, आदिवासींच्या भाषा व गैर आदिवासींच्या भाषा महाराष्ट्रातल्या यावर खंड काढून राहिलेत ते, १० करोडचा प्रकल्प त्या माणसाने घेतलाय. मनमोहन सिंगांनी फायनान्स केलं आणि त्यामध्ये भिल्लांची भाषा, कोरकूची भाषा, ठाकरांची भाषा, मांगिणी भाषा, परधानांची भाषा, माडियांची भाषा, हलबा-हलबींची भाषा हे सर्व भाषा प्रकल्पामध्ये लेख मागवून घेतले हे आहे धोरण. असं भाषेच्या संदर्भात धोरण सुरु केल्याबद्दल मी त्याचं कौतुक करतो, आभार मानतो.

हलबी भाषेवर एका लेखिकेचा त्यांनी लेख मागितला. तो संपूर्ण लेख कोष्टी भाषेतला होता हे जेव्हा मला कळलं, कोष्टयांनी हलबी म्हणून आमचा हलवा खाल्ला हे सर्वांना माहिती आहे. मी त्यांना म्हणालो, 'सर हे मला मान्य नाही. हा लेख काढून घ्या.' भाषा हळबी नाहीये तर ती आहे हलबी. हलबा आणि हलबी ही जमात महाराष्ट्राच्या गडचिरोली, भंडारा, गोंदिया, काकर, बस्तर हे खरे (ओरिजनल) हलबा-हलबी आहेत. त्यांना विचारात न घेता, जातीने कोष्टी असलेल्या बाईकडून लेख मागीतला. हा आक्षेपार्ह मजकूर आहे.

जगामध्ये त्याचे खंड जेव्हा तुम्ही प्रसारीत कराल तेव्हा कोष्टी हेच हलबा आहेत असा इतर वाचकांचा आणि लोकांचा ग्रह होईल आणि खरे हलबा ठार मरतील. धोरण चुकीच आहे हे जेव्हा मी त्यांना पटवून दिलं तेव्हा त्यांनी तो लेख मला लिहायला सांगितला. मी लिहिला आणि सबमिट केला. त्यासाठी काकर आणि बस्तरला मी स्वतः गेलो. काकर आणि बस्तरच्या हलबी भाषेचं अध्ययन केलं, तेव्हा तो लेख लिहीला. कोष्टी आणि हलबा भाषेमध्ये काय फरक आहे हे प्रमाण सिध्द करून दाखवलं. आश्चर्य वाटेल आदिवासी हलबा-हलबींची भाषा ही काकर, बस्तर आणि छत्तीसगढची राजभाषा आहे. बसतोय का विश्वास तुमचा. संपूर्ण शासनाचा व्यवहार हलबीमध्ये चालतो एवढंच कशाला संपूर्ण छत्तीसगढ, बस्तर या भागात राहणारा इतर समाज सुध्दा हलबी भाषा आपली भाषा म्हणून बोलतो. छत्तीसगढीय हलबी, बस्तरीय हलबी, मराठी हलबी हा लिंगव्हीस्टीक अभ्यास आमच्या सांस्कृतिक धोरणाचा भाग होतो, याकडे जरा लक्ष दया ना.

गोंदण्याची प्रक्रिया हाही आमच्या कल्चरचा भाग आहे. काय सुंदर गाणी आहेत हो त्या हलबा-हलबींची, गोंदणा वरची गाणी दिलेली आहे. हे सारं विश्व जे आहे हे विश्व कुठेतरी शब्दबध्द होतंय. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद या दृष्टीने कार्यरत आहे याचा मला आनंद वाटतो. पण एक मला आता स्पष्टपणे बोललं पाहिजे आमच्यापुढे आमच्या जीवन-मरणाचा प्रश्न आहे. धोरण ठरवा काहीही ठरवा. डुक्कर दया, घोडे दया, काही दया. आदिवासींना प्रकल्प दया हे काही आमच्या कल्याणाचे मार्ग नाहीत. दादांच्या मागच्या गीताप्रमाणे आम्ही आदिवासी ----. तुम्ही आम्हाला डुक्कर देता, घोडे देता, कोंबडया देता, ढोर देता हीच आमची लायकी आहे का? बरं देता तर देता आधिकाऱ्यांची गाडी आली की ''दे रे गोम्या, माडिया आण बरं तुझी कोंबडी.'' कशाला दगडा-मातीच्या

कोंबडया देता आम्हाला. आदिवासी प्रकल्प कार्यालयातून मशिन दिल्या, ट्रॅक्टर दिले. एक दिवस धड ट्रॅक्टर चालू शकले नाहीत, ही दुर्दशा. कसला विकास. फॅक्ट सांगतो टिका नाही करत.

वनं आमची, जंगलं आमची, मालक आम्ही. सारे आदिवासी जंगलामध्ये जाऊन औषधे आणतात. तुम्ही प्रोसेसिंग करता, मेडिसिन बनवता आणि विकता. खरं ज्ञान कोणाला आहे औषधांचं, खरं झाडा-झुडपांचं ज्ञान आहे माडियांना, गोंडांना, हलब्यांना, प्रधान, गोंडांना, कोरकूंना. त्यांनी सारी मेहनत तुम्ही विकत घेता आणि व्यापार करता. काय मिळतं आम्हाला. कसलं धोरण तुम्ही स्वीकारता. कसला आमचा विकास करता. म्हणून आम्ही या निर्णयाला पोहोचला आहोत की, हा काही मार्ग आमच्या कल्याणाचा नाही. म्हणून आंबेडकराचं तत्वज्ञान मी काही मुद्दयांवर स्वीकारलं, सर्व नाही स्विकारलं. काही प्रमाणात मतभेद आहेत. बाबासाहेबांच्या मुद्दयावर मी खुले आम सांगतो. पण त्याच वेळी मी आंबेडकरांना गुरूस्थानी मानतो. आता माझ्यापुढे ३ मार्ग दिसतात जे या विकास प्रक्रियेशी संबंधित नाहीत. या समाजात जर आदिवासींचं आस्तित्व टिकवायचं असेल तर त्यांनी ३ गोष्टी जाणीवपूर्वक करण्याची गरज आहे. हेही आमचे सामाजिक, सांस्कृतिक धोरण आहे याचाही विचार आपण सर्व कराल. पहिलं धोरण म्हणजे आदिवासींचा कायदा या देशात आला पाहिजे. माझी अशी धारणा आहे, माझा असा अभ्यास आहे. Adivasi's are not hindu's, krishchan, Jain, Baudha they are no religion at all. कुठल्याही धर्माचा आदिवासी मूळ माणूस नाही. हजारो वर्षे जंगल आणि पहाडामध्ये बंदीस्त झाल्याने हजारो पिढया गारद झाल्या. आता कुठे माझ्यासारखा एखादा माणूस पांढरे कपडे घालून बोलायला लागला, लिहायला लागला. झाला का आदिवासींचां विकास? नाही झाला. म्हणून आम्ही म्हणतो की ते हिंदू नाहीत, मुस्लमान नाहीत, ख्रिश्चन नाहीत, जैन नाहीत. मग आदिवासींचे घटस्फोट करवतात. सोडचिठ्ठया करवतात, कोर्टामध्ये भांडतात, हिंदूचे कायदे लावता आम्हाला. का हिंदूचे कायदे लावता रे बाबा ? या देशातला मूळ माणूस आदिवासी आहे. आदिवासी कायदा नाही या देशामध्ये. आमचे खटले हिंदूंच्या कायदयाने लावता. धर्मांतर सुध्दा झाले भिल्लांमध्ये तडवी ग्रुप पूर्ण मुस्लमान झाला. त्यांना मुस्लमानांचे कायदे लावता. हे आहे का धोरण. म्हणून मी पहिला मुद्दा माझ्या जीवनात ठरवला की, We want our justices, we want our own law. त्याचं नाव राहिल ट्रायबल लॉ. या दृष्टीने अभ्यासकांनी अभ्यास केला पाहिजे. केवळ पी.एच.डी. साठी अभ्यास करणं हे जर तुमचं ध्येय असेल, तर तुम्ही आमच्या विकासाशी गद्दारी करता, असं मी म्हणेण.

माडियांचं पहा. हे आहेत आदिवासींचे खरे नियम, त्यांच्या पंचायती आहेत, त्यांचे अघोशीत कायदे आहेत. घटस्फोटाचे कायदे आहेत. हजारो वर्षे गोंडांनी राज्य केलं, भिल्लांनी राज्य केलं, महादेव कोळयांनी राज्य केलं. बिना प्रशासनाचे राज्य केलं का या लोकांनी, बिना कायदयाने राज्य केलं का या लोकांनी? बिना धोरणाने राज्य केलं का? सर्वांना धोरण होतं, सर्वांचे कायदे होते, सर्वांच्या घटना होत्या. येऊ दया ना हे धोरणामध्ये. २-४ गाडे जमा झाले, ढोल वाजवले, पुंग्या वाजवल्या झाली का संस्कृती ? हे मला मान्य नाही. म्हणून मी आता कायदयावर पुस्तक लिहीतो आहे ट्रायबल लॉ. एल एल एम ला मी ट्रायबल लॉ घेतला. पीएच.डी. ही त्यावरच करणार आहे. मी जसं आदिवासी साहित्य निर्माण केलं. १० नोव्हेंबर १९७९ ला भद्रावतीला पहिलं आदिवासी साहित्य संमेलन मी घेतलं. आता ९-१० आदिवासी संमेलनं महाराष्ट्रामध्ये झाली. आदिवासी साहित्य हा शब्द विदयापीठामध्ये आला. एम.ए. च्या अभ्यासक्रमाला पुस्तक आहे, ते पुणे विदयापीठाला माझं स्वत:च पुस्तक लागलं. वाहरु सोनवणेंच्या कविता लागल्या. हा आमचा विजय.

आदिवासी कायदा भारताच्या ज्ञान व्यवस्थेमध्ये आम्ही निर्माण करून दाखवितो, हे माझं वचन आहे या परिषदेला. दुसरा आमचा राजकीय पक्ष, त्याच्यावरती मी नाही बोलत, कारण तो गंभीर मुद्दा आहे. आम्ही आता आमच्या राजकीय पक्षाची पायाभरणी करणार. त्रिसूत्री कार्यक्रम आहे. बाबा साहेबांनी म्हटंल होतं शिका, संघटीत व्हा, संघर्ष करा. तीन सूत्रं दिली. मी वेगळया पध्दतीनं तीन सूत्रं मांडली. सगळयात महत्वाचा मुद्दा आहे आमचा धर्म. या देशामध्ये आमचा धर्म निर्माण झाला हे देखील आमच्या सांस्कृतिक धोरणाचे अंग मी मानतो. किती आमची गफलत करुन टाकली आहे या देशामध्ये, चला बरं माझ्या बरोबर भामरागड, एटापल्ली, कोवा- कुडी जरा फिरा तर.

'वनवास कल्याण आश्रम' या संस्था पहा ना धोरण ठरवताना. मी या ठिकाणी महाराष्ट्र विज्ञान परिषदेला आवाहन करेल 'वनवासी कल्याण आश्रम' या शब्दातील वनवास हा शब्द निघाला पाहिजे. हा प्रस्ताव आपण पारित करा, संमत करा. या लोकांना तुम्ही वनवासी संबोधता. आम्ही वनवासी आहोत? अरे वनवासी तो ज्याला राज्य नाही. ज्याला स्वत:च कल्चर नाही. जो सर्व गमावून बसला, जो निराधार माणूस आहे. तो जर जंगलात रहात असेल तर तो वनवासी. रावणाचे शब्द आठवा रामायणा मधले 'तो वनवासी आम्ही वनवासी नाही आहोत.'

वनं आमची, हा भुप्रदेश कुठे गोंडवनामध्ये येतोय. एडवर्ड स्टुअर्ड काय म्हणाला. संपूर्ण आफ्रिका खंड हा गोंडवना लँड आहे. तुम्ही गोंडवनामध्ये रहाता आणि या गोंडवानामध्ये राहात असताना आमच्या कल्चरचा विचार करून राहिलात. काय होऊन राहिलंय हया भागात. या वनवासी आश्रम वाल्यांनी एवढं थैमान घातले, एवढी मुसंडी मारली की आमच्या माडियांची पोरं, गोंडांची पोरं, प्रधानांची पोरं, एका घरून दोन-दोन, चार-चार पोरं त्या आश्रमामध्ये डांबतात. वस्त्र आणि डोके भादरतात, चुट्टी ठेवतात. ज्याला आपण भट संस्कृती म्हणतो. गळयामध्ये जानवे टाकतात. त्यांना दासबोधातील प्रार्थना शिकवतात, वेदामधले स्तोत्र सांगतात. हे वनवासी आश्रमाचे धंदे. हा आमचा कल्याणाचा मार्ग आहे का? काय करायला निघालात तुम्ही आमचं. खच्चीकरण करून राहिलात, वंश विच्छेदीकरण करून राहिले की सांस्कृतिकरण करून राहिले, हा माझ्यापुढे प्रश्न आहे. पंतप्रधानांना लिहिलं, राष्ट्रपतीनां लिहिलं 'वनवासी' या शब्दावर बंदी आणा. आम्ही वनवासी नाही. प्रक्रिया सुरू व्हायची आहे, पण आंदोलन छेडलं जाईल. महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने यात पुढाकार घ्यावा. यापुढे आदिवासी माणसाला वनवासी म्हणण्यात येवू नये. मूळ निवासी म्हणा किंवा आदिवासी म्हणा.

ख्रिचन पाद्री फिरतात, जंगलभर फिरतात, डगले घालून ख्रिचन बनवणं सोप. निरंकारी पक्षाची दीक्षा देतात. आणि हे आमचे भ्याड आदिवासी निरंकारी होऊन राहिलेत. म्हणजे आकारच नाही त्याला निरंकार. आता आम्हाला म्हणतात तुम्ही आदिवासी, नंतर झालो वनवासी, काही दिवसानंतर स्वर्गवासी. तसं हे आता निरंकारी करून राहिले. म्हणते तुझा आकार आता सोड आणि आमच्याकडे ये. हेच तुम्हा लोकांचे धंदे चाललेत. याकडे काही लक्ष आहे का तुमचं? वाहरु दादांच्या प्रदेशात तडवी भिल्ल हजारोंच्या संख्येने मुस्लमान झाले. हे धार्मिक आक्रमण तुम्ही थोपवणार आहात की नाही. आणि म्हणून धर्माचरणाच्या या चळवळी रोखण्यासाठी बाबा साहेबांनी विचार मांडले.

आंबेडकरांनी बौध्दांना, दलितांना बौध्दय केलं आणि भारत बौध्दमय करण्याची प्रतिज्ञा केली होती. मी प्रतिज्ञा करत नाही तशी. धर्माची दीक्षा कशी बाबासाहेबांनी दिली तसा आम्हाला आमचा धर्म स्वीकारावा लागेल. ज्या समाजाला धर्माची ओळख नाही तो समाज जिवंत असला तरी मेल्याहून मेल्यासारखा आहे. चंद्रावर मनुष्य गेला, मंगळावर जातो आहे, सूर्याकडे झेपावून राहिला आहे. विज्ञानाचा विद्यार्थी म्हणून सांगतो, प्राध्यापक म्हणून सांगतो. सूर्याचे सभोवतालचे तापमान ६००० डिग्री

सेल्सीयस आहे. १०० डिग्री तापमानावर पाणी उकळायला लागतं, बोट नाही टाकू शकत आपण. सूर्याच्या फक्त बाहय आवरणाचे तापमान ६००० डिग्री सेल्सीयस आहे. तरी सुध्दा सूर्याकडे यान पाठवण्याची तयारी माणसाने सुरु केली आहे. चमत्कार नाही हा, विज्ञान आहे. अशाही काळामध्ये आपण हा विचार मांडतो आहोत. यासाठी म्हणतो मी, तेव्हा या संपूर्ण प्रक्रियेमध्ये आम्हाला आमचा शोध घेण्याची गरज आहे. आणि आमचा धर्म आम्ही या देशामध्ये उभा करणार आहोत. तुम्हाला वाईट वाटो, किंवा आमच्या नावाने फटाके फोडा, पण आम्ही हे करणार. पहिली धर्म परिषद आमची गडचिरोलीला संपन्न झाली. दुसरी धर्म परिषद ३१ मार्च रोजी.

पुरुषोत्तम खेडेकरांनी शीव धर्म मांडला. बाबा साहेबांनी धम्माची दीक्षा दिली. बाबा साहेबांचा उद्देश हाच होता की, यांना दलित माणसाची किंमत नव्हती. जनावरांना पाणी प्यायला टाकी होती, पण दलितांची सावली देखिल अस्पृश्य समजली जात होती. अशा रंजल्या-गांजल्यांना बुध्द धर्म बाबा साहेबांनी स्वीकारला आणि आता पहा विकास कसा झाला. झपाट्याने विकास झाला. धर्माचं छत्र आहे त्यांच्याजवळ, शास्त्र आहे आणि शस्त्रही आहे. हा विचार आता मलाही करावा लागेल आणि तुम्हालाही करावा लागेल. ३१ मार्च ला पुरुषोत्तम खेडेकर येणार आहेत कार्यक्रमाचं उद्घाटन करायला. २०१६ मध्ये गडचिरोली येथे प्रचंड धर्म दिक्षा समारोह आम्ही घेणार आहोत. आम्हा सर्वांना मी बोलवेल. होऊन जावू दया धम्म क्रांती या देशामध्ये. किती लोकं त्याठिकाणी दीक्षा घेतील हाही मला महत्त्वाचा मुद्दा नाही.

बुध्दांनी दीक्षा दिली तेव्हा फक्त ५ लोक होते. आज ५ करोड, ५ अब्ज लोक बुध्दीस्ट आहेत. ख्रिस्तांनी दीक्षा दिली तेव्हा फक्त २ माणसं होती. महम्मद पैगंबरांनी दीक्षा दिली तेव्हा ३ माणसं होती मुस्लमान. आता आमचं अस्तित्व आमचा सांस्कृतिक चेहरा सिध्द करण्याचा हा शेवटचा मार्ग. आखरी रस्ता धर्माचा असं मी जाहीर करतो.२०१६ मध्ये ही धर्मांतराची लाट या देशामध्ये उसळेल. सांस्कृतिक धोरणाचं ते पायाभूत अंग रहाणार आहे. यादृष्टीने तुमचं विचार चक्र आता फिरु दया. एवढी अपेक्षा बाळगतो. वेळ संपलाय. तसंही पुणेवाले पुढे असतात विदर्भापेक्षा. वेळेच भान ठेवून, तुमची भूक लक्षात घेवून सर्वांना धन्यवाद देतो. आपण याठिकाणी आलात शांतपणे ऐकून घेतलात. मी स्पष्ट बोलणारा माणूस आहे, गुळगुळीत बोलणं, तोंडातल्या तोंडात बोलणं, कानात सांगण. त्याच्याशी गोड-गोड बोलणं हे माझ्या वृत्तीला मानवत नाही. मी त्यांना शत्रू मानतो. जे बोलायचं ते सरळ-सरळ सांगा हे मला मान्य नाही. 'पीठ के पीछे से अगर वार करना उसके जैसा कमिना इन्सान कोई नही.' दुर्दैवाने मला असं म्हणावं लागेल की गैर आदिवासींना दोष कशाला दयायचा हो सर. आम्ही नालायकच आहोत. आदिवासींना इतिहास सांगतो आम्ही की, आदिवासींना फसवलं आदिवासींनीच. आदिवासींचा घात केला आदिवासींनीच.

गोंडवाडयातल्या क्रांतीवीर बाबुरावला त्याच्या बहिणीनंच पकडून दिलं क्रिस्टनच्या स्वाधीन केलं. फासावर लटकवलं त्याला. कशासाठी ? जमीन मिळाली तिला त्याच्या मोबदल्यात. गद्दारी फक्त ५००/-रु. साठी बीलसारला पकडून देणारा त्याचा भाऊच होता. तंटया भिल्लाला कोणी पकडून दिलं. बज्या नाईकाच काय झालं. आम्हीच गद्दार आहोत, आम्हीच नालायक आहोत, हा नालायकपणा आता आम्ही शोधला पाहिजे. जातीला जात वैरी. आमच्याच जाती आम्हाला वैरी होतात हे समजून घेतलं पाहिजे. तेव्हा गैर आदिवासींना दोष देण्यात अर्थ नाही. 'अपनेही दुर्गुण देखो उसे हटाने को सिखो' ही प्रतिज्ञा आपण घेतली पाहिजे. आपणही या मार्गाने चालावे. माझ्या बोलण्याचा गांभीर्याने विचार करा एवढी अपेक्षा मी बाळगतो. धन्यवाद.

• • •

# आदिवासी विकासाच्या दिशा

**श्री. वाहरू सोनावणे**
(ज्येष्ठ आदिवासी कवि आणि विचारवंत)



आदिवासींच्या विकास धोरणाबद्दल आपण बोलणार आहोत, विचार करणार आहोत. अशी चर्चा झाली की मूळ निवासी, या पृथ्वीतलावर ज्याने पहिलं पाऊल ठेवलं तो आदिवासी माणूस. ती आदिवासींची ओळख आहे. तेव्हापासून तो आदिवासी जगत आलेला आहे, वागत आलेला आहे. आणि त्याच्या विकासासाठी काय धोरण असावं, यासाठी चर्चा करण्यासाठी गरज निर्माण झाली आहे. आदिवासी तेव्हापासून आतापर्यंत, जसं याआधीच्या सत्रामध्ये विनायकजी तुमराम यांनी आपली भूमिका मांडली, त्यात त्यांनी म्हटलं की आम्ही राज्य केलं आहे किंवा जे जीवन जगलं आहे त्याला काही धोरण नव्हतं, नियमन नव्हते, आज या वेळेला आपल्या आदिवासी धोरणाचा विचार करावा लागतो. म्हणजे हे आदिवासी विकासाचं धोरण कोणी ठरवायचं? तर राज्यसत्तावाल्यांनी, जे राज्य करतात त्या लोकांनी. आदिवासींच्या संदर्भामध्ये विकासाचे धोरण काय असलं पाहिजे, यासाठी त्यांना सांगितलं गेलं पाहिजे, म्हणून आदिवासी विकास धोरणाची येथे चर्चा करण्याची गरज आहे.

एक गोष्टीचा विकासामध्ये विचार करायला हवा, तो म्हणजे माणसाची जेव्हा या भूतलावर कोणत्याही प्रकारची सत्ता नव्हती, त्या वेळेला हा आदिवासी कसा जगत होता? या विकास क्रमामध्ये जिथून संपत्तीची उत्पत्ती झाली तिथूनच शोषणाची सुरूवात झाली. माणसामध्ये सुध्दा विभागणी होती. शोषण करणारा माणूस, अनुसूचित मानव समूह, तिथूनच माणूस या गुण समूहामध्ये आप-आपसामध्ये संघर्षाची सुरूवात सुध्दा तिथूनच होते. त्या संघर्षाचा एक भाग म्हणून आदिवासींची अवस्था येथपर्यंत आलेली आहे, की तो भयंकर मागासलेल्या स्थितीमध्ये आहे. या स्थितीतून बाहेर पडायला पाहिजे असं कोणाला वाटतं तर ते शासन आहे. म्हणून याचा विकास कसा करायला पाहिजे हा विचार करायला पाहिजे. जर शासनाला वाटत असेल तर शासन त्याच्या मर्जीप्रमाणे विचार करतो. एक साचा तयार करतो. आणि त्या साच्यामध्ये या आदिवासीला बसवायला बघतो. जर त्या साच्यामध्ये आदिवासी बसला नाही तर पुन्हा आदिवासीला शिव्या, 'साले, आदिवासी सुधारणार नाही'. हा आदिवासी विकासाचा प्रश्न हा त्यांचा आहे. प्रश्न आदिवासींचा नाही. आदिवासींचा विकासाचा प्रश्न काय असेल, हे आपण इथं समजून घ्यायला पाहिजे.

माझं असं मत आहे, आदिवासी विकासासंदर्भात कसा विचार करतो. बिरसा-मुंडानी एक घोषणा दिलेली

आहे 'ऊलगुलान'. त्या घोषणेचा अर्थ असा होतो की, जीवनाच्या सर्व क्षेत्रामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक यामध्ये एकाच वेळेला ऊठाव म्हणजे ऊलगुलान. याचा अर्थ असा नाही की आर्थिक लढे करत आहोत मग सामाजिक किंवा सांस्कृतिक अंगामध्ये लढाई किंवा उठाव करण्याचे कारण नाही. तर एकाच वेळेला सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक सर्व अंगामध्ये एकाच वेळेला उठाव म्हणजे ऊलगुलान. हा त्याचा अर्थ आहे. जर तुम्हाला लढाई करायची असेल आणि मानव मुक्तीची दिशा आत्मसात करून ही लढाई करायची असेल तर हा नारा आहे, त्याच्या अनुषंगाने ही लढाई केली पाहिजे.

शासनाचे धोरण व आदिवासी विकासाचे धोरण कसं असतं? तर शब्दकोडयाप्रमाणे. नमन असा शब्द आला, मग वरून बघायचे तर 'म' यायला पाहिजे. ऊभे किंवा आडवे अक्षर जुळले तर ते शब्दकोडे सुटते. शासनाचे धोरणसुद्धा असंच असलं पाहिजे. आर्थिक विकास होत असेल तर त्याचवेळेला शैक्षणिक विकास व्हायला हवा. जीवनाच्या सर्व अंगाने विकास होत गेला पाहिजे. असा विकास अपेक्षित आहे. पण शासकीय धोरण तसं नाही. आर्थिक विकास करायचा असेल तर सांस्कृतिक अंगाचा पैसा त्यात टाकून किंवा सांस्कृतिक अंगाचा पैसा शोषण करून त्याचा आर्थिक विकास केला जातो. हे विकासाचे धोरण आदिवासीला मंजूर नाही. मग तुम्ही म्हणणार की तुम्ही करून दाखवा. मग द्या आमच्या हातात सत्ता. पण तिथंही ते म्हणतात की दिलेली आहे, हे लोकप्रतिनिधी काय आहेत?

हे लोकप्रतिनिधी आदिवासींचे नाहीत. हे आदिवासींच्या सर्टिफिकेटवर निवडून जात असेल तरी ते आदिवासींचे राहत नाही. ते कोणाचे राहतात तर त्या पार्टींचे राहतात. अन पक्षाचा अजेंडा समोर ठेवून ते वागतात व जगतात. हा दिखावा असतो की २५-२६ आमदार आदिवासींचे. ते आदिवासी नाहीत. ते पक्षाच्या धोरणाप्रमाणे चालतात. ते आदिवासी असल्यामुळे थोडं-फार आदिवासींचा विषय आला तर त्या अंगाने जातात. पक्ष म्हणून काय सही असेल, पक्षाचा अजेंडा म्हणून, पक्षाची पॉवर असेल त्याच्यामध्ये त्याला परवानगी असेल तेवढेच ते करणार. त्याच्या धोरणामध्ये त्याला जेवढी असेल तेवढेच ते करणार.

एक बाहुली असते ना जेवढी चावी भरावी तेवढीच चालते, चावी संपली तर ती ठप्प होऊन जाते. जेवढे अधिकार दिलेले असतात तेवढेच ते वापरतात. कोणीही बंड करू शकत नाही. आदिवासींच्यासाठी मी राजीनामा फेकून देतो असं कुणीही करू शकत नाही. आजपर्यंत करू शकलेले नाही. बाबासाहेब आंबेडकरांनी जसा राजीनामा दिला, तसा आतापर्यंत कोणी दिलेला आहे का? समाजाच्या संपूर्ण हितासाठी, राजीनामा देत आहे असं समाजाला सांगून राजीनामा दिलेला आहे का? तसं नाही, आम समाजाला कसं माहिती होईल? म्हणून जे धोरण ठरवायचे असेल तर फक्त आर्थिक विकास करायचा असं नाही, स्कीम आणायच्या असं नाही. विकास हा एकांगी असता कामा नये. विकास हा सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक ही जीवनाची जी अंगे आहेत त्या सर्व अंगांमध्ये विकासाची प्रक्रिया व्हायला पाहिजे. तेव्हाच खरा आदिवासीचा विकास आहे असं समजायला पाहिजे.

यांच्या स्कीम कशा आहेत? उदा. सांस्कृतिक अंगामध्ये घराचे बघू. इंदिरा आवास मध्ये घर दिले जाते. ''अरेरे बिचारे आदिवासी'', उपकाराच्या भावनेने ते दिले जाते. घ्यायचे असेल तर घ्या नाही तर जा. त्या पैशामध्ये चार भिंती बांधायच्या आणि मध्ये एक भिंत बांधायची.

जागाही मिळते अन् घर बघा. पाहुणे आले तर बसायला जागा वेगळी, आदरतिथ्य करायला, झोपायची जागा वेगळी, जेवण करायची जागा वेगळी. हया आदिवासी समाजाची घराची रचना कशी असली पाहिजे? ते कोंबडी पाळतात, बकऱ्या पाळतात, गाई-म्हशी पाळतात, यांच्या ठेवायची जागा काय असेल? अशी रचना करा ना त्या घराची अन् मग बजेट आखा व ते मंजूर करा. ते घर पण दिल्यासारखे होईल. पण नाही, उपकाराच्या भावनेने. त्यांना पडलेलं नाही घर द्यायचे. तर मानसिकता नाही. काय तर आमच्या सरकारचा उपकार आम्हाला छान वाटेल हे घर आहे? असं नाही वाटत. कित्येक घरं उघडी, छपराविना आहेत.

दुसरं असं, आदिवासीचा सांस्कृतिक विकास करण्यासंदर्भात प्रकल्पातर्फे काय दिलं जात? भजनाचं साहित्य. भजनाचा व आदिवासीचा काही संबंध नाही. जर सांस्कृतिक विकास करायचा असेल तर तारपा दिला पाहिजे. ढोल दिला पाहिजे, जेणेकरून त्याचा सांस्कृतिक जीवनाचा विकास होईल. आम्ही पद्माकर वळवींना विचारलं होतं, आमच्या गावाला त्यांची सभा घेतली, तिथं विचारलं, ''आम्हाला ढोल पाहिजे, आम्हाला भजनाचे साहित्य नको.'' तर ते म्हणाले, 'ढोलाला' मोठे लाकूड लागतो', म्हणजे लाकडाची व्यवस्था तुम्ही करा. आमचा ढोलाचा विषय आला तर तुम्हाला लाकडाची समस्या व्हायला लागली. रेल्वेच्या रेल्वे भरून लाकूड तुम्ही पार्सल केलं आहे, या जंगलाची नासाडी केली आहे, अन् आता ढोलासाठी तुम्हाला लाकूड मिळत नाही. पण तुम्हाला करायचे नाही. आणखी काय म्हणे, 'हे सुशिक्षित बेकार आहेत, यांना काम देऊ.' काम देऊन काय देतात तर बेंड-बाजा. ही आदिवासी पोरं आहेत, यांना काम द्यावं म्हणून देतात, ते घेऊन पोरांकडे देतात. जे ढोल भाडा घेत नव्हते तिथं हे जातात, १२०००, १५०००. ७०००-८००० एका दिवसाचे. ती भेद भावाची संस्कृती रूजवतात. अन् आदिवासी संस्कृती मारतात. हे कुठले धोरण? संस्कृती जगवण्याच्या दृष्टीने तुम्ही हे करता आणि त्या बेंड बाजावर लग्नाच्या श्रीमंताच्या माणसाच्याकडे तुम्ही डिस्को-डान्स करता? आदिवासींना नाचता येत नाही, तुम्हाला अशा तऱ्हेने हे जीवन, जीवनामधले कोणते जीवन वाचवायचे? कोणते जीवन खतम करायचे? तुमचे धोरण ठरवताना हे यायला पाहिजे.

आता बरेच विषय आले, गाण्याचे काय साहित्य आहे? तुमच्या रात्र-रात्रभर कथा चालतात. आमच्याकडे, तुम्ही पाहिलं असेल, जव्हार ठाणे जिल्हयामध्ये, अक्कलकुवा तालुक्यामध्ये. कथा रात्र-रात्रभर चालतात. दिवाळीमध्ये नाटकं ११-१२ पासून सुरू होते ते दिवस उगवून जातो, लोकं अशी बसलेली असतात. कथा चालतात, नाटकं चालतात, लग्नातली गाणी चालतात. त्याच्यामध्ये मूल्य नाहीत का? जीवन नाही का? कधी वाटलं का, हे साहित्य जमा केलं पाहिजे, सुरक्षित ठेवलं पाहिजे. त्यांच्या जीवनाबद्दल तुम्हाला कवडीची माहिती नाही, तुम्ही काय धोरण आखणार? जी भाषा तो बोलतो ती भाषा तुम्हाला येत नाही? त्याची जीवन प्रणाली, विचार प्रणाली तुम्हाला कधी कळणार? तो जीवन व्यवहार, ते खातात काय, बसतात काय, उत्सव कसा मनवतात, आदिरतिथ्य कसं करतात, एखादे पंच बसतात ते कसे प्रश्न सोडवतात, त्यांची भाषा नाही समजली तर त्याची जीवनप्रणाली कशी समजेल? कसं काय धोरण आखणार तुम्ही? फक्त सत्तेवर नजर ठेवून तुम्ही धोरण आखता, आदिवासींचा विकास होण्याच्या दृष्टीने बिलकुल नाही.

आदिवासी लोकं उपकाराच्या बलामध्ये आम्हाला मतदान कसं करतील असं ठरवून धोरण त्याच पातळीवर आखतात. त्यामध्ये संस्कृती मरत असेल तर मरू द्या.

किंवा शेतीमध्ये तंत्र-यंत्र, काय विकास करणार आहे? शेतीमध्ये पाणी दिलं, इंजिन दिलं,... पण त्या शेतीचे आयुष्य कसे वाढवायचे याबद्दल काही सांगितलं? किती तुम्ही मेळावे घेतले, शेतीचा उपजावपणा टिकवला पाहिजे, बियाणे सुरक्षित केलं पाहिजे. शेतीमध्ये भरमसाठ खत टाका, पाणी टाका, त्याने शेतीचे जे आयुष्य आहे ते घटतं. आता तर बाजारीकरण अमुक-तमुक जो प्रकार आलेला आहे, ते सर्व जागतिकीकरणाच्या रेट्यामध्ये. हे जे धोरण, परदेशाचे धोरण आले आहे, आमची रीत आहे ती बाद होत चालली आहे.

माझा वडील होता, आता हयात नाही, पण असं बघायचा, बी किती लागेल, धान्य किती लागेल, गहू किती लागेल, भाजी किती लागेल, बाजार-हाटासाठी पैसा किती लागेल आणि कापूस पेरून द्यायचा. म्हणजे माणसावर नजर ठेवून पीक पेरत होतो, उत्पादन घेत होतो. आता माझ्या वडिलांनाही हे शक्य झाले नाही. सर्व पैशावर आधारित पिकं घेतात, नफा देणारी. केळांना भाव आहे, कापसाला भाव आहे कापूस पेरा. अशा तऱ्हेने पैशावर नजर ठेवून हे उत्पादन केले जात आहे. आदिवासी शेतीचा कसा विकास करतो. आदिवासी पूर्वी मिश्र शेती करत होता. उडद पेरत होता, स्वत:चे बियाणे पेरत होता, शेणखत वापरत होता. ही रसायनांची लागण तुम्ही का लावली? भूगर्भातील पाणी तुम्ही का संपवले? हे पाणी संपू नये असं तुम्ही लोकांना, आदिवासींना कधी सांगितलं? एका शेतामध्ये ५-६ शेत पाडून घेतात व पाणी ओढतात व भरमसाठ वापर करतात, त्याचं नियोजन करता? आता कोणताही पिक असेल, फवारल्याशिवाय ते उत्पादन देत नाही. कापूस असेल, तूर असेल, काहीही असेल, फवारा. त्या फवाराचे अन्न खाऊन शरीरातील विषाचे प्रमाण वाढलं असल्यामुळे थोडसं काही झालं की रोगाची लागण झाली. मग तुम्ही आरोग्याचे रक्षण, म्हणजे तुम्ही आजारी पडा व इंजेक्शन घ्या. मला गोळया खाण्याची गरज कशाला भासून देता? गोळया खायची, औषधं घ्यायची, दवाखाना बांधायची आम्हाला गरज नाही. आमचे जीवन एवढं सुरक्षित पाहिजे की आम्हाला कोणताही आजार होता कामा नये. अशा तऱ्हेने धोरण आखलं पाहिजे.

आलं इलेक्शन विहीरी खणून दे. कितीही पाणी कसं बी वापरू द्या. यांचा विकास फक्त सत्तेवर नजर ठेवून आहे. हे बरोबर नाही. तज्ज्ञ जे बसलेले असतात त्यांनाही थाप मारून देतात. लक्षात ठेवा धोरणामध्ये हे यायला पाहिजे. ते हया तज्ज्ञांची चालू देत नाही. जो काही तज्ज्ञ प्रामाणिकपणे सांगायला प्रश्न करतो त्याला हटवतात. त्यांच्या रूचीमधला तज्ज्ञ त्यांना पाहिजे असतो. सल्लागार असाच सल्ला द्यायचा की माझीच सत्ता राहावी. तर आदिवासी विकासासंदर्भात विचार करत असताना आदिवासी बरोबर बसावं जरा. पण वेळ नाही, दोन मिनिटात तुम्ही कल्पना सांगा. तुमचे म्हणणे दोन मिनिटात सांगा असे म्हणतात. आमचे म्हणणे थोडक्यात सांगायचे, एवढे आम्ही तज्ज्ञ नाही. दोन मिनिटात सांगू पण एका मिनिटात तुमची योजना आली पाहिजे, एवढी क्षमता आहे का तुमची?

कम्पुटरचे युग असेल, आत्मसन्मान हे म्हणायचे असेल तर यासंदर्भात काही नाही. 'जालियनवाला बाग ये देखो, जहां चली थी गोलियां' जिथे ५००-६०० लोकं मेली, ती देशासाठी मेली, त्यांची कदर केली पाहिजे. त्या माणघरला १५०० पेक्षा जास्त माणसांना गोळया घालून ठार केलं, पहाड रक्ताने लाल झालं. त्यांची नोंद नाही. हा इतिहास कशासाठी तुम्ही दाबून ठेवता? या विकासाच्या धोरणामध्ये. इतिहासात नाही आम्ही एवढं बलिदान दिलं, आमचे कुणी नाव घेत नाही. १५ ऑगस्ट,

२६ जानेवारीला 'एक रूपया चांदीचा आणि देश आमचा गांधीचा' वा रे गांधीचा, आमचं रक्त कुठे पळून गेलं का समुद्रामध्ये? फक्त गांधींचे व बाकीच्यांचे नाव घेणे व आमच्या बलिदानाला नाकारून टाकणे या चूक आहे. ही इतिहासाची संवर्धन करण्याची जबाबदारी शासनाची आहे.

गांधीचा विषय निघाला म्हणून सांगतो. एकदा दसरीबाई नावाची आदिवासी मुलगी १४ वर्षांची, वेळशी गावाची, तालुका वाळून, महात्मा गांधी आले गुलामीच्या वेळेला. सर्व लोक महात्मा गांधीच्या गळयामध्ये हार घालायचे. या आदिवासी मुलीला वाटलं मी बी याच्या गळयात हार घालणार. ती लहान होती उंचीने, तिला काही हार घालता येईना. मग कोणीतरी कडेवर घेतलं. मग तिने स्वत:चा हार त्यांच्या गळयात घातला. जेव्हा तिला खाली उतरवलं तेव्हा गांधीनी तिला पाहिलं, तेव्हा दसरीबेनच्या गळयामध्ये चांदीचा हार होता, हातात चांदीचे कडे होते, पायात चांदीचा चाळ होता. गांधीजी म्हणाले, 'देश की आजादी के लिये बेटा, ये गहने दे डाल' दसरी बेनने तिथेच दागिने काढले व गांधीजींच्या झोळीत टाकले. महात्मा गांधींच्या सांगण्यावरून असहकार आंदोलनात सामील झाली.

दसरीबेनला अटक झाली. गुजरात मधून मिरवत-मिरवत तिला पुण्यात येरवडयाच्या जेलमध्ये आणले. त्या जेलमध्ये महात्मा गांधीच्या धर्मपत्नी कस्तुरबा गांधी अटक होत्या. तुम्हाला माहिती असायला पाहिजे, की कस्तुरबा गांधींना लिहिता-वाचता येत नव्हते. ती सुद्धा तोपर्यंत अंगठा बहाद्दर होती. ४-५ दिवसानंतर दसरीबेनकडे अपेक्षा व्यक्त केली, 'बेटा तुम मुझे पढाओगी?' तिला वाटले की एवढा मोठा राष्ट्रपिता महात्मा गांधी, यांची पत्नी कस्तुरबा गांधी यांना कशी शिकवू मी? तिचं मन थोडं संकुचित झालं. २-३ दिवसांनी हिम्मत एकवटली. नंतर महात्मा गांधीच्या पत्नीला लिहिता-वाचता यायला लागले. कस्तुरबा गांधीनी पहिले पत्र त्यावेळी महात्मा गांधीना पाठवलं. तेव्हा महात्मा गांधी सुद्धा दुसऱ्या जेलमध्ये होते. त्यांनी ते पत्र वाचलं, वाचून त्यांनी आनंद व्यक्त केला, आणि उलट टपाली पत्र पाठवलं, ''जो काम मै नही कर सका वो इसने कर दिखाया''. जिने लिहायला-वाचायला शिकविले तिचे कौतुक या पत्रात केले.

पण त्या मुलीचं, दसरीबेनचं नाव देशाला माहिती नाही. त्या दसरीबेनचं नाव इतिहासकारांना माहिती नाही, आम्हाला-तुम्हाला माहिती नाही. दसरीबेन आज जिंदा आहे ९५ वय आहे त्यांचं. त्यांच्याकडे इंदिरा गांधीपासून सगळयांची ये-जा आहे. पण कुठे तरी इतिहासामध्ये नोंद. घरी इंदिरा गांधी, सोनिया गांधी येऊन जाते पण या इतिहासाबद्दल कोणी एक शब्द बोलत नाही. का बोलत नाही कारण आदिवासींची मुलगी आहे म्हणून तुम्हाला द्वेष आहे का?

तर अशा तऱ्हेने आदिवासींच्या बाबतीत हे का होतं? आपल्याला एवढंच माहिती आहे की आदिवासी बोलीभाषा बोलत नाही. लाज वाटते म्हणे त्यांना. तो का बोलत नाही? असं कधी विचार केला का? हे सर्व लोकांनी आदिवासींना दाबून ठेवलं आहे. आदिवासींना तू चोरटा आहेस, लबाड आहेस, तू लुच्चा, लफंगा आहेस, तू दारूड्या आहेस, अंधविश्वासू आहेस, नाना तऱ्हेने दाबून ठेवले आहे. तो आदिवासी भाषेत बोलला तर ही विशेषणं लागतील. याच्याने तो दबतो व आपली भाषा बोलत नाही. आम्ही कसे वागले आहोत त्याला आपण जबाबदार आहोत की नाहीत? याचा विचार करा.

कधी सन्मानाने बोलले नाही. शिक्षण हा शब्द लावला नाही. इथं सुध्दा मूल्यावर आधारित शिक्षण

देतो म्हणे. धडगाव तालुक्यामध्ये बर्डी आहे, इकडे मालवी आहे. तिथल्या आश्रम शाळांना जाऊन विचारलं, 'सर, तुम्ही या मुलांना मूल्य-शिक्षण देता?' त्यांनी सांगितलं दोहे, तुकारामांचे अभंग, अमुक-तमुक, यातून देतो. मग मी त्यांना म्हणालो, 'सर ही आदिवासी मुलं आहेत, तर तुम्ही कथांमधून देत असाल, म्हणीमधून देत असाल, अभंगामधून देत असाल, तर या आदिवासींमध्ये गाणी नाहीत का? कथा, म्हणी नाहीत का? नाटक किंवा कशाच्याही माध्यमातून ते मूल्य त्यांना दिलं तर त्यांनाही वाटेल आम्हालाही मूल्ये आहेत. त्यांनाही अभिमान वाटेल, आपल्या मूल्यांबद्दल मान खाली झुकवावी लागणार नाही.' आदिवासीकडे बघताना चंद्रासारखे बघू नये. चंद्राला बघताना काही लोकं डागच बघतात, अरे त्याला प्रकाशसुद्धा आहे. अशा तऱ्हेने आदिवासीकडे बघायला पाहिजे.

मुटाटकर सर जसं म्हणाले की, आमची नजर, तुमची नजर काय आहे, काय विश्लेषण करते, काय चिकित्सा करते हे बघायला पाहिजे. आदिवासींच्या गावामध्ये भानगड झाली तर पंच बसतात. रोगराई झाली तर पंच बसतात, एखादे संकट आलं तर पंच बसतात, विचार करतात. लग्न असेल, होळीचा सण असेल, गाव दिवाळी करायची आहे, तर पंच बसतात. एकटे विचार करत नाही, तर संपूर्ण गाव पोरा-सोरांचं मत घेतात, राय घेतात. विकासाबद्दल त्यांना विचारले नाही, त्याच्या जीवनाच्या गाभाऱ्यात गेलेच नाही, फक्त त्यांना वर्चस्व गाजविण्यासाठी दटावले जाईल. त्यांच्याकडून त्यांची जी बुद्धी आहे, मत आहे, जीवन जगण्याचे मूल्य आहे, त्याबद्दल विचारत नाहीत, तर ह्या गोष्टी जर विकासाच्या असतील तर सांस्कृतिक जो भाग आहे, जो अनमोल ठेवा आहे तो जपला पाहिजे. अशा तऱ्हेने विकास व्हायला पाहिजे.

मूल्य शिक्षण सांगत असताना कोणते मूल्य कसं जपावे ते सुद्धा महाराष्ट्र शिक्षण मंडळ ठरवतं ना.. बोर्ड ठरवतं. चौथीच्या अभ्यासक्रमात ते येतं की ते चोरी करत होते. म्हणजे काय आम्ही चोरीच करणारे आहोत. आम्ही कापणी, नांगरणी काही करतो की नाही? या बाकीच्या मुलांमध्ये भेदाची जी दरी उभी राहिली, अशा तऱ्हेने भेद निर्माण करणारे तुम्ही त्या शिक्षणामध्ये काय डोळे मिटून देतात का? असं आमचं म्हणणं आहे. जोपर्यंत कोणी बोलत नाही, खपवून घ्यायचे.

बरं झालं तो अभ्यासक्रम बंद झाला. ते 'झळीचे दिवस' वर्णन करताना फक्त त्याच्या झांग, मांड्या, उघडे स्तन असे दाखवले, जेणेकरून भोगवादी विचार त्यांच्या मनामध्ये यावे अशा तऱ्हेने. कुठे गेली तुमची मूल्ये? आदिवासीला बोलता येत नाही म्हणून काय बी करायचे? मुकी गाय कोणीही हाका, असे धोरण. कोणते घ्यायचे कोणते नाही धोरणामध्ये या आवडी-निवडीच्या यावर तुम्ही बसलेले आहात. एका समाज गटाला तुम्ही तुच्छ मानायचे, कारण तो मुका आहे, त्याला बोलता येत नाही. असले खपून जाईल. मग आम्ही गुरूजी लोकं काय करतो, पुस्तकामध्ये आहे तसंच शिकवितो. कुणीही प्रश्न करत नाही. जे डॉक्टर होऊन, पीएच.डी. झालेले आहेत त्यांनी केलं पाहिजे. प्रश्न करायला पाहिजे. ते कुणी केलं.

चौथीच्या पोरांच्या पुस्तकामध्ये चौथीच्या पोरांनी प्रश्न केला, आणि बी.ए.एफ.वायला 'झळीचे दिवस' होते? विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. ती कांदबरी जाळून टाकली उत्तर महाराष्ट्रामध्ये. जळगाव युनिव्हर्सिटीला ती कांदबरी मागे घ्यावी लागली. शिक्षण म्हणजे काय आहे, शिक्षण म्हणजे जे शाळांमधून, पुस्तकामधून, कॉलेजमधून, विद्यापीठामधून शिकवले त्याला शिक्षण म्हणतात का?

हो, त्याला शिक्षण म्हणतात. आमची मानसिकता स्थिर आहे. म्हणजे श्रमाला प्रतिष्ठा नाही, तर बुद्धीला आहे, ही मानसिकता. शिक्षण फक्त पुस्तकांमधून येत नसते. जुजबी शिकणं म्हणजे शिक्षण नव्हे. ज्ञान म्हणजे शिक्षण. हे फक्त शाळा, विद्यापीठातून मिळत नाही. माझा बाबा येथून तेथपर्यंत सरळ रेषेत नांगर घेऊन जातो. यांना शिक्षण नाही म्हणत? याला ज्ञान नाही म्हणत? बैल कसा हाकायचा, नांगर कशी धरायची, मूठ कशी द्यायची? हे सुद्धा ज्ञान आहे. बाया-बापडयांना म्हणतात 'यांना काय अकला आहेत?' जे अंगठा बहाद्दर आहेत जे जेव्हा शेत करायला जातात ते गवत-गवतच काढतात व फेकतात. ते कापसाला उपटून फेकत नाहीत. मग त्यांना ज्ञान नाही का? जीवन जगण्याचं ज्ञान हे शिक्षणामध्ये येतं. हे ज्ञान व जीवन अनुभवाचे ज्ञान हातात हात घेऊन जगण्याचा आत्मविश्वास देईल ते ज्ञान खरं आहे असं मी समजतो. ज्ञाना संदर्भात किंवा कोणत्याही संदर्भात हा विचार केला पाहिजे.

याठिकाणी आदिवासी विकासासंदर्भात वेगवेगळया अंगाने कशा तऱ्हेने धोरणं आखली गेली पाहिजेत, त्याबद्दल मला असं वाटतं. आता मुटाटकरजीनी सांगितलं की, बायांनी शेतीचा शोध लावला. मग पेरायला लागले, मग उकरणी आली, नांगरणी आली. हे एक क्विंटलसाठी असेल व त्यामध्ये विकास झाला. ट्रॅक्टर आलं, एक च्या जागी दोन क्विंटल यायला लागले. थोडया जागेमध्ये कसं जास्त उत्पादन येईल आणि माणूस जीवनामध्ये जास्त सुखी होईल, अशा तऱ्हेने विकासाचा नियम आहे. विकासक्रमामध्ये विकासाचा शोध सुद्धा आदिवासीने लावला आहे. पहाडावरून लाकूड गडगडत आलं, त्या तुकडयावरून आदिवासीने पहिला चाकाचा शोध लागला. चाकाचा शोध लागल्यामुळे बैलगाडी तयार झाली. जो एकटा माणूस वाहत होता, तो चाकं घालून वाहायला लागला. हेच चक्र सायकलमध्ये बसलं. मोटार सायकलमध्ये बसलं. ट्रॅक्टरमध्ये, बसमध्ये बसलं. रेल्वेमध्ये बसलं. पंख्यात, विमानात बसलं. या चक्रामुळे विकास इथपर्यंत साधला गेला आहे. ज्याची नोंद नाही घ्यायची, त्याचा विचारच नाही करायचा. विकास करताना आदिवासींची नीती अशीच आहे की, व्यक्तीला धरून विकास नाही तर समूहाला धरून विकास व्हायला पाहिजे. समूहाला धरून प्रगती साधली पाहिजे. समूहाची प्रगती म्हणजे देशाची प्रगती असे धोरण पाहिजे. अशा तऱ्हेने धोरण आपण आखले पाहिजे. हाच आदिवासीच्या धोरणाचा एक भाग आहे. जो खरा आदिवासी असेल त्यांना बोलवा, तेव्हा त्यांना विकासाची नीती, धोरण आणखी सविस्तरपणे सांगता येईल.

## चर्चा

**प्रा. रा. के. मुटाटकर**

मला वाहरूची एक गोष्ट सांगायची आहे. वाहरूला महाराष्ट्र साहित्य परिषदेने बक्षीस दिलं. टिळक रोडच्या कार्यालयामध्ये तो कार्यक्रम झाला. त्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अनुराधा पोतदार होत्या. साहित्य परिषदेच्या लोकांनी तिथे भाषणे केली, त्यांना आदिवासी माहितीच नव्हते. ते दलितांबद्दल बोलत होते. दलित साहित्य, दलित कवी अशी सगळी भाषा. वाहरूनी त्यांना सगळयांना खडसावलं. एवढं मानाचे साहित्य परिषद, एवढे मराठीचे नामांकित साहित्यिक, कवी तिथे असतील; परंतु त्या लोकांना आदिवासी माहितीच नव्हता.

१९८३ साली जयंत मंगल कार्यालयामध्ये आम्ही जेव्हा साहित्य मेळावा घेतला, तेव्हा तुमराम सारखे लोकं

होते. ते म्हणाले की, मराठी साहित्यिक इथं आलेच नाहीत. मी म्हटलं की गरजच काय तुम्हाला? साहित्य संमेलनाचे अध्यक्ष गं.बा. सरदार इथे असताना तुम्हाला इतर साहित्यिक कशाला पाहिजे. त्यांची तुम्हाला कशाला पाठीवर थाप पाहिजे. ज्याची त्यांना अनूभूतीच नाही त्यांच्याकडून तुम्ही अशी अपेक्षा करता ही चुकीची गोष्ट आहे. हा इतका मोठा विरोधाभास आहे. वाहरूंना मला एवढंच म्हणायचं आहे, की त्यांनी जे जीवनाबद्दल म्हटलं, जीवनप्रणाली. आम्ही मानवशास्त्रात जीवनप्रणालीला संस्कृती म्हणतो. जीवन हे एकांगी नसतं, त्यामुळे विकास हा एकांगी कसा असू शकतो? ते जर कुणी एकांगी करायचा प्रयत्न केला विभाजन करून, उदा. इरिगेशन डिपार्टमेंट, हेल्थ डिपार्टमेंट, अमकं-तमकं, ते सगळं फेल जाणार आहे, फेल होतंय आपल्याला माहिती आहे. कारण सगळा एकांगी विचार असतो ना. आरोग्य चांगलं ठेवायचं असेल तर तुम्हाला जेवण चांगलं मिळालं पाहिजे, दवाखाने असून काय उपयोग? जेवण आहे ते ॲग्रीकल्चर विभागाकडे, जर पाणी हवं असेल तर तुम्हाला इरिगेशन खात्याकडे भीक मागावी लागते, अशी आपली यंत्रणा आहे. त्यामुळे हे सगळं फेल जाते.

आज पेपर उघडला तर अर्धा पेपर न्यूज बलात्कारावर असते. आमच्या आदिवासी स्त्रीवर आदिवासी पुरूष कधीच बलात्कार करत नाही, हे कुणाला माहिती आहे? हे आदिवासी संस्कृतीमधलं जे उच्च मूल्य आहे, ज्याला मेनस्ट्रीम म्हणतात त्या मेनस्ट्रीमच्या समाजामध्ये बलात्कार आहेत, आदिवासी संस्कृतीत बलात्कार नाहीत. आदिवासी स्त्रीवर बलात्कार भरपूर होतात; पण ते बिगर-आदिवासींकडून. आदिवासी स्त्रीला जर मूल होत नसेल तर ती दुसरा नवरा करेल. आम्हाला होत नसेल तर आम्ही दुसरी बायको करू, हा फरक आहे. आम्ही हुंडाबळी घेतो तिथं प्रश्नच उद्‌भवत नाही. इथे कोल्हापूर जिल्हा शेतीच्या बाबतीत सगळयात समृध्द जिल्हा आहे. सगळयात जास्त सोनोग्राफीच्या मशीन या जिल्हयात आहेत. सगळयात जास्त स्त्री-भृण हत्या त्या कोल्हापूर जिल्ह्यात आहेत. हे मी वर्तमानपत्रातील बोलत नाही. युनायटेड नेशन्स तर्फे मी तसा अभ्यास केलेला आहे. कलेक्टरचा इंटरव्हयू, सिव्हिल सर्जन चा इंटरव्हयू घेतला, डिस्ट्रीक्ट जज्जचा इंटरव्हयू घेण्याचे काम माझे होते. त्याचा रिपोर्ट दिला.

समृध्दी आणि स्त्री-भृण हत्या, रिसर्च करून घ्या, स्टॅटेस्टिकल कोरिलेशन मांडून बघा. आदिवासींमध्ये हे आहे? नाही. हे कोण समजून घेण्याचे प्रयत्न करते. सरकार कुठे काय करते? नसबंदी तुम्हाला माहिती आहे. पण ज्यांनी नसबंदी करायला लावली त्यांनी काय म्हटलं? तुम्ही गरीब लोकं, हे फक्त आदिवासी नाही, तुम्ही फक्त पोरं पैदा करता, आम्हाला त्यांना खायला घालावं लागतं. हे त्यांचं लॉजिक आहे. त्यामुळे इंदिरा गांधींचा पराभव झाला. हे लोकांनी मिटींगमध्ये, चेंबर ऑफ कॉमर्समध्ये अशी व्याख्याने झालेली मी पाहिलेली आहेत. म्हणून फॅमिली प्लॅनिंगला पैसे द्यायला पाहिजेत, हे इंडस्ट्रीला सांगण्यात आलं. कारण ते तुमच्या अंगावर येतील. तुमची मोटार हिरावून घेतील. ह्या गोष्टी माझ्या कानाने ऐकल्या आहेत, बघितल्या आहेत. ही मानसिकता आहे. हे जे कॉरीडॉर प्रकरण पाहिलं, ही मानसिकता कशाची आहे?

मानव विकासाला आम्ही फ्रीडम ऑफ चॉइस म्हणतो. जे आम्हाला वाटेल तसं आम्हाला करता आलं पाहिजे. म्हणजे आम्हाला आमच्या संस्कृतीबरोबर राहता आलं पाहिजे. नेहरूंच्या पंचशीलमध्ये त्यांनी हे म्हटलं आहे. विकास त्यांच्या संस्कृतीला धरून झाला पाहिजे. मानवाकरीता ही मूल्ये आहेत. त्या मूल्यांमध्ये ही गोष्ट आहे की औषध असताना हे होऊ देणं हे योग्य नाही.

धान्य असताना कुपोषण होणं योग्य नाही? आमच्या प्रोजेक्टच्या पैशातून आम्हाला त्यांना जेवायला घालावं लागलं, ही शरमेची गोष्ट आहे. त्यांचा नैसर्गिक हक्क आहे. पण आपलं धोरण असं आहे, ९% बजेट, त्यात हे शक्य होत नाही. आम्ही मॉडेल तयार करून दाखवलं की, असं केलं की असं होतं. सरकारनी करायचं आहे ते. सरकारकडे तेवढे पैसे आहेत. आजच्या पैशाने ते होण्यासारखे आहे. ते आम्ही करून दाखवले. फॅारेन फंडिंग आहे. मानवशास्त्राचं संशोधन म्हणजे be a good listener. कागदाची, लेखणीची गरज नाही. लोकांचं ऐकून घ्यायला पाहिजे, त्यांना बोलायला प्रवृत्त करायला पाहिजे. अशी माझ्याकडे पुष्कळ उदाहरणं आहेत. धारणीचं उदाहरण आहे.

टायगर प्रोजेक्ट मधील लोकांचं, कौतुक करण्याकरता गव्हर्नर साहेबांनी गव्हाची पोती नेली. तेव्हा त्या गावच्या लोकांनी सांगितलं की आम्ही एकटे नाही, तर चार गावचे लोकं आहोत. तरी अट्टाहासाने ती त्यांनी गावच्या लोकांना दिली. गव्हर्नरसाहेब गेल्यानंतर लोकांनी सर्व धान्य गोळा केलं. चार गावच्या लोकांना बोलावलं आणि परत त्याची वाटणी केली.

अशी गोष्ट जव्हारच्या कोरतडची, कोर्तोबाची यात्रा होते तिथे बकरे, बोकड कापले जातात. जितकी कुटुंबं असतात, त्या प्रत्येक कुटुंबाचं एक-एक पान ठेवलं जातं. जे बोकड कापले जातात, त्याचा प्रत्येक पार्ट समजा लीवर आहे, तर त्याचे तेवढे पार्ट केले जातात. ही जी पद्धत आहे आदिवासी संस्कृतीमधली, ह्या संस्कृतीला धरून जर धोरण केलं तर ते शक्य आहे.

## डॉ. सतीश गोगुलवार

(आम्ही आमच्या आरोग्यासाठी, कुरखेडा, जि. गडचिरोली)



आदिवासींच्या इतिहासामध्ये खूप ठिकाणी त्यांनी इंग्रजांविरूध्द लढाई केली. त्यांची काही नावे आपल्याला आता माहिती पडली आहेत. लालचंद कामा हे त्यापैकी एक. ते बस्तरचे खासदार होते. त्यावेळी मोठ्या प्रमाणात बांग्लादेशातून रेफ्युजी आले, इंदिरा गांधीच्या काळात. त्यावेळी त्यांचे लोक बस्तरमध्ये काही ठिकाणी बसवायचे. पण त्यांनी ठरवलं होतं की त्यांच्या सांस्कृतिक जीवनावर परिणाम न होता हे करावं; पण ते न मानता त्यावेळेस त्या बंगाली लोकांना वसवलं गेलं. त्याच्या निषेधार्थ कामांनी खासदारकीचा राजीनामा दिला. त्यानंतर गडचिरोली जिल्ह्यात एटापल्ली भागात मोठं आंदोलन झालं. जंगल बचाव आंदोलन, त्यामध्ये ते प्रमुख भूमिकेत होते. ते आदिवासींच्या प्रश्नासाठी सतत लढत आलेले आहेत. म्हणून खासदारकीचा राजीनामा दिलेले ते बस्तरचे खासदार होते.

आपण आता आदिवासींच्या धोरणांचा विचार करताना त्यांच्या ताकतींचा विचार प्रामुख्याने करण्याची

गरज आहे. त्यात खूप गोष्टी सांगितल्या आहेत. त्यांच्या ताकतीसोबत तुम्ही पुढे गेला आणि नियोजन प्रक्रिया त्यांच्या हातात राहिली तर खऱ्या अर्थाने त्यांचा विकास होऊ शकतो. मुळात दोन गोष्टींचा विचार करावा लागेल. कोणत्या समाजामध्ये खऱ्या अर्थाने विकास झाला? बलात्काराचे उदाहरण सांगितले, तर तीन गोष्टी कुठल्याही समाजात पाळल्या जातात. चोरीचं प्रमाण, भीक मागण्याचं, आणि स्त्रियांवर होणारे अत्याचार. आदिवासी समाजात या गोष्टी फार कमी आहेत. पुष्कळ गोष्टींची पूर्तता गावामध्ये होते, त्यांच्या सामुहिक दृष्टीने गावदिवाळी, आमच्याकडे म्हणतात. आपल्याकडे तो एक विशिष्ट प्रकारचा सण आहे. इथं आमच्याकडे गावाची सोय पाहून गाव-दिवाळी होते. त्यादिवशी संपूर्ण गावाची सुट्टी असते. संपूर्ण गाव काम बंद ठेवतं. गाव स्वच्छ होतं. त्यामध्ये प्रत्येक गावामध्ये दिवाळीचा दिवस वेगळा. त्या दिवसामध्ये कार्यक्रम करायचे असतील तर त्यांचा गाव-दिवाळीचा दिवस सोडून. लग्न हे गावाचं लग्न असतं. गाव त्यामध्ये कॉन्ट्रीब्युट करतं. त्यामुळे त्या घरावर भार पडत नाही.

या ताकदीच्या गोष्टी असतील तर आदिवासी धोरणामध्ये आपल्या बदल व्हायला पाहिजे. शेवटी निर्णय प्रक्रियेचा तो भाग आहे. गावातील सामुहिक निर्णय प्रक्रियेची ताकत जर आपण या कायद्यांनी वाढवली, जसं ग्रामसभेचा कायदा आहे, तर तो आणखी बळकट होणार. त्याला हक्काच्या गोष्टी मिळतील. त्याचा खरा हक्क आहे वनावरचा. पैसा पहिला मुंबईत जातो. मग तो झिरपत त्याच्याकडे येतो. आपल्याकडे सगळा पैसा फॅारेस्ट रेवेन्यूकडे जातो. तो मुंबईत येतो, मग जिल्हा परिषदेत येतो. जिल्हा परिषदेमधून तो झिरपत जातो. तो कुठल्या आदिवासी गावाला जाईल असं नाही. तो कधीच त्या आदिवासी गावात पोचत नाही. वन हक्क कायद्यातला भाग जर गावाला मिळाला, तर ते गाव आपलं निर्णय घेऊन त्या ग्रामसभेला देईल. त्यातून शिक्षणाच्या विषयीचा विचार आहे. सामुहिकतेचा विचार आहे. मग तो बँड-बाजाच्या मागे जाणार नाही. त्यांच्यामध्ये कला आहे. ती दुसरीकडून आणायची गरज नाही. थोडी आर्थिक सोय गावामध्ये झाली तर ते स्वत: त्यातून निपटणार. घर स्वत: बांधतात. ज्यांच्यापाशी अशा सर्व गुणवत्ता आहेत त्यांना आपण मागास समजून टाकतो, हे चुकीचे आहे. ती समजूत आधी धोरणातून बदलली पाहिजे. काही गोष्टींच्या बदलांची गरज आहे, ती त्यांच्या नजरेतून लक्षात आली. त्यांच्यात लोकशाही पद्धती जास्त आहे.

आमच्याकडे बचतगटांचे संघ बनवले. त्या बचतगटात बऱ्याच ठिकाणी आदिवासी महिला त्या संघात आपले सांस्कृतिक प्रश्न मांडतात. एक आदिवासी गाव आहे साले नावाचं. तिथं आदिवासी जात-पंचायत होतात, तेथे महिला बसायला लागल्यात. स्त्रीचे प्रश्न असेल तरी पुरूषच ठरवतात. तिथं बाईला मोकळेपणाने मांडता येत नाही. गावात एका बाईच्या विरोधी निर्णय झाला आणि ती बाई जेव्हा या संघाच्या मिटींगमध्ये आली, तिथं चर्चा झाली व तिनं सांगितलं माझं असं प्रकरण आहे आणि आमच्या ग्रामपंचायतीने मात्र असा निकाल दिलेला आहे. त्या बायकांनी निर्णय घेतला व सगळया मिळून त्या पंच लोकांशी बोलल्या. 'या बाईंना असं वाटतं आणि तुम्ही चुकीचा निर्णय दिला.' पंच म्हणाले की 'हे जर खरं असेल तर आम्ही पुन्हा बोलावून घेऊ आणि त्यात तुम्ही पण या.' आणि त्यात नेमका निर्णय बदलला, त्या बाईंच्या बाजूने.

तेव्हापासून या दोन जात-पंचायतींनी महिलांचा सहभाग वाढावा यादृष्टीने प्रयत्न केले. आता त्यांनी ३३% महिलांना त्यात बोलवलंय. त्यामुळे महिलांच्या गोष्टी

त्यात मांडायला लागल्यात. लग्नामध्ये खूप खर्च होतो, म्हणून त्यांनी सामुदायिक लग्नाची प्रक्रिया स्वत: चालू केली. त्यात खूप कमी खर्चामध्ये ते काम झालं. अशा ज्या सामुदायिक ताकदी ज्यामध्ये आहेत आणि त्याला शासकीय ताकद, म्हणजे ग्रामसभेची ताकद, ही जर या कायद्याने दिली, मिळाली तर या सामुदायिक ताकदीचा उपयोग खऱ्या अर्थाने होईल. मग तो समाज स्वत:च्या सांस्कृतिक बाबींचा विचार करुन चुकीच्या गोष्टी बदलतील.

या साले गावामध्ये, ४०-४२ घराचं गाव आहे, आदिवासी गाव आहे. एक दलित कुटुंब आहे. पण ते ग्रामसभेमध्ये बसतं. त्यांच्याकडे शेती नाही, ते शेतमजूर आहेत. या गावाने असं ठरवलं, बिबती नावाची आदिवासीमध्ये पद्धत आहे. कुठलंही काम ते सामुहिक पद्धतीने करतात. घर बांधायचे असेल तर सगळे लोक जातात. त्यात जेवण दिलं जातं. जुन्या पद्धतीमध्ये जेवणात दारू, बकरा कापायचे. 'बिबती' ची जी ताकत आहे ती पारंपरिक पद्धत यांना आपल्या सामुहिक विकासामध्ये कशी करता येईल. तर त्यांनी शेती विकासासाठी ती प्रक्रिया राबविली. त्यांनी निर्णय घेऊन २०-२० गट बनविले आणि रोज एका शेतावर कामाला जायचे. त्यामध्ये फक्त वरणभात, भाजी तेवढे त्यांना खायला द्यायचे आणि दुसऱ्या दिवशी दुसरीकडे.

कृषी विभाग जे काम करत नाही ती पद्धत मागच्या ५-६ वर्षांपासून गावामध्ये चालू आहे. त्यातून दारू, बकरा हे सगळं काढून टाकलं आणि त्यात चांगल्या पद्धती आणल्या. सांस्कृतिक प्रक्रियेसाठी एक कार्यक्रम आहे. वेगवेगळया गावाचे लोक नाच घेऊन येतात व तीन दिवस तो कार्यक्रम चालतो आणि सगळया गावाला त्याचा खर्च करावा लागतो. तरूण मुलांनी असा विचार केला की, आपण नाच सोडूया. कारण जेवढं कमावतो नुसतं यामध्ये खर्च करतो. नाचाचे सांस्कृतिक कार्यक्रम ठेवायचा एकत्र येऊन; पण बाकीचा खर्च कमी करायचा. त्यांच्या नजरेतून पहायचं असेल तर त्यांच्या या विचारांची प्रक्रिया त्यांच्यामध्ये आहे. त्यांना त्या पद्धतीचं स्वातंत्र्य देण्याची गरज आहे. एक आमच्या सी.ओ. होत्या नॉर्थ-ईस्ट मधून आल्या होत्या. त्यांनी एकदा भेट दिली त्या गावाला. त्या म्हणाल्या, की तुम्ही इतकं चांगलं काम करता तर तुमचं काम रोजगार हमी मध्ये टाकू. गावाने एकच सांगितलं की, तुम्ही कुठल्याही कामात टाका, फक्त ग्रामसभेला तो पैसा द्या.

अशा पद्धतीने शासनाच्या पुष्कळ योजना आहेत, ज्या सामुहिक प्रक्रियेला पुढे नेणाऱ्या आहेत. आदिवासी विभागातर्फे धान्य-कोष योजना होती. या भागात सामूहिक योजना ज्या असतील त्या प्रामुख्याने मांडतो. शासनाच्या आदिवासी विभागाने बऱ्याच ठिकाणी असं केलं की ते धान्य लोकांना वाटून दिलं. या प्रक्रियेत असं होतं की ते धान्य लोकांना वाटायचं आणि दर वर्षी ते परत करायचं आणि त्यातून तो धान्य-कोश निर्माण व्हायचा. जेणेकरून वर्षानुवर्षे तो धान्यकोश त्यांच्यासाठी वापरला जावा. पण विभागाने त्याकडे कुठेही लक्ष दिलं नाही. आम्ही काही गावामध्ये त्याचं व्यवस्थित रेकॉर्ड केलं. गरीब आदिवासी कुटुंब असेल तर ते त्यात बसत नाही. गावानी विचार करून त्यांच्या वाटणीचं जे धान्य असेल ते स्वत: दिलं व त्यांना सामावून घेतलं.

अशी धान्य-कोश अजूनही आहेत. या सामुहिक प्रक्रिया त्याला ताकद देणाऱ्या आहेत. सत्ता कशी त्यांच्या हातात येईल, त्याच्यातून मग नियोजन-प्रक्रिया, धोरणाबद्दलचा विचार हा जास्त होणार. धोरण बनवताना एका बाजूला हे खऱ्या अर्थाने होणार. सरांनी जो मुद्दा

मांडला, आमच्या इकडे आम्ही 'कोईतूर' असाच शब्द वापरतो. कोईतूर सभा संमेलन असेच वापरतो. 'कोया' म्हणजे माणूस असा विचार, असा धर्म आला, तर माणुसकीचा धर्म म्हणून जास्त सगळयांच्या दृष्टीने राहील. तो आदिवासी धर्म म्हणण्यापेक्षा, कोया म्हणजे सर्व माणुसकीच्या विचारांचा समावेश आहे आणि मुळात ते त्यांच्या संस्कृतीत आहे. त्यामुळे ते जास्त पुढे नेता येईल.

## डॉ. निरूमपा देशपांडे

(संपूर्ण बांबू केंद्र, ता. धारणी, जि. अमरावती)

कोरकू म्हणजे माणूस. त्या विषयाला जोडून मला काही प्रश्न पडले आहेत. त्यामध्ये धर्म हा शब्द वापरला धर्म-परिवर्तन म्हणजे धर्माशी जोडल्यासारखं काहीतरी वाटेल. मला तुमराम सरांना विचारायचं होतं की, मग शिवाजी धर्म म्हणजे सगळं पुन्हा तसंच झालं ना. त्यामध्ये काहीतरी राजकीय हेतू आहे. जसं दलित चळवळ राजकीय नेत्यांनी खाऊन टाकली तसंच आदिवासी चळवळ दलित चळवळीशी मर्ज करणार का? आदिवासी नामशेष करायची प्रक्रिया सर्व स्तरांमध्ये सुरू आहे. जसं वाहरूनी सांगितलं की, सामुहिक प्रक्रियेला महत्व द्यायला हवं आणि त्याला आपण न्याय द्यायला पाहिजे. मेळघाटात हीच प्रक्रिया आहे.

आमच्या गावात पंचायत आहे ती कोरकू जातीची नसून ती पंचायत सर्व लोकांची असते. यात आम्ही पण आहोत. इथे होळी मोठा सण आणि होळीच्या नंतर कर्ज वाटप केलं जातं. म्हणजे दर वर्षी कर्ज दिलं जातं आणि कर्जाची इन्टॉलमेंट दरवर्षी होळीच्या दुसऱ्या दिवशी केली जाते. खूप कडक नियम आहेत. म्हणजे समजा, एखाद्याने मुलाच्या लग्नासाठी कर्ज घेतलं तर त्याला २५% व्याज आहे. ते त्याने मुलाच्या लग्नासाठी त्याचा खर्च केला नाही तर ५०% व्याजाने ते परत करावे लागतात, इतकं कडक आहे. आम्ही म्हटलं की आम्हाला कर्ज कशाला? ते म्हणाले की तुम्हाला आम्हाला गावात ठेवायचं आहे, म्हणून आम्ही तुम्हाला कर्ज देणार. आजही आमच्यावर २५० रू कर्ज आमच्या पंचायतीचे आहे. दरवर्षी आम्ही त्याचं व्याज भरतो आणि विशेष म्हणजे त्या दिवशी कोणताही माणूस गाव सोडून जाणार नाही. पंचायतीत त्याने येऊन कर्ज दिलेच पाहिजे. कोरकू असं म्हणतात की 'खुद को बेच देंगे पर पंचायत का कर्जा चुकायेगे' इतना पक्का उसका नियम होता है. सरकारी योजनांपासून ते अलिप्त आहेत, म्हणून टिकून आहेत.

मागे आमच्या इथे असा प्रयोग केला की, आमचे जे भगत/भुमका ते पी.एच.सी. मध्ये जातील आणि तिथे ते पूजा-पाठ करतील. परंतु त्याच्यामुळे भलं कुणाचं झालं नाही. मधल्यामध्ये त्याचा सगळया सिस्टीमवरचा विश्वास उडून गेला आणि त्यांच्याशी चांगले संबंध प्रस्थापित करून त्यांना सहकार्य करायला सांगत होतो, त्यालासुद्धा नंतर प्रतिसाद मिळाला नाही. मोठ्या सिस्टीममध्ये आपल्या चांगल्या गोष्टींची मोड-तोड जी होते ते यात होतंय. सामुहिकतेची ताकद आणल्याशिवाय आपण जर पुढे गेलो, तर ते हानिकारक ठरू शकेल.

गडचिरोली किंवा मेळघाट कुपोषणासाठी प्रसिद्ध आहेच; पण तिथे महिलांची संख्या पुरूषांपेक्षा जास्त आहे. एका महिलेला मी खूप पटवायचा प्रयत्न केला, त्यांनतर मी कोणत्याच महिलेला करत नाही. ''तुला शेती नाही, काही नाही, तरी तू इतकी मुलं का होऊ देतेस?'' ते तिसरे, चौथे मूल होतं. ती म्हणाली, ''माझ्याकडे काहीच नाही म्हणूनच मला मुलं पाहिजेत''. त्यानंतर मी कुठल्याच स्त्रीला म्हणत नाही की, तू मुलं इतकी का होऊ देतेस? म्हातारपणी जेव्हा आपल्याच्यानी

काही होणार नाही, हीच मुलं आपली देखभाल करणार आहेत, ही त्यांची संपत्ती आहे. त्यांच्याजवळ काही नाही तर मुलं तरी त्यांच्यासोबत राहतील.

एकदा पंचायत बसली होती. आमच्या इथे महिला केव्हा पंचायतीत जातात, तर घरातला माणूस नसेल तेव्हा. मला पंचायतीला जावं लागलं, कारण माझ्या घरातला माणूस नव्हता. पळून जाऊन लग्न केल्याबद्दल पंचायत होती, सगळं सेटल झालं आणि असं ठरलं की काही पैसे मुलाकडच्यांनी व काही पैसे मुलीकडच्यांनी द्यायचे. असे पैसे दंड म्हणून जमा होतात. काही पंचांचा वेळ घेतला म्हणून दोन्ही पार्टीला दंड द्यावा लागतो. कोर्ट फी भरल्याशिवाय कोर्टाचे काम होत नाही. आणि तो गूळ सगळयांना वाटण्यात आला. एवढा मोठा गूळ सगळयांना दिला. आमच्या गावचा पोलिस पाटील आहे, त्याचा लहान मुलगा आहे, तो म्हणाला 'बाबा मला गूळ दे'. तो त्याला काही देत नव्हता. मी म्हटलं, ''उसको देदो गुड, क्यू नही दे रहे? मेरे पास का दे दो इतना तो हम खा नही पाएंगे''.

त्याने मला सांगितले की, ''तुम उसको गुड मत दो''. त्याने मुलाला पाच रूपये दिले खिशातून व दुकानातून गूळ घेऊन ये व तो दे म्हणे, ''हा दंडाच्या रकमेचा गुळ आहे हा मी माझ्या मुलाला देणार नाही, कोणत्याच मुलाला देणार नाही, कारण ते पळून जाऊन लग्न केलं, त्यासाठी असलेला दंड आहे आणि त्याचा गूळ मी मुलांना खाऊ घालणार नाही.'' याच्यामागे जी मूल्ये आहेत ती आपल्या समाजात नाहीत, हे बाकीच्यांना माहितीच नाही. इतक्या सिस्टीम तिथल्या इतर लोकांचा काही संबंध नसणाऱ्या आहेत. त्यामुळे लोकांना ते माहिती नाहीत. त्या स्ट्रॉंग आहेत म्हणून काही न काही अजूनपर्यंत टिकून आहे, जे इतर समाजामध्ये नाही. मला याचं आश्चर्य वाटलं की जेव्हा एखादी स्त्री म्हणते की मूल म्हणजे माझी संपत्ती आहे आणि शहरात आपण बघतो की शिकलेले तरूण-तरूणी पहिले आधी संपत्ती गोळा करतात, मग मूल होऊ द्यायचा विचार करतात. दोघांच्या मानसिकतेमध्ये, विचारामध्ये किती तफावत आहे.

## श्री. माधव मठपती

**(समन्वयक, आदिवासी उत्थान, कर्जत)**



आदिवासींमध्ये हुंडा पद्धत नाही ही किती चांगली गोष्ट आहे. काही वर्षांपूर्वी हुंडा मुलाला द्यायची पद्धत इतर समाजामध्ये आहे, तशी आदिवासींमध्ये मुलीच्या आई वडीलांना येणारा खर्च म्हणून दोन मन तीन मन भात दिलं जाई. त्यावर शंभर रूपये इतर खर्च म्हणून दिले जाई. तीस वर्षापूर्वी ती पण चांगली पद्धत होती. मुलीच्या वडीलांना ते टेन्शन नव्हतं, हुंडा देणं आणि खूप खर्च करणं. हल्ली तीही पद्धत नष्ट झाली. आता मुलांकडून काही घेतलं जात नाही, पण सगळा खर्च मुलीच्या घरी केला जातो. मुलीच्या माहेरी मांडव घातला जातो. हल्ली मांडवाची किंमत, लावलेल्या बेंजोची किंमत, भटजी

हजार, दोन हजार रूपये घेतो आणि हळदीला दारू शिवाय चालत नाही. आमच्या कर्जत भागातील कथा सांगतो. हा सगळा खर्च मुलीचे वडील करतात. पूर्वी लोकं वर्गणी करत होते. मुलाचे वडील थोडं द्यायचे. दोघांना खर्च सहन व्हायचा. ही एक पद्धत थोडी घराच्या विकासाला पाठबळ देणारी आहे.

दुसरी गोष्ट अशी, आपण वन-उपज हे आदिवासींच्या मालकीचं राहावं म्हणून कालपासून चर्चा करतोय. आज आमच्या रायगड जिल्हयात असं चित्र दिसतंय की आदिवासींच्या नावाने असलेली जमीन विकली जाते. कायदा काय आहे, आदिवासींची जमीन विकली जात नाही. आमच्या तालुक्यात आदिवासींच्या जमिनी होत्या, त्यापैकी ५०% जमिनी मालकीच्या राहिल्या नाहीत. त्या कुठेतरी समाविष्ट झाल्या. दुसरा मुद्दा असा की, ज्या जमिनीची किंमत कर्जतमध्ये तीस लाख रूपये एकर आहे, ती जमीन आदिवासींच्या भागात फक्त दोन लाख रूपये एकर जाते. आदिवासींची जमीन म्हणून त्याला भाव नाही व बिगर आदिवासींची तीच जमीन ३० लाखांनी जाते. आदिवासींमध्ये ५०% इच्छुक आहेत विकायला. त्यांना कितीही जरी सांगितलं की विकू नका, धोका आहे; पण विचारात घेत नाहीत. येत्या पाच वर्षात आदिवासींकडे जमीन राहणार नाही, दोन लाख रूपये कुठे आणि ३० लाख रूपये कुठे? पैसा पण राहणार नाही आणि जमीन पण राहणार नाही.

कातकरी लोकांकडे जमिनी नाहीतच. त्यांच्याकडे ज्या झोपड्या असतात, त्या मोठी जी बाजाराची गावं आहेत तिथं कातकरी दोन लाख रूपये देतो म्हटलं की आरामात उठून जातो आणि दुसरीकडे आरामात झोपडी टाकतो. हल्ली बाजाराच्या गावामध्ये २५ लाख रूपये गुंठा जमीन जाते. एकदा घर उठलं की जमीन मोकळी. हे जे धोके आहेत, हया धोक्यांना आपण धोरणामध्ये, आपलं काय धोरण असावं? फार्म हाऊस म्हणून ज्या जमिनी गेल्या त्या गेल्याच; पण स्वत:च्या मालकीच्या आदिवासींच्या जमिनी जात आहेत. त्यावर आपलं धोरण काय असावं, हे निश्चित करावं. दुसरी गोष्ट अशी की, आदिवासींमध्ये ज्या गोष्टी अवगत आहेत त्या गोष्टींचा विचार जास्तीत जास्त करायला पाहिजे. आय.आय.टी. ने १९८४-८५ साली अभ्यास केला की आदिवासींच्या मजुरीमध्ये कोणत्या विषयामध्ये काम केलं तर किती मजुरी पडेल? त्या काळात आदिवासींना खडी फोडायला पाठवलं तर साडेतीन-चार रूपयाचा रेट पडायचा. जंगलातल्या कामावर मजुरी मिळाली तर ती दहा रूपयांपर्यंत गेल्याची उदाहरणं आहेत. याचा अर्थ आदिवासी लोकांना जंगलातलं काम करण्याचं स्कील आणि आवड फार मोठया प्रमाणावर आहे. त्या दृष्टीने आपल्या धोरणामध्ये Priority द्यायला पाहिजे. त्यामध्ये सरकार ६०% रक्कम रोड तयार करण्यावर घालतं. आणि रोड तयार केला की तिथलं जंगल नष्ट होतं. या गोष्टींचा विचार धोरणामध्ये निश्चित करायला पाहिजे.

• • •

समारोप

# आदिवासींच्या 'ऊलगुलान' मधूनच विकासाचे धोरण


## डॉ. मिलिंद बोकील

(सामाजिक विचारवंत व प्रथितयश लेखक)




जे सगळे मुद्दे आपल्यासमोर आले त्यातून काही समान सूत्र आपल्यासमोर दिसतात. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरचा ६०-६५ वर्षाचा इतिहास हा आदिवासींच्या बाबतीत वचनभंगाचा इतिहास आहे किंवा फसवणुकीचा इतिहास आहे. आपण आपली घटना पाहिली तर राज्य-घटनेने आदिवासींची स्थिती समजून घेऊन त्यासाठी विशेष तरतुदी केल्या होत्या. पण त्यानंतर गेल्या ६० वर्षांमध्ये सरकारनेही व समाजानेही जी काही वचनं राज्य घटनेनं दिली होती, त्या वचनांना हरताळ फासला आहे. म्हणजे जे काही मान्य केलं होतं त्यातील कुठल्याच गोष्टी पूर्णपणे पार पाडलेल्या नाहीत. त्यामुळे आदिवासींची स्थिती स्वातंत्र्यानंतर ज्या परिस्थितीला आलेली आहे. त्यामागचं ते एक प्रमुख कारण आहे, जे कबूल केलं ते दिलं नाही.

हे आपण प्रत्येक गोष्टीमध्ये बघू शकतो. उदा. पेसा कायदा लावण्यामागे काही कारणं होती. ब्रिटिशांच्या काळात काय होतं? जरी ब्रिटीशांनी देश आपल्या ताब्यात घेतला असला तरी ज्याला ईशान्य भारत म्हणतात नागालँड, त्रिपुरा, मणिपूर वगैरे, त्यामध्ये ब्रिटीश पोहोचू शकले नाहीत. म्हणून त्या भागाला त्यांनी इंग्रजीमध्ये Excluded Area एरिया म्हणजे काही प्रमाणात सोडलेला प्रदेश असं म्हटलं. हे दोन्ही प्रदेश जेव्हा आपल्याला स्वातंत्र्य मिळालं तेव्हा तसे होते. म्हणून जेव्हा राज्य घटना तयार झाली, त्यावेळी ईशान्येकडील जो प्रदेश होता जो ब्रिटीशांनी सोडलेला होता. त्याच्यासाठी सहावी अनुसूची तयार केली.

ज्यांना रस असेल त्यांनी भारतीय राज्य घटनेचं पुस्तक काढून बघावं, त्यामध्ये सहावी अनुसूची आहे. ईशान्येकडील सगळाच भाग आदिवासी आहे. सगळयांना अनुसूचित जमातींमध्ये घेतलं आहे. त्यात असं मान्य केलं की, ब्रिटीश यांच्यापर्यंत न पोहोचल्यामुळे त्यांचे परंपरागत कायदे, नीतीनियम यांच्या आधारे त्यांनी आपलं राज्य चालवावं. सहावी अनुसूची असं म्हणते, या प्रदेशात केंद्र सरकार त्रिपुरा, नागालँड यांच्यामधलं सरकारमध्ये न नेता तिथल्या आदिवासींनी आपलं स्वतंत्र व स्वायत्त सरकार तयार करावं, स्वायत्त मंडळे करावीत. त्या स्वायत्त मंडळाच्यामार्फत पारंपरिक रीतीने आपला राज्यकारभार चालवावा.

हे भारतीय राज्य घटनेने मान्य केलेलं आहे. त्यामुळे जसं मोहन भाऊ सांगत होते की, सहाव्या अनुसूचित क्षेत्रामध्ये आदिवासींनी पारंपरिक रीतीने काम करावे अशीच रचना आपण त्यांना करून दिली आहे. पण नंतरची ६० वर्षे ते काही पूर्णांशाने झालं नाही. त्या भागामध्ये दोन्ही रचना चालू आहेत. भारतीय संघराज्याचे नियम व त्यासाठी स्वायत्त मंडळं आहेत, तीही चालू आहेत. एका बाजूने नेहमीची रचना चालू आहे, तर दुसऱ्या बाजूने पारंपरिक रचना सुद्धा आहे. तिथल्या आदिवासींची एक प्रकारे कोंडीच झालेली आहे. आपल्याला असं शिकवलं आहे की ब्रिटीशांनी सर्व भारत ताब्यात घेतला व आपली सत्ता राबिवली. पण तसं प्रत्यक्षात नव्हतं. अनेक डोंगराळ प्रदेश असे होते की, ब्रिटीश तिथे प्रत्यक्षात पोहोचले नव्हते. त्या प्रदेशांकरता पाचवी अनुसूची तयार केलेली आहे. त्यात असं म्हटलं होतं की, राज्यपाल या क्षेत्रांसाठी विशेष कायदे करू शकतील. महाराष्ट्रामध्ये काही क्षेत्रे अशी होती, ज्याला नंतर शेड्युल एरिया असं नाव देण्यात आले. त्या एरियासाठी जर राज्यपालांना असं वाटलं की विधिमंडळाचा एखादा कायदा तिथे लावायचा नाही तरी राज्यपाल ते करू शकतात किंवा त्या भागासाठी काही विशेष कायदा करायचा असेल तरी तो राज्यपाल करू शकतात. ही केवढी मोठी तरतूद केली आहे. राज्यघटना लिहिली तेव्हापासूनची ही तरतूद आहे.

राज्यपालांनी ही तरतूद कधीच अंमलात आणली नाही. या भागासाठी आदिवासी सल्लागार परिषद नेमायची असते. ती फक्त नाम के वास्ते नेमलेली आहे. तिच्या बैठका कधी वेळेवर होत नाहीत. झाल्या तरी आदिवासी आमदारांना कधी विचारलं जात नाही. काहीतरी करतात व बैठक झाली असं जाहीर करतात. जर असं ठरवलं की आदिवासी क्षेत्रामध्ये दारूबंदी करायची तर राज्यपालांना तो पूर्ण अधिकार आहे. मुंबईच्या विधानमंडळाने जरी असा कायदा केला की प्रत्येक गावात एक तरी दारूचं दुकान खोलायचं, तरी राज्यपाल ते मागे घेऊ शकतात. समजा मुंबईच्या विधानमंडळाने जर असा कायदा केला, की प्रत्येकाने हेल्मेट घालूनच सायकल चालवायची, तर राज्यपाल तो अधिकार वापरून तो कायदा बाजूला ठेवू शकतात. त्याचप्रमाणे आपल्याकडे पूर्वी सावकारी होती. सावकारीने या क्षेत्रात प्रवेश करू नये किंवा पैसे देऊ नये म्हणून सुद्धा विशेष कायदा राज्यपाल करू शकतात. आदिवासी भागात प्रचंड लूट या सावकारांनी कर्ज देऊन केली आहे. तर हे ५० सालीच थांबवता आलं असतं. कुठल्याही सावकाराला, जमीनदाराला आदिवासी भागात जायची तरतूद नव्हती. तिथं तुम्ही प्रवेशच करू शकत नाही. तर पुढचं रामायण-महाभारत घडलंच नसतं. किंवा गौण वनौपज त्याबाबतीत नियम करण्याचा अधिकार त्या अनूसूचित क्षेत्रांसाठी राज्यपालांनी तेव्हाच नियुक्त केले असते, तर आज तेंदूपत्ता, महुआ यांच्याबाबत जी पंचाईत झाली आहे ती केव्हाच थांबली असती. १९५० साली हे जे वचन राज्य-घटनेने दिलं ते राबवलं असतं, तर आज जी परिस्थिती बघतोय त्यातील कुठलीही परिस्थिती आली नसती.

पेसा कायदा का महत्वाचा आहे, हे आपण समजून घ्यायला हवं. पेसा कायदा ही आदिवासींच्या स्वातंत्र्याची सनद आहे. ती स्वत: भारतीय राज्यघटनेने दिली आहे. ती सनद आहे, ती तुम्ही बघू शकता. आता एक मोठा उठाव आपल्याला करावा लागणार आहे. पेसा कायदा कसा आला ते एका वाक्यात सांगतो. आपण १९९२-९३ साली घटना दुरूस्ती केली. ती करून आपण असं सिध्द केलं की, ग्रामपंचायतीपेक्षा ग्रामसभा श्रेष्ठ आहे. ग्रामपंचायतीचे निर्णय ग्रामसभा डावलू शकते. हे आहे, खऱ्या अर्थाने लोकांचं राज्य येणं. भारतीय राज्यघटना

लिहिली तेव्हा एक वाक्य टाकलं होतं, महात्मा गांधींचा खून होऊन दोन वर्षेच लोटली होती. १९४८ ला त्यांना मारलं व १९५० ला राज्यघटना आली. परंतु त्यात कुठेही 'ग्रामस्वराज्य' हा शब्दच नव्हता. गांधीजी आयुष्यभर ग्रामस्वराज्य करत जगले. ते गेल्यावर दोन वर्षातच अशी परिस्थिती आली होती की राज्यघटनेत तो शब्दच नाही. मग काही मोठ्या लोकांच्या, राजेंद्रप्रसाद वगैरे यांच्या लक्षात आलं की हे काय करून बसलो आपण. म्हणून घाई-घाईनं शेवटी एक वाक्य टाकलं की, आम्ही पंचायत राज मधून ग्रामस्वराज्य करू. पण ते शेवटी टाकल्यामुळे कोणी विचार केला नाही. फक्त महाराष्ट्र राज्यामध्ये १९६० साली आपण पंचायती राज्य घेतलं. त्यामुळे आपल्या सगळयांना ग्रामपंचायत, तालुका पंचायत समिती, जिल्हा परिषद हे माहिती आहे. गुजरातमध्ये तसं केलं; पण बाकीच्या राज्यामध्ये हे नव्हतं. आपल्याला सवय होती म्हणून आपल्याला काही वाटलं नाही. ही दुरूस्ती आपण १९९२-९३ साली केली. खऱ्या अर्थाने पंचायती राज्य, लोकांच्या हातात सत्ता.

४० वर्षानंतर खऱ्या अर्थाने लोकांच्या राज्याची सुरूवात केली. १९९२-९३ ला ज्या घटना दुरूस्त्या केल्या त्या आदिवासी क्षेत्राला म्हणजे ज्याला आपण शेड्युल एरिया म्हणतो त्याला लागू नव्हत्या. पाचव्या अनुसूचीला पण नव्हत्या व सहाव्या अनुसूचीला पण नव्हत्या. मग आदिवासी क्षेत्राकरता काय करतो आपण? इतर क्षेत्राकरता ग्रामसभा दिली आणि लोकांना अधिकार दिला. पण आदिवासींकरिता काय, करतोय? म्हणून मग त्यासाठी हा विशेष पेसा कायदा, Panchayat Extension to Schedule Area म्हणून तो ९६ साली करण्यात आला. पण त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्याची यंत्रणा ही ९६ सालानंतर आली. आता तरी आपल्याला जागं होऊन या ज्या दोन गोष्टी आहेत, पाचव्या अनुसूचीतल्या तरतुदी, त्याला जोडून पेसाच्या तरतुदी हयांच्या आधारे आदिवासी जीवनाची पुनर्रचना करणे शक्य आहे. ते काम मोठया प्रमाणात घ्यावे लागेल. धोरणात आपण पहिलं हे म्हटलं पाहिजे की हा पेसा कायदा तुम्ही लावा. महाराष्ट्राच्या पेसा कायद्यात एक महत्वाचा दोष राहून गेला. केंद्र सरकारने सगळयांना कळवलं की, पेसा कायदा तुम्ही मंजूर करा व लागू करा. राज्य सरकारने काय चापलुसी केली, आमचा जो मुंबईचा ग्रामपंचायतचा कायदा आहे, त्या कायद्यातल्या व्याख्या आम्ही इथे लावू.

आपल्या इथे ग्रुप ग्रामपंचायत होत्या. सगळा धडगाव तालुका २०-२५ ग्रामपंचायतीमध्ये विखुरला गेला आहे. म्हणजे एका ग्रामपंचायतीमध्ये ८-१० गावं, ५-२५ पाडे. खऱ्या अर्थानं लोकांचा जो टोला, पाडा, तांडा, मोहल्ला असतो त्याला स्वतंत्र अधिकार मिळायला हवा. पण महाराष्ट्र सरकारने हे हेतु पुरस्सर केलं आणि आजपर्यंत हे हलवलं नाही. दिल्लीला जी राष्ट्रीय सल्लागार परिषद जी सोनिया गांधीच्या अध्यक्षतेखाली आहे त्या परिषदेने स्वत:चा एक ड्राफ्ट बनवला आहे की पेसा कसा असावा व त्यात हे मान्य केलं आहे, की जी छोटी ग्रामसभा आहे, लोकं जिथं राहतात तो पाडा, टोला हे सगळया निर्णय प्रक्रियांचे मुख्य केंद्र असलं पाहिजे.आणि ते सर्वोच्च केंद्र आहे. संसद सर्वोच्च नाही तर सगळयात तळाशी जे लोक आहेत ते सर्वोच्च आहेत. म्हणून सांगितलं की, घटना कुठल्या तीन शब्दांनी उघडते? 'आम्ही भारतरचे लोकं' जिथे लोकं राहतात ते सर्वोच्च आहेत. हे लक्षात घेऊन आपल्याला धोरणाची पुनर्रचना करायला हवी. यात आपण काही नवीन मागत नाही. हे सगळं अगोदरच लिहिलेलं आहे, कबूल केलेलं आहे, ते आता प्रत्यक्षात आणायचे आहे. या सगळयाचा अभ्यास करून आदिवासी जीवनाची आपल्याला पुनर्रचना करावी लागणार

आहे. तसंच त्या आदिवासी परिषदेमध्ये २६ आदिवासी आमदार आहेत त्यांना कोणालाही न विचारता त्या परिषदेच्या गोष्टी चाललेल्या आहेत. ही परिषद म्हणजे आदिवासींची मिनी पार्लमेंट किंवा मिनी संसद होऊ शकते. तिथं तिला अधिकार दिला आहे की, तुम्ही स्वतंत्रपणे कारभार करू शकता. हे अजिबात ते करत नाहीत. मुख्यमंत्र्यांना अजिबात वेळ नसतो. आदिवासी आमदारांवर आता आपल्याला दबाव आणावा लागेल. तुम्ही नुसते मूक बसू नका. तुमचा अधिकार आहे तो तुम्ही हिसकावून घ्या आणि आदिवासी सल्लागार परिषदेचं जे कामकाज आहे ते चालवा.

त्याचप्रमाणे जमीन अधिकाराचे अनेक कायदे स्वातंत्र्यानंतर पारित करण्यात आले. परंतु यापैकी कुठल्याही कायद्याची पुरेशी अंमलबजावणी आपल्याकडे केली नाही ना कुळ कायद्याची केली, ना कमाल जमीन धारणा म्हणजे सिलिंग कायद्याची केली, ना सरकारी जमीन वाटप त्याचा कायदा होता, त्याची केली. त्यामुळे आदिवासी हा पूर्णपणे देशोधडीला लागला आहे. आज आदिवासींमध्ये ५०% आदिवासी हे भूमिहीन आहेत. कातकरींमध्ये ते प्रमाण जास्त आहे. गोंड, भिल्ल जे जमिनीला धरून आहेत त्यामध्ये जास्त आहे. सरासरी जर पाहिलं तर ५०% आदिवासी भूमिहीन झाले. पण मुळात ते तसे नव्हते कारण सगळी जमीन त्यांच्या ताब्यात होती आणि तिथे ते काम करायचे. पण हया सगळया धोरणांमुळे आदिवासी भूमिहीन झाले आहेत. त्यांची जमीन सरासरी २.२० एकर एवढीच आहे, ती पण डोंगर माथ्यावरची. जमीन अधिकारांबाबत आदिवासींची पूर्ण फसवणूक झालेली आहे. ती एक मागणी धोरणांमध्ये असायला पाहिजे. जमीन अधिकारात तुम्ही जे-जे कबुल केललं आहे ते-ते सगळं मंजूर करा. सगळया प्रलंबित गोष्टी आहेत, त्याचं एक कमिशन नेमा व त्या कमिशनने एकदाच काय तो निपटारा करा, अशी मागणी त्या धोरणामध्ये करायला हवी.

चौथं आहे, ते वनाधिकार. जंगलांच्या बाबतीत जो ऐतिहासिक अन्याय झाला होता, तो आता काही प्रमाणात दुरूस्त करत आहेत. पण त्याचीही अंमलबजावणी समाधानकारक नाही. आपण जिथे कुठे असू अजूनही वेळ गेलेली नाही. त्या-त्या आदिवासींनी सामुदायिक वनहक्क मागितले पाहिजेत. वैयक्तिक हक्क मागून सगळया समाजाचा प्रश्न सुटत नाही. पण सामुदायिक हक्क मागितला तर सगळया समाजाचा प्रश्न सुटेल. त्यामुळे वनाधिकाराच्या बाबतीत हे चालू केलं पाहिजे.

दुसरं जे सूत्र दिसते, ते म्हणजे आदिवासीचं प्रचंड प्रमाणात विस्थापन व्हायला लागलं आहे. दुर्देवाने या विस्थापनाची कुठलीही आकडेवारी उपलब्ध नाही. भारतात कुणाला असं विचारलं की, इतके प्रकल्प झाले, औद्योगिक वसाहती झाल्या, त्याने किती आदिवासी विस्थापित झाले ? तर कोणीही सांगू शकत नाही. बाकी ठिकाणी यांची आकडेवारी देत असतात. उदा. साक्षरता, सामाजिक साक्षरता किती हे सांगतात, पण विस्थापित किती झाले, याच्यामध्ये शेड्युल ट्राइब चा आकडा काढायला काय अडचण आहे? पण यांनी कुठेही काढलेला नाही. खरं तर असं दिसतं की जेवढे विस्थापित झाले, समजा भारतात दहा लाख लोकं विस्थापित झाले असतील त्यामध्ये सात ते आठ लाख लोकं म्हणजे ७०-८०% लोकं हे आदिवासी असतील. भारताच्या एकूण लोकसंख्येमध्ये आदिवासींची लोकसंख्या किती आहे तर साधारण ७-८ इतकी आहे. मग विस्थापित व्हायची वेळ आली तर त्या प्रमाणात व्हायला हवी.

याचा अर्थ या देशामध्ये जे काही विस्थापन झालेलं आहे ते आदिवासींचं झालेलं आहे. जी लोकं

कमी संख्येने आहेत त्या लोकांवर विस्थापनाचं संकट या देशामध्ये गेलेलं आहे. ही गोष्ट प्रत्यक्ष विस्थापन धरण आलं, गावं बुडली, पण अप्रत्यक्ष विस्थापन गण्य नाही. जसं निरूपमा ताईंनी सांगितलं, मेळघाटातील कोरकू पूर्वी २-३ महिने स्थलांतर करायचे, त्याऐवजी ७-८ महिने स्थलांतर करत आहेत. याचा अर्थ हे सरळ-सरळ अप्रत्यक्ष विस्थापन आहे. हे विस्थापन वाढतंय. दिल्ली-मुंबई कॉरीडोर येतोय तो प्रत्येक ठिकाणी येतोय. सगळे कॉरीडोर आदिवासी क्षेत्रातून जात असल्याने त्यांच्यावर संकट हे जास्त होणार. त्यामुळे ज्या तऱ्हेचा विकास, ज्या तऱ्हेची औद्योगिक संस्कृती येत आहे, त्यामुळे हे विस्थापन अधिकच वाढणार आहे.

मी २५-३० वर्षापूर्वी कातकरी समाजाचा अभ्यास करावयास सुरूवात केली. आता कर्जत तालुक्यात कातकऱ्यांना जमीनच शिल्लक नाही. कर्जत तालुक्यात अशी परिस्थिती आहे की, आदिवासीचं गावठाण असतं. त्याच्या सगळया बाजूंनी तारेचं कंपाऊंड पडलेलं असतं. मुंबईच्या श्रीमंतांनी जागा घेतलेल्या आहेत, कंपन्यांच्या जागा आहेत. इथून पुढच्या १५ वर्षामध्ये इथला कातकरी नामशेष होत आहे. तो कुठे जाणार आहे याचा पत्ता नाही. तो मुंबईच्या झोपडपट्टीत जाणार की कल्याणच्या खाडीत याची काहीही माहिती नाही. ज्या तऱ्हेने घटना घडत आहेत त्यावरून हे स्वप्न-रंजन नाही.

गेल्या २५ वर्षात मीच पाहिलं आहे की, कातकरी समाजाची कशी ससेहोलपट झाली आहे. पुढच्या १५-२० वर्षात ती जास्त होणार. ते संकट नंतर सातपुडयावर जाणार. कारण धुळे, नंदूरबार, नाशिक हा जो पट्टा आहे हा या कॉरीडोरमध्ये आहे. इतकी वर्षे सातपुडा हा दूरचा भाग म्हणून संरक्षित झाला; पण आता हा सगळा भाग सातपुडयात आला आहे. चंद्रपूरमध्ये आताच औद्योगिकरण जबरदस्त झाले आहे. त्यामुळे चंद्रपूर, गडचिरोली हे तर सापडलेले आहेतच, तिथं सुदैवानी नक्षली लोकांनी काहीतरी चालू केलंय, म्हणून सरकार दबून आहे.

सातपुड्यात सरकार दबलेलं नाही. जे ठाणे जिल्ह्यात झालं ते आता धुळे, नंदूरबार यांची आता पाळी आहे, अशी स्पष्ट चिन्हं दिसतात. तिसऱ्या गोष्टींची खूप चर्चा झाली ती म्हणजे कुपोषण, आरोग्य आणि शिक्षण. मुळात आदिवासी कुपोषित नव्हता. जर तुम्ही ३०-४० वर्षापूर्वीचे फोटो पाहिले तर त्यांच्याकडे पाहून कोणी असं म्हणणार नाही की हे कुपोषित होते. हे जगातल्या सगळया आदिवासींच्या बाबतीत झालं आहे. उदा. मी ऑस्ट्रेलियात पाहिलेलं आहे की तिथल्या आदिवासींचे ५०-१०० वर्षापूर्वीचे फोटो पाहिले. सहा फूट उंच, तगडे शिडशिडीत, अतिशय ताकतवान अशी लोकं होती. त्यांचे आज फोटो पाहिले तर ते उंच आहेत; पण अतिशय ढेपाळलेले, पोट सुटलेले, नाना तऱ्हेचे आजार असलेले असे झालेले आहेत. असंच आपल्याकडे पण झालंय. २५ वर्षापूर्वी आदिवासी कुपोषित नव्हता. आदिवासी स्त्री ४० किलोचा भारा सहज उचलू शकते. त्यामुळे ती कुपोषित नव्हती. गेल्या १५-२० वर्षांच्या घडामोडींमुळे ही परिस्थिती आलेली आहे. डोंगरात जे अन्न उगवायचे ते बंद झाले, शिकार बंद झाली, मासेमारी करायचे ते तलाव सगळे गेले. जंगलातून काही आणता येत नाही, त्यामुळे लहान-मोठ्या प्राण्यांतील जे प्रोटीन मिळायचं ते पूर्ण बंद झालं. त्यामुळे हे कुपोषण आलेलं आहे. त्याची भरपाई जी इतर धान्य देऊन सरकारने करायला पाहिजे ती न केल्यामुळे कुपोषण आलेलं आहे, हे अतिशय स्पष्ट चित्र आहे.

सगळया आदिवासी लोकांना रोज सकाळ-संध्याकाळ जर सरकारने जेवू घातलं, सरकार इतके विचित्र

आहे, आपण म्हटलं की आदिवासी कुपोषित आहेत, तर म्हणतील रोज ग्रामपंचायतीमध्ये सकाळ-संध्याकाळ जेवणावळ घालतो. सरकारला असले कार्यक्रम फार आवडतात. १०० लोकांऐवजी एक लाख लोकांना जेवायला घालायचं तर सरकारी यंत्रणेला फार आनंद होईल. तितका जबरजस्त पैसा खायला मिळेल सरकारला. किती आहेत तुमचे आदिवासी, ८७ लाख व १५ जिल्हयात! त्यांना हे जेवायला घालणं अवघड नाही. आपण रेटले तर ते असंच म्हणतील. हे घालणं, म्हणजे अशी वेळ आणणं, हेच किती लज्जास्पद आहे. असा कोणीतरी माणूस जगात आहे का की जो म्हणेल की, दुसऱ्यांनी मला जेवू घाला. प्रत्येकाला दोन हात-पाय असतात. तो धडपड करून आपलं अन्न मिळवून आपलं आपण जगतो. शिक्षण, आरोग्य याबाबतीत मदत लागू शकते. कुठलाही माणूस जन्मत:च भिकारी नसतो. त्यामुळे सरकारचे जे धोरण आहे या धोरणापायी हे कुपोषण आलेलं आहे. तसंच आरोग्य व शिक्षणाचं आहे. शिक्षणाच्या बाबतीत सुद्धा आदिवासींची संख्या वाढतीय. पण जे शिक्षण दिलं जातंय ते अतिशय निकृष्ट व खराब आहे. त्यातून काहीही निष्पन्न होत नाही. यात जे अभ्यास दिले यात साधी-साधी गणितं या मुलांना करायला दिलेली आहेत व ती यांना करता येत नाहीत.

मघाशी आपण वेगळया शिक्षणाबद्दल बोलत होता, आदिवासींची संस्कृती-शिक्षण. ते लांबच राहू दे. जे अ ब क ड ई आहे तेही नीट दिलेलं नाही. हे जे सरकार थाटात चाललेलं आहे की, पहिलीपासून इंग्रजी, पाचवीपासून इंग्रजी. जेवढे महाराष्ट्राचे मंत्री आहेत त्या मंत्र्यांना जरी शुध्दलेखन घातलं तरी सुद्धा त्यांना लिहिता येणार नाही. महाराष्ट्रात सगळयांच्याच शिक्षणाचा मोठा विचका झालेला आहे. आदिवासी शिक्षणाचा त्यापेक्षा जास्त झालेला आहे. हे तीन विषय सुद्धा वेगळया तऱ्हेने हाताळावे लागतील.

शेवटचा मुद्दा, सांस्कृतिक पीछेहाट जी याला जोडून आहे ती झालेली आहे. वाहरू जे बोलले की मुळातच धोरण चुकीचं होतं, की फक्त आम्ही आर्थिक विकास करणार किंवा गरीबी हटवणार. बाकी आम्ही काही करणार नाही. असं असू शकत नाही. विकास करायचा झाला तर तो सर्वंकष करावा लागतो. सरकारला हे कळतच नाही. त्याचं फक्त एकच धोरण आहे की गरिबी हटवायची व आर्थिक वाढ करायची. वाहरूजींनी सांगितलं की, कोणाला समस्या आहे तर दिल्लीत बसलेल्या मनमोहन सिंग व चिदंबरम यांना समस्या आहे किंवा मुंबई सरकारला आहे. ते सांगत असतात की मोठी समस्या आहे. खऱ्या आदिवासी माणसाला असं वाटतं का? ही समस्या इतर लोकांनी तयार करून त्याच्या डोक्यामध्ये ठेवली आहे की ही समस्या आहे व तू आता ही समस्या सोडव. विकासाच्या बाबतीत हे जे धोरण आहे त्या धोरणापोटी एक प्रकारची सांस्कृतिक पीछेहाट, हेतुपुर्वक खच्चीकरण यामध्ये झाले आहेत. आदिवासींच्या भाषेचं मरण हे त्या सांस्कृतिक खच्चीकरणाचा सगळयात मोठा टळटळीत नमुना आहे.

मराठी भाषा तरी राहणार आहे की नाही. जर छोट्या भाषा नष्ट झाल्या तर मराठी आपोआपच नष्ट होणार. त्यामुळे हया भाषा आपण जपणं हे आवश्यक आहे. आदिवासी समाजाची पीछेहाट ही एकूणच समाजाची नंतर पीछेहाट होणार आहे. त्यात दोन गोष्टी ज्या आलेल्या आहेत ज्यावर चर्चा करावी लागेल.

दुसऱ्या माणसाचा धर्म कोणता असावा किंवा असतो हे मी ठरवू शकत नाही. ज्याचा कोणाचा धर्म आहे त्यांनी ठरवावं की माझा धर्म कोणता. मी असं म्हणू शकत नाही की आदिवासी लोकांचा धर्म तो आहे

किंवा नाही. मला तो अधिकारच नाही. जो माणूस ज्या धर्माचा आहे त्याने उभं राहून सांगावं की माझा धर्म अमूक-अमूक आहे. हे प्रत्येकाला लागू आहे. धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक पातळीवर तो काय करतो यावरून त्याचा किंवा तिचा धर्म ठरतो. असं तिसरा माणूस सांगू शकत नाही.

दुसरी गोष्ट म्हणेज सगळया धर्माचं मध्यमवर्गीकरण होणं. आदिवासी समाज सुद्धा जसा पूर्वी होता तसा राहिलेला नाही. सर्व समाजामध्ये शिक्षणाचा, टीव्हीचा, मोबाईलचा प्रसार वेगाने होतो. तुमची इच्छा असो व नसो संध्याकाळी टिव्हीवर कार्यक्रम लागतात. ते कुठले लागतात ते माहिती आहे व त्याचा आपल्यावर काय परिणाम होतो तेही माहिती आहे. त्यामुळे आदिवासी समाजातील मुले ही मध्यमवर्गीय होतायत. उदा. आजच्या तारखेला ११,६२,००० मुलं शाळेत आहेत. हा असा आकडा आहे की सरकार ज्यांना फलोशिप वगैरे देतं. त्यामध्ये काही खोटे असतील. ही मुलं जर शाळेत गेली, ११ वी, १२ वी झाली तर ती उद्या मध्यमवर्गीय मुलांसारखं वागणार. उद्या १० वर्षामध्ये हा समाज झपाटयाने मध्यमवर्गीय होणार.

जी तुमची वाड-वडिलांची संस्कृती होती, ज्या तऱ्हेने वाड-वडील जगले, त्या तऱ्हेने मुलं जगणार नाही हे उघड आहे. त्या मुलांच्या मनात कुठल्या आकांक्षा येणार, कुठले विचार येणार, त्यांची स्वप्नं काय असतील? हे ३० वर्षापूर्वीच्या आदिवासींपेक्षा वेगळं असणार. ते लक्षात घेऊन त्याप्रमाणे गोष्टी कराव्या लागतील. ते जर लक्षात नाही घेतलं तर ते योग्य नाही. जसं सुरेखाताई म्हणाल्या की, असं मध्यमवर्गीयांचं मॉडेल हे आदिवासी समाजात येत असल्यामुळे आता आदिवासी बायका सुद्धा असं म्हणायला लागल्यात की, नवरा मारतो. ही आदिवासी संस्कृती नव्हती. पण मध्यमवर्गात रूपांतर झाल्यामुळे आदिवासी नवरे दारू पिऊन बायकांना मारायला लागणारेत. काही प्रमाणात हुंडयाच्या बाबतीत हे झालेलं आहे. आदिवासींमध्ये मुलीला दहेज द्यायचा पण सगळया ठिकाणी हे झपाट्याने बदलतंय. उदा. आदिवासींची लग्न साधी असायची, लोकं एकमेकांना वर्गणी करायचे, जास्तीत जास्त सव्वा मन तांदूळ दिले जायचे.पण आज बघितलं तर आदिवासी लग्नामध्ये किमान खर्च किती होतो ? कर्जत तालुक्यातला कातकरी जो सगळयात गरीब आहे त्याच्या लग्नात सुद्धा १५-२०००० रूपये कमीत कमी. चांगल्या परिस्थितीत हे अजून वाढत असेल. लग्न-पत्रिका ज्या छापल्या जातात त्या बिलकुल बाकीच्या समाजासारख्या छापल्या जातात. हे जर पुढची १० वर्षे चालत राहिलं तर ज्याला आपण आदिवासी समाज किंवा भेद म्हणतो तो फरक नाहीसा होणार आहे. आदिवासींचं झपाट्याने मध्यमवर्गीकरण होणारच आहे व ते तसं होतांना जी आव्हानं येतील याचा आपल्याला वेगळा विचार आपल्याला करावा लागणार आहे.

शेवटी मी एवढाच मुद्दा मांडतो, जर हे चित्र असेल तर विकासाचं धोरण कोणी ठरवायचं, कसं ठरवायचं याचा आपल्याला जबाब द्यावा लागणार आहे, वाहरूनी जे शब्द वापरले 'ऊलगुलान' हेच शब्द त्याला योग्य आहेत. सरकार जे धोरण ठरवतंय त्याला आदिवासी लोकांमधून उठाव झाला तरच या प्रक्रिया थांबतील. सरकार जे धोरण ठरवतंय त्याला आदिवासी लोकांनी स्वत: उठाव करून जर असं म्हटलं की, आमचं भवितव्य आम्ही ठरवणार आहोत, आम्हाला कसं जागायचं हे आम्ही ठरवणार आहोत. आम्हाला ज्या कायद्याची चौकट उपलब्ध आहे पेसा, राज्यघटना, याच्या अंतर्गत आम्ही हे अधिकार सिद्ध करणार आहोत. तरच या प्रक्रिया थांबतील. म्हणून प्रत्येक ग्रामसभा हे निर्णयाचं केंद्रबिंदू

आपल्याला करावं लागणार आहे. ग्रामसभेने सर्व तसे निर्णय घ्यावेत. आपला जर तलाव असेल तर तलावाचा ठेका आम्ही घेणार. जंगल असेल तर जंगलातील बांबू आम्ही विकणार. आमच्या गावात सरकारला कोंबड्या, बकऱ्या वाटायच्या असतील तर कोणाला द्यायच्या ते आम्ही ठरवणार. बायोगॅस द्यायचा असेल तर आम्ही सांगणार की कुठल्या घरांना द्यायचा. सगळया निर्णयांचा अधिकार जर ग्रामसभांनी घेतला आणि सरकारला सांगितलं की तुमचा जो आदिवासी विकास कार्यक्रम आहे त्याची पुनर्रचना करा. आज ४००० कोटींचा जो कार्यक्रम आहे त्यातील ७०% पैसं हे राज्य पातळीवर खर्च होतात. उरलेले जिल्हा पातळीवर येतात. त्याचं वाटप जिल्हा परिषद करते, पण ७०% नाशिकहून केलं जातं. त्याऐवजी त्यातील ५०% तरी पैसा हा ग्रामसभांच्या ताब्यात आला पाहिजे.

भारतात १०,००० आदिवासी ग्रामसभा असतील तर त्या प्रत्येकाला सरकारने ठरवून रक्कम द्यावी. तुमच्या वाट्याला लोकसंख्येप्रमाणे एक लाख रूपये येतील. त्या एक लाख रूपयांचा वापर कसा करायचा हे तुम्ही ठरवा. कुणी ग्रामसभा असं म्हणणार की पहिलं तलावाची डागडुजी करून घेऊ, कुणी म्हणेल जंगलात आम्हाला बांबू लावायचा आहे. त्याचा अधिकार त्या ग्रामसभेला असेल. आदिवासी विकासाचा पैसा असा त्या ग्रामसभेकडे असेल. आज दोन-तीनशे कार्यक्रम आहेत ते सगळे मुंबई-दिल्लीतल्या सरकारांनी लिहून ठरवलेले आहेत. त्यामुळे त्यात आदिवासींना एवढंच आहे की तुला कोंबड्या घ्यायच्या आहेत की, शेळया? त्याऐवजी जर स्वयं-निर्णय जर खऱ्या अर्थाने आला तर आदिवासी लोक असं म्हणू शकतील की आम्हाला कोंबड्याही नको, शेळयाही नकोत. आम्ही काही वेगळं करणार. हे आमचे पैसे आहेत. आम्ही ठरवू. अशा तऱ्हेने जर धोरणाची पुनर्रचना केली, म्हणजे सर्व हक्क आणि अधिकार जे घटनेने मान्य केलेले आहेत, तरच आदिवासींची परिस्थिती सुधारून एका वेगळया तऱ्हेने एकूण समाजाची रचना आदिवासींनी असं जर मार्गदर्शन केलं तर बाकीचा समाज सुद्धा त्यापासून शिकू शकतो. जसं मेंढ्याने केलं की त्या गावामुळे आता बाकीचे शिकतात. हे जर आदिवासी ग्रामसभांनी केलं, त्याचा परिणाम इतर गावांवर होऊ न वेगळया तऱ्हेची रचना, विकास त्यामध्ये होईल.

आपल्या दोन दिवसांच्या चिंतनातून अशा तऱ्हेच्या गोष्टी पुढे आलेल्या आहेत. ह्या चर्चेचं सार काढून त्याचा रिपोर्ट काढून सरकारला म्हणावं की, आदिवासी उत्थान कार्यक्रमाच्या समारोपानंतर आमचे हे निष्कर्ष आहेत, हे आम्ही सगळे मिळून तुमच्याकडे सादर करतो आहोत.

• • •

# पहिले राज्यस्तरीय आदिवासी साहित्य संमेलन

## दि. ४ व ५ मे २०१३, डिंबेगोहे बु. जि. पुणे

**अध्यक्षीय भाषण : उषाकिरण आत्राम,** जीवनमित्र



आदिवासींचा इतिहास व संस्कृती अती प्राचीन आहे. कारण आदिवासी हा माणूसच सर्वप्रथम या धरतीवर जन्मास आला, वाढला. या धरतीवर त्याने प्रेम केले. इथला निसर्ग त्याचा देव झाला. करोडो वर्षांपासून तो या धरतीवर वास करतो म्हणून तो भूमीपुत्र, धरतीपुत्र, पहिला मानव धरतीचा पृथ्वीचा वंशधर !

पृथ्वीची उत्पत्ती ३ अरब वर्षापूर्वी झाली, त्यावेळी पृथ्वी एक अग्नीचा गोळा होती. हजारो वर्षानंतर हा अग्नीगोळा थंड होवून जो प्रदेश भूभाग तयार झाला, त्याला पेंजिया, हे नाव दिले गेले. हा पेंजिया २ तुकड्यात विभाजीत झाला. उत्तरेकडचा अंगारा लॅन्ड व दक्षिणेकडचा गोंडवाना लॅन्ड.

२० लाख वर्षांपूर्वी मानवाची उत्पत्ती झाली. वनस्पती, पशुपक्षी, जीवतंजू विकसीत झाले. मानव म्हणजे करोडो वर्षांपूर्वी जीवजंतुपासून विकसीत झालेले रुप होय. या मानवाला करोडो वर्षानंतर विकसीत होत होत मानवी चेहरा रुप व आकार मिळाला. शरीराच्या विकासासोबतच बुद्धीचाही विकास झाला व तो प्रगती, विकासाचे अनेक टप्पे पार करीत चालू लागला. भूक तहान भागविण्यासाठी अन्न-पाणी शोधण्याची धडपड करुन करोडो वर्षे त्याच्या अनंत पिढ्यांनी अन्न, अग्नी, पाणी शोधले. कंदमुळे, बि-बियाणे शोधले. भाजून कच्चे मास व कंदमुळे खाल्ले. आश्रयासाठी डोंगरकपारी झाडाच्या ढोल्यात आश्रय घेतला.

नर-मादीच्या नैसर्गिक संयोगातून वंशवृध्दी होत गेली, तसतसे प्रेमभावना वात्सल्य, ममता, आपुलकी निर्माण होऊन दरीकंदरातून, झोपडी व नंतर घर उभे झाले. कुटुंब प्रमुख, कुटुंबबळ त्यातून समूह, एकजूट आणि समूह बळाची जाण व राजा अतिपत्ती, त्यानंतर भूभागाचा अधिपती राजा, मालकी हक्काची जाण यातून प्रशासन शिस्त, असे प्रगतीचे विविध टप्पे, प्रत्येक पिढीने त्यात नवनवे संशोधन केले. करोडो युगे, करोडो वर्षांच्या, अनेक हालअपेष्टा, संघर्ष करीत, प्राण्यांशी, शत्रूशी लढत,

लढत माणसाने विकास साधला. या युगाच्या प्रवासातील आदिवासी माणूस हा एकमेव प्रवासी होता. त्याच्या अनेक पिढ्यांनी हा प्रवास आणि धरतीच्या आणि निसर्गाच्या ह्रदयातूनच आपली जिवनवाट आपली दैनंदिन जीवनपध्दती काही नियम काही सवयी बनवून घेतल्या. चांगले वाईट, योग्य अयोग्य ह्यावर विचार केला.

मानवी जीवन व ह्या जीवनात आनंद, समाधान व काहीतरी पाहिजे ह्या लालसेपोटी अनेक शोध, अनेक प्रयोग करुन मानव हा बुद्धीमान आहे. विवेकशील व धैर्यवान, कर्तृत्त्ववान आणि किमयागार, तसाच कौशल्यदक्ष कारागीर आहे असे वाटले. त्याचा त्याच्या बुद्धीवर, श्रमावर, समुहबळावर कुटुंब व गावावर विश्वास, श्रध्दा व प्रेम वाढले. प्रगतीच्या अनेक टप्यांनंतर त्याने स्वत:ची सुसंस्कृत संस्कृती जन्मास घातली. जी मानवी मूल्यांचा आदर करणारी, मानवाला स्वातंत्र्य, न्याय, प्रेम देणारी, निसर्गातील पंचतत्वांना पूज्य माणणारी, आकाश, धरती, वायू, अग्नि आणि जल ही निसर्गाची देण आहे. त्यात शक्ती आहे. म्हणून ते पुजनीय आहे. झाडे वृक्षलता, पशुपक्षी, जिवजंतु यांचेकडून आपण बोलणे, वागणे, चालणे, गाणे, कुटुंब प्रेम भाव भावना शिकलो. ते जगण्यासाठी आपल्याला मदत करतात. सुख दु:खात ते सगेसोयरे आहेत. म्हणूनच तेही पूज्यनिय म्हणून तेही आपले देवदैवत. तर धरतीप्रमाणेच स्त्री नवीन जीवास जन्म घालणारी अद्‌भूत शक्ती आहे. म्हणून मातृशक्ती ही पूजनिय आहे. आपले पूर्वज, ज्यांच्यामुळे आपण या जगात जन्मास आलो, म्हणून तेही पूजनीय म्हणून तेही देवदैवते. एकूणच निसर्ग पुजक संस्कृतीचे पाईक. निसर्गाला आपला प्राणसख्या माणनारा आदिवासी मानव आहे. म्हणून त्याची संस्कृती जगात उच्च कोटीचे तत्वज्ञान व मानवीमूल्ये जोपासणारी आदर्श समूहवादी विशेष संस्कृती म्हणून प्रसिध्द आहे.

२० लाख वर्षांपूर्वी मानवी उत्पत्ती झाल्यावर करोडो वर्षानंतर विकास होत होत मानवाला त्याचे रुप आकार रंग मिळाले व मानव हा निसर्गातील सर्व जीवांपेक्षा वेगळा व बुध्दीमान आहे, असे त्यास वाटू लागले. प्रगतीच्या अनेक टप्प्यांनंतर समुहातून त्याने स्वत:चे भूभाग क्षेत्र, त्यावर आपले स्वामित्व सिध्द केले.

सिंधुसभ्यता, सिंधू संस्कृती ही अती प्राचीन शंभो द्विपातील (जंबोद्विप). अती प्राचीन, आद्य शंभोसंस्कृती होय. शंभुद्वीपाचा अधिपती राजा शंभो, हा मूलनिवासीयांचा महान तत्त्वयोगी राजा व गणप्रमुख होता. त्याआधी शंभोच्या गणप्रमुखांनी राज्य केले होते. २० लाख वर्षांपर्यंत पाषाणकालात मानव गिरीकंदरात, गुफादरीत राहत होता. पाषाणातून चित्रलिपी नक्षी, मूर्तीकाम करीत होता.

२६ लाख वर्षांनंतर गुफाकाल व कृषीकालात त्याने राहायला घर व कृषी, धान्ये, बी-बीयाणे याचा शोध लावला. शेती करणे, धान्यगोळा करणे, साठविणे त्याचप्रमाणे पाळीव प्राणी गुरेढोरे पाळणे. त्यापासून दूध, चामडी, शेतीसाठी उपयोग करणे भांडी, व्यापार उद्योगधंदे यात प्रगती झाली. नवनवे शोध लावले. धातुचा शोध त्यापासून भांडी, शस्त्रे, दागिने, मातीची घरे, जीवनउपयोगी वस्तू, सोने, चांदी, तांबे, लोखंडापासून मोती, पाचू रत्नेहिरे ह्यांचाही शोध लावला. तंत्रमंत्र, विद्या, नवनवीन कला, संगीत, नृत्यगीत कथा-माणूस गाऊ नाचू लागला. पशूपक्ष्यांचे आवाज, पावसाची टिपटिप, ढगांची गर्जना, वादळवारे नाद, सूर यापासून

माणसांनी शब्द सूर, नाद, लय, गती, अभिनय, आवाज घेऊन आपली संवाद भाषा शोधून काढली. मानवी निर्मितीनंतर भाषा निर्मितीचा विकास त्यानंतर समाजनिर्मिती व संस्कृतीचा उदय झाला. भाषेचा जसजसा विकास झाला तसतशी संस्कृती समृध्द होत गेली. कारण भाषेमुळेच संस्कृती रुपवान मौल्यवान व सौंदर्यवान, सशक्त व आदर्शवादी बनते.

शंभुव्दिपात अनेक समूह होते, आणि प्रयेक समुदायाची वेगवेगळी भाषा, बोली, त्या त्या समुहांनी जन्मास घातली होती. परंतु संस्कृती मात्र एकच होती. त्याचा आदर सन्मान करीत होते. राजा शंभो अती विद्वान, दयाळू, प्रेमळ, भोळा, तेवढाच तापट, उग्र व कर्तव्यनिष्ठ, कठोर तपश्यर्या करणारा, न्यायप्रिय व संरक्षक पालक, संहारक होता. मानव समूहासोबतच जीवजंतू, प्राणी पशु, पक्षी, वृक्षलता, डोंगरदऱ्या, पहाडदऱ्या, पर्वत, शिखरे, ग्रहतारे या सर्व शक्तींना पूजण्याची व निसर्ग नियमाचे पालन करणे, हा शंभोचा आदेश गणातील लोक तंतोतंत पाळत असे. जगणे, वागणे, व्यवहार रीतीनीती मधून संस्कृती फुलत गेली. एक सुंदर पायवाट माणसाला नीतीवान बनविण्यासाठी आदर्श मूल्ये जोपासण्यासाठी, आदिवासी संस्कृतीने संपूर्ण जगावरील मानव जातीसाठी निरंतर चिरंजीव व अखंड अशी मानवी जीवनासाठी पायवाट बनवून दिली. शंभूद्विपात सर्वत्र आनंदी आनंद होता. मोठो मोठी महानगरे, मोठमोठ्या राजधानी, विशाल भुखंड, जलजमीन, जंगलाची विपुल संपन्नता, पशुपक्षी, प्राणी, जनावरे, त्यांचे मोठमोठे कळप, धनधान्यांनी भरलेली कोठारे, रुपेचांदी, हिरेमोती, पाचूच्या खाणी, खजाने-दौलतखाणे होती.

मानवाने याच काळात कृषीशास्त्र, वनस्पती शास्त्र, स्थापत्यशास्त्र, औषधीशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, साहित्यकला, संगीत, नृत्यशास्त्र, भौतिक रसायनशास्त्र, जीवशास्त्र, शरीरशास्त्र, भूगोल, खगोल अग्निशास्त्र या सर्व शास्त्रांचा शोध याच काळात लागला. एवढेच नव्हे तर मंत्रतंत्र, विद्या, शस्त्रास्त्र यांचाही शोध लागला होता. लोक धनधान्ये पिकवून, गुराढोरांची मोठमोठे कळप पाळत होते. मोठमोठ्या हवेल्या, राजवाडे, किल्ले, उतुंग बुरुजे, कलादालने, शिल्पे, नक्षीकाम, कारीगिरी, उत्कृष्ट शिल्पे, लेण्या, गुंफेतील चित्रलिपी, रंगकाम, चित्रकाम, विविध उद्योगधंदे यामुळे भरभराटीस आलेले शंभुद्विप यशाच्या शिखरावर पोचले होते. दाहीदिशेला शंभुद्विपातील वैभवशाली राज्य व आनंदी लोकराज्य न्यायप्रिय, शिस्तप्रिय, समता, न्याय, स्वातंत्र्य असलेले धर्मपंथ, जाती विरहित उच्चनीच भेदभाव नसलेले राज्य म्हणून सर्वत्र प्रसिध्द होते. हे ऐकूणच आर्यांनी शंभुद्विपावर आक्रमणे केली. सोन्याचा धूर निघणारी महापुरे व गणराज्ये, जिथे पशुपक्षी, प्राणी व मनुष्य एकोप्यानी नांदतात, जिथे राजाप्रजा उच्चनिच भेद नाही. द्वेष केला जात नाही. जिथे निसर्ग व स्त्रीशक्तीची पूजा केली जाते. मोहोंजोदडो हडप्पा, कालीबंग, लोदल इ. संपन्नतेचे व वैभवतेचे उत्कृष्ट उदाहरण होय.

या महापुरांना आपण लुटून आपल्या ताब्यात घेऊ या लालसेनी आर्यांनी आक्रमणे केली. प्रथमत: ते गाईचे कळप घेऊन भटकत आले; त्यानंतर बहुरुपे घेऊन त्यांनी शंभुद्विपात प्रवेश केला. अनेक राज्यांत भ्रमंती केल्यानंतर मूळनिवासीयांच्या महानगरावर भुखंडावर, जमिनीवर जलनद्यांवर आक्रमणे केली व ताब्यात घेतली. भरलेली धान्याची कोठारे जाळून टाकली. रात्रीच्यावेळी महानगरे मोहोंजोदडो, हडप्पा, चौरागड सारखी आगी

लावून जाळली. मोठमोठ्या वनांना आगी लावल्या, दंडकारण्य त्याचे उदाहरण होय. गौशाला गुरं-ढोरे आगीत जळाली. माणसांची खुलेआम कत्तल केली. लहान लेकरांना भिंतीत भाल्याच्या टोकाने चिरुन काढली. स्त्रीयांवर बलात्कार-अत्याचार करुन आपल्यासाठी भोग्य दासी म्हणून हरममध्ये (जनानखाण्यात) ठेवल्या. हजारो वर्षांपर्यंत आर्य अनर्याचे हे महायुद्ध सुरु होते. वित्तहानी, प्राणहानी होऊन मूळवासियांचे आर्यांनी हालाहाल केले. शंभुभूमी लाल झाली. राजा शंभूला विष पाजले. त्याला मारण्यासाठी विविध कुटनिती, उपाय योजना चालविल्या. शंभुनी विष पचविले. त्याचे १४ गणांचे १४ गणप्रमुख जे १४ विद्येत निपुण होते. या १४ गणप्रमुखांना व त्यांच्या १४ मुख्य ठिकाणात आगी लावून त्यांना ठार केले. व देवासुर संग्राम - समुद्रमंथनातून १४ रत्ने मिळालीत असे जाहिर केले. (१४ वेदशाळा, विद्वाभुवन, प्रयोगशाळा होत.)

शंभोला बंदिस्त केले. महा हार झाली. त्यानंतर मूळच्या शंभोद्विपाचे नामकरण 'भारत' असे करण्यात आले व शंभोद्विप 'भारत' आर्यांचा विजय झाला. कपटनीतीने, दुष्टपणाने, धूर्तपणाने मूळवासियांचे शंभुद्विप जिंकले. यालाच नाव दिले देवासुर संग्राम. देव आणि असून ज्यांचे राज्य लुटले, त्यांना असुर दास, दस्यू, राक्षस, पिशाच्च, रानटी, काळेकमीन, चपट्या नाकाचे, अक्राळविक्राळ धरतीवरचे पापी जीव, भुतासारखे अशा नाना प्रकारच्या अपमानीत व नीच शब्दात हेडाळणी करुन त्यांना दास, गुलाम बनविले. काही समुहांनी हार पत्करुन गुलामी पत्करली. ते गावकुसाबाहेरचे आमचेच भाऊ त्यांना अस्पृश्य संबोधून गावाबाहेर दास गुलाम बनवून ठेवले आणि जे प्राण मुठीत घेऊन पुन्हा रानावनात जाऊन लपवून जगू लागले, त्यांना हे वनवासी, रानटी धरतीचे पापी जीव, लंगोटे, नाना तऱ्हेची दूषणे देऊन उपरोधिकपणे त्यांची खिल्ली उडवत राहिले. देवदानव संग्राम लढाईचे रसपूर्ण वर्णन करुन मौखिक रुपात प्रचलीत ठेवले. व नंतर लिहिले ते ऋग्वेद, त्यानंतर रामायण, महाभारत, १८ पुराणे, इतर धर्मग्रंथ या ग्रंथांत मूळनिवासीयांच्या वैभवशाली राज्याचे, त्यांच्या धनसपंन्न ऐश्वर्याचे, त्यांच्या कलागुण, संगीत, साहित्याचे व उच्चप्रतीच्या आदर्शवादी संस्कृती व इतिहासाबद्दल एकही मौल्यवान शब्द खर्चून गौरव केला तर नाहीच; परंतु आयत्या बिळामध्ये घुसलेल्या नागोबांनी नुसती गरळ ओकून मूळवासियांना देता येईल, तेवढ्या शिव्या शाप, अपमानीत व खालच्या दर्जाच्या शिव्या देवून त्यांच्या साहित्या मध्ये विद्रूप व नेहमीसाठी किळसवाणे चित्र उभे करुन ठेवले.

इतिहासाला त्यांनीच साक्ष ठेवले. धर्मग्रंथांनाही त्यांनीच साक्ष ठेवले. परंतु लिहिणारे, वाचणारे प्रसार करणारे वैभवगाथा, गौरवगाथा लिहिणारे कोण होते ? अशाप्रकारे शंभोद्विपावर वारंवार आक्रमणे करुन आर्य, हुंड, रुहेल, अरब, रोमन, अरब काबुली, शेख सैय्यद, मुगल, पठान, मंगोली, चिनी, तिबेटी, जामील, तूल, फ्रेंच, पोर्तुगीज, जर्मन आणि अजवेनिस ह्यांनी वारंवार स्वाऱ्या करुन संपूर्ण कुयवाराष्ट्र (कोयाराष्ट्र) उदध्वस्त केले, मातीत मिसळून टाकले. त्यांना तर बेघर, दरदर ठोकराखात अत्यंत हलाखीचे, गुलामीचे जीवन दिले. एवढेच नव्हेतर माणसांची गुलाम म्हणून विक्रीच्या मोठमोठ्या बाजारपेठा प्रसिद्ध होत्या. युरोपमध्ये काबूल, बगदाद, अदन, काहीरा आणि पुरुषापुर गुलामांच्या विक्रीसाठी प्रसिद्ध बाजार (हाट) होता.

''शंभुच्या गणातील ७५० गोत्रांना त्यांनी ठार

केले, त्यांचे १४ भुवन (सत्ताकेंद्र) राज्य नष्ट केले आणि ७५० गोत्रांना ठार केले व साडेसाती ही शिवीगाळ केली, साडेसाती ही शिवी, कायमचा वाक्प्रचार आदिवासींच्या नावाने आजही कायम आहे. जी आदिवासींसाठी ७५० गोत्र शुभांक आहे. सर्व गोत्रातील भावंडे आहेत.'' मूळवासियांची अधिसत्ता धुळीत मिसळली, त्याचबरोबर त्यांची सुरम्य संस्कृती, भाषा, इतिहास व वैभवसंपन्न जीवन संपले. जेव्हा गणप्रमुखाला विष दिले व गुलामांना बंदिस्त केले त्यावेळी आर्यांनी आपली संस्कृती भाषा व धर्म स्वीकारुन गुलामी स्वीकारण्यास बाध्य केले.

त्यावेळी स्वाभीमानी आदिवासींनी स्पष्टपणे सांगितले, ''आम्ही जंगलात जनावरांसोबत राहणे पसंत करु; परंतु तुमचेसोबत गावात राहणे आम्हाला पसंत नाही. कारण तुमची संस्कृती आमच्या संस्कृतीपेक्षा पूर्णत: भिन्न आहे. आमची संस्कृती उच्चदर्जाची, उच्चकोटीची, मानवी व समूहमूल्ये निसर्गमूल्ये जपणारी आहे. मातृपूजक, जाती विरहीत, धर्मविहरीत आहे. आम्ही धरती, निसर्गाचे, पूर्वजाचे पूजक आहोत. आम्ही हवन करीत नसतो, पूजन करीत असतो.'' असे उत्तर देताना करोडोचे प्राण घेतले गेले. हत्तीच्या पायाखाली, उकळल्या तेलात, मुंड्या कापल्या आणि कडेकपारीवरुन लोटून लाखोंना जीव द्यावा लागला. त्यामुळे उरले सुरले जीवाच्या भीतीने त्यांचा धर्म, संस्कृती, भाषा व त्यांच्याच रुढी, परंपरा स्वीकारुन गुलाम, दास बनले, ते आजचे अस्पृश्य, महार, मांग होय.

मूळचा धर्म, भाषा, संस्कृती, रीतीनिती आपोआपच विसरत गेले. नाईलाजाने त्यांना आर्यांचा धर्म, भाषा, संस्कृती, देवधर्म स्वीकारावे लागले. त्यामुळे ते आपली भाषा, धर्म, संस्कृती विसरले. परंतु रानात जे जीव लपून राहिले त्यांनी तिथेही आपली भाषा, निसर्ग धर्म, पूजा, संस्कृती, रीतीनीती, परंपरा, प्रथा जिवंत ठेवल्या व करोडो वर्षापासून ते रानातच अपार यातनांचे क्रूस घेवून जगत राहिले, ते आदिवासी होय. आपला आनंदी, उदार स्वभाव आपली उच्च कोटीची संस्कृती, आपल्या भाषा बोलत राहिले. गीत, कथा, कहाण्या, देवधर्म, चालीरीती, जीवनव्यवहार आनंदाने जगत राहिले. निसर्ग चक्राप्रमाणे आपल्या मानवी जीवनास वळण दिले. काही निर्बंध, काही नियम समाज मान्य केले. आपली संस्कृती जपत राहिले. यासोबतच भाषा, रुढी, प्रथा, परंपरा जपून ठेवल्या.

**संस्कृती :** आदिवासी संस्कृती निसर्गपूजक, पंचतत्वांना देव मानते, आपल्या पूर्वजांना व जन्मदेणाऱ्या मातापित्यांना पूज्य मानते. मातृशक्ती मानते. स्त्रीपुरुष भेदाभेद मानत नाही. स्त्रीला स्वमर्जीने जोडीदार निवडता येतो. स्वमर्जीने काडीमोड घेता येतो. विधवेला पुनर्विवाह करता येतो. मुलीच्या वडीलास देज वधुमूल्ये देण्याची पध्दत आहे. मुलीला धनाची पेटी मानतात. स्त्री जन्माचे स्वागत करतात. स्त्रीभ्रूण हत्या, वेश्या व्यवसाय, स्त्रीचा छळ, हुंडाबळी या समाजात, संस्कृतीमध्ये नाही. वंशाचा दिवा मुलगाच हवा असी अट्टाहास नाही. मुलीचे लग्न करुन तिच्या संमतीने घरजावई आणण्याची प्रथा आदिवासींमध्ये आहे. गोटुलात तरुणतरुणींना भावी जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य आहे. समाज, राज्य, शेतीशिकारी, सामाजिक धार्मिक नीतीमूल्ये तिथे शिकविली जातात. गोटुलात वंशवृध्दी, शारीरिक शिक्षण, कलानेतृत्व, नृत्यनाट्य, गीत, सण, त्यौहार, लोककला, लोकसाहित्य याबाबत शिक्षण दिले जायचे. परंतु आर्यांच्या आक्रमणानंतर व वारंवार इतर बाहेरच्या लोकांची आक्रमणे केलीत आणि अनैतिक,

व्याभिचार, स्वैराचार अशाप्रकारे चुकीची माहिती लिहून एकेकाळचे गोटूल ज्ञानकेंद्र उद्ध्वस्त केले गेले.

आदिवासी संस्कृतीमध्ये कुलचिन्हास दैवत मानले जाते. हे कुलचिन्ह वृक्षलता, प्राणी, पशुपक्षी आहेत. मृतांना जमिनीत पुरतात, भीक मागणे, खोटे बोलणे पाप समजतात. बळी देण्याची पध्दत आहे. वृक्ष, धान्य, धरती, पाणी अग्नि, पशुपक्षी व पूर्वजांची पूजा करतात. मृत्यूनंतर उरस्कल दगडीचीरा गाडण्याची, मठ बांधण्याची पद्धत आहे. आदिवासी संस्कृती सर्वसमावेषक समूह सहकार, समानता यावर आधारीत आहे. जुन्याकाळात समुहाने शेती करणे, विवाह, मृतकार्य, जन्म, सण-उत्सव समुहाने मानतात. आर्य त्यांचा धर्म व संस्कृती व सततच्या संपर्कामुळे आदिवासी संस्कृती, भाषा नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ती फार मोठी चिंता आहे.

**लिपी व साहित्य :** इ. स. पूर्व १० हजार ते ५ हजार वर्षांपर्यंत इथे प्राकृत पाली पैशाची व गोंडी या राजमान्य राज्यभाषा होत्या. आर्यांनी इथल्या मूळ निवासीयांच्या भाषा, लोकसाहित्य (मौखिक) ऐकून आपली मिश्र भाषा तयार केली. गुप्त भाषा नावाने तिचा आर्यांच्या समुहात प्रचार प्रसार केला. आपल्या पूर्वजांचा गौरव केला गेला. तोपर्यंत त्यांचे साहित्य सुद्धा लिखित नव्हते. कारण लिपी व कागदाचा शोध तोपर्यंत लागलेला नव्हता. कालीदास, भवभुती, भरतरी, आर्यभट्ट, मिरसेन या विद्वानांनी आपल्या गुप्त भाषा, धर्म, संस्कृतीचा प्रचार केला.

मूळनिवासीयांची चित्रलिपी होती व ती दगडी शिल्पातून गुफांदारी गिरीकंदरात, पाषाणावर, दगडी खांबावर, खडकावर अंकित होती. तीच त्यांची सांकेतिक चित्रलिपी होती.

कुशीनगर, सांची, गया, एल्लोरा, कुटुंम्बसार, गुमेवाडा (मुर्दावली), मोहोंजोदाडो, हडप्पा, कालीबंग, लोधल येथील पाषाणावरील चित्रलिपी निलकोंडा, सिमडेग्रा, सिंहबोंगा, सरसुजा, मार्कडा इ. ठिकाणी असलेली चित्रलिपी हीच मूळनिवासीयांची लिपी होती. ही चित्रलिपी हीच आदिवासीची गोंडी लिपी, कोयालिपी असल्याचे 'सौदवी लिपीका अद्वाचन' या ग्रंथात मोतीरावण कंगाली यांनी व्यक्त केले आहे.

६ व्या शतकात मोहम्मद पैगंबरांनी फारसी भाषेचा प्रचार इस्लामसाठी केला आणि दुनियेत चीनने लिपी आणि कागदाचा अविष्कार केला; परंतु तो गुप्त ठेवला होता. ६ व्या शतकामध्ये मोहमदबिन कासीमने भारतावर आक्रमण केले व चिनची चित्रलिपी व कागदाचा प्रचार युरोपच्या बाजारात केला. अरबी लिपी सुद्धा त्याच सुमारास प्रचलित केली.

७ व्या ते १० व्या शतकापर्यंत नगर संस्कृती उदयास येऊन विकसीत झाली व नागरीलिपी तयार करुन १३ व्या १४ व्या शतकामध्ये नागरीला देव शब्द जोडून देवनागरी लिपी असा भारतभर प्रसार प्रचार केला.

१४ व्या शतकामध्ये युरोमपध्ये औद्योगिक क्रांती होऊन कागद आणि मशीनचा अविष्कार झाला. तेव्हापासून देवनागरी १९३५ पासून लिपी नावाने लिखीत स्वरुपात उदयास आली. हिन्दी, मराठी सुद्धा.

ह्याचाच अर्थ १४ व्या शतकापर्यंत कोणतीच लिपी लिखीत स्वरुपात नव्हती व साहित्य सुद्धा लिखीत स्वरुपात नव्हते. १४ व्या शतकानंतरच लिपीचा अविष्कार होऊन साहित्य लिखित स्वरुपात आले. ह्याचाच अर्थ जर आर्यांची संस्कृत भाषा लिपीबद्ध प्राचीन काळापासून

असती तर अशोकाने साँची स्तुपावर, अशोकस्तंभावर पाली ऐवजी संस्कृतमध्ये स्तंभलेखन केले असते. ह्याचाच अर्थ संस्कृत भाषा व लिपी १४ व्या शतकानंतरची आहे व मूळनिवासीयांच्या प्राचीन बोलीभाषा, पैशाची, प्राकृत पाली व गोंडी या भाषा अतीप्राचीन आहे. मोहोंजोदोडो, हडप्पा मधील चित्रलिपी ही गोंडी सैदलीलिपी आहे. असे इतिहासतज्ञ, गोंडी भाषेचे अभ्यासक मोतीरावेन कंगाली ह्याची 'सैदवी लिपीका उद्वाचन' या ग्रंथात मत व्यक्त केले आहे.

आदिवासी हे मूळनिवासी असून ते निसर्गधर्माचे पूजक असून त्यांची संस्कृती पूर्णपणे भिन्न स्वरुपाची आहे, त्यामुळेच ते हिंदू नाहीत, असे एस.पी.सेन सुप्रीम कोर्टाचे मुख्य न्यायाधिश यांनी निर्णय दिला. तसेच लोकमान्य टिळकांनी भारतात 'आर्यांचे आगमन' या ग्रंथात सुध्दा मूळनिवासी इतलेच आहे, असे म्हटले, पं. नेहरुंनी आदिवासी हेच इथले मूळनिवासी आहेत, असे म्हटले. म. गांधींनी गोलमेज परिषदेत आम्ही हिंदू आर्य काही हजार वर्षापूर्वी भारतात आलो, असे म्हटले. डॉ. मार्कडेंय व काटजु आणि सुधा मिश्र इंडिया एक्सप्रेसचे अध्यक्ष यांनी आदिवासी मूळनिवासी फक्त या देशातील मुळ रहिवासी आहेत, बाकी सर्व बाहेरुन आलेले आहेत असे दै. लोकमत व लोकमत समाचार, दलित आदिवासी दुनिया मध्ये अलिकडेच मत व्यक्त केले.

यावरुन मुळनिवासी, त्यांची भाषा, संस्कृती ही त्यांच्या इतकीच प्राचीन आहे, असे अनेक अभ्यासकांचे मत आहे व ते सूर्यप्रकाशाइतके सत्य आहे यात शंकाच नाही.

**साहित्य-लेखन :** हे लोकशाहीचे सामाजिकरण करण्याचे काम प्रभावीपणे करु शकते. समाजातील अंत:प्रवाहाचे ज्ञान लेखकाला होते. तोच समाजातील घडामोडीचे आकलन व मूल्यमापन प्रथम करतो. कारण तो समाजाचा एन्टीना असतो, असे डॉ. म. ना. वानखेडे यांचे मत आहे तर आगष्ट, कौम्ट आणि लेन या विचारवंतानी लेखकाला समाज जसा प्रभावीत करतो, तसाच 'लेखकही समाजाला प्रभावित करतो. सामाजिक जाणीवेनी लिहिणे ही केवळ जबाबदारीच नाही तर त्याचे प्रथम कर्तव्य आहे. कारण साहित्य हा समाजाचा आरसा आहे. संस्कृतीचे प्रतिबिंब आहे', असे म्हणतो, तर जॉनपाल सार्थ म्हणतो – लेखन हे केवळ लेखन नव्हे, ती कृतीही आहे. माझा ज्या दृष्टप्रवृत्ती विरोधात सतत संघर्ष चालू असतो त्या संघर्षाला लेखकाने हेतुपूर्वक वापरायचे हत्यार असते हे लेखकाने समजून घेणे जरुरी आहे, असे म्हटले आहे. (वॉटइज द लिटरेचर १०२० पू. २१६ अ.भा.द.सा.सं.भाषणे)

मित्रहो । म्हणून आदिवासी समाजावर सतत झालेली आक्रमणे, लूट त्यामुळे त्यांची भाषा संस्कृती, इतिहास, भूमीवरचा मालकी हक्क जाणून आज अत्यंत दैयानेत्र स्थितीमध्ये हा समाज दरदर ठोकरा खात आहे. मराठी, हिंदी, ख्रिश्चन, मुस्लिम, दलित, जैन या साहित्यामध्ये सुद्धा आदिवासींच्या साहित्याची दखल न घेतल्यामुळे व आदिवासी साहित्य हे स्वतंत्र, भाषा, संस्कृती, इतिहास प्राचीनत्व व त्याचा युग प्रवास त्यांचे जखमाळ जीवन व सतत होत राहिलेले शोषण, स्वातत्र्यानंतरही अंधारात चाचपडणाऱ्या या समाजमनाच्या व्यथा व अस्मिता त्यांनी गेल्या २०/३० वर्षापासून आदिवासी साहित्यामधून मांडल्या व आदिवासी साहित्याची अस्मिता, मौलिकता, सौंदर्य व व्यापक यथार्थ

जीवन संस्कृतीचे दर्शन अनेक लेखकांनी कविता, कथा, नाटके, आत्मचरित्र यातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. महाराष्ट्रासोबतच आंध्रप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, राजस्थान, कर्नाटक, छत्तीसगड, मध्यप्रदेश इ. राज्यातील लेखक आज आपआपल्या भाषेमधून साहित्य निर्मिती करीत आहे. महाराष्ट्रात सर्वप्रथम आदिवासींची कविता भरगच्छ रानफुलांसारखी भरभरुन काव्यरुपांनी बहरुन आली. भुजंग मेश्राम, नेताजी राजगडकर, वाहरु सोनवणे, उषाकिरण आत्राम, पुंडलिक आत्राम, बाबाराव मडावी, प्रभुराज गडकर, कृष्णकुमार चांदेकर, वसंत कन्नाके, मारोती उईके, चामुलाल राठवा, शंकर बळी सारखे कवि आपल्या दमदार कविता घेवून इथल्या प्रस्थापित साहित्याला आपल्या प्रगल्भ प्रतिमेची व अस्मितेची, सौंदर्याची व संस्कृती, भाषेची व संपन्न सशक्त साहित्याची देण देवून कथा, आत्मचरित्र, कादंबरी, ललीत साहित्यासारखे मोलाची भर घालीत आहे.

तरी सुद्धा कांदबरी कथा व आत्मचरित्रे, नाटके, प्रवासवर्णने, पत्रलेखन, निबंधलेखन, वैचारिक लेखनाचे दालन अजून खालीच आहे. मारोती उईके, प्रा. माहेश्वरी जावीत, डॉ. विनायक तुमराम, बाबाराव मडावी, शंकर बळी यात भर टाकत आहे. नजूबाई गावीत, बाबाराव मडावी, रामराजे आत्राम नंतर आत्मचरित्रे वाचायला मिळालेली नाही. कथा क्षेत्रात प्रा. सरकुंडे, उषाकिरण आत्राम, रामराजे आत्राम, बाबाराव मडावी यांच्यापुढे नविन कथा संग्रहाची संख्या वाढलेली नाही. नव्या दमाच्या लेखकांनी आपली प्रहरीची नजर ठेवून नव्या जाणिवेनी आपले लेखन स्वतंत्रपणे करावे. आदिवासींच्या अनेक बोली भाषा व त्यातील मौखिक साहित्य, इतिहास व संस्कृती, लोकजीवन, कलानृत्य, संगीत या साऱ्या साहित्याचा आपल्या अभ्यासू नजरेनी व प्रगल्भ जाणिवेनी नव्या पध्दतीने कोणतीही कॉपी न करता मोकळ्यापणाने, स्वतंत्र शैलीने लिहावे कोणत्याही साचेबद्ध, ठेवणीतल्या मर्यादांना न जुमानता, कुणाचीही पर्वा न करता मुक्तपणे आपले विचार, आपल्यावरील अत्याचार, अन्याय, शोषण व सावत्रपणापाई आजची दैयनिय स्थिती यावर मनसोक्त लिहावे.

साहित्यशास्त्र, व्याकरण, सौंदर्यशास्त्र व आपला इतिहास आपणच आपल्या जाणिवेतून लिहावा. आपल्या अनुभूतीचा दीपस्तंभ चेतवत ठेवून अंधाराचे वलय कापत अस्मितेची ज्योत पेटवत, अस्मितीची सुगंधी मोहर अक्षर धारेतून सदैव झऱ्यासारखे वाहत ठेवून लिहायचे आहे. आज आपल्या मूळसंस्कृती भाषेवर व आपल्या अस्तित्वाचा सर्व बाजुंनी घाव घालणे सुरु आहे. धर्मांतर, जागतिकीकरण, औद्योगिकीकरण या फासात अडकवून ठेवले आहे.जल जमीन जंगल केव्हाच काढले. घरदार, झोपडी व गांव सुध्दा माझे म्हणायला नाही. आज आदिवासी वाळलेल्या पाचोळ्यासारख्या निर्जिव बेघर दिशाहिन लाटेसोबत नुसताच भिरभिरत आहे. नक्षलवादी तर भाऊ भावाला कापत आहे. औद्योगिकीकरणापायी जमिनी गेल्या, विस्थापित व शरणार्थी ठरविले. भुके, कंगाल, कुपोषण, दारिद्र्याने भयानक भीतीने तो भयभित आहे. जो तो स्वार्थाने भाजीच्या वाट्याप्रमाणे त्याची वाटणी करतो आहे. शिक्षणाच्या नावाखाली आश्रमशाळेतून मुलींचे शोषण होत आहे. राजकिय धनदांडगे गरीब आदिवासी व त्यांच्या मुलींना कामाच्या नावाखाली फसवून महानगरात विक्री करीत आहे.

आज सर्व स्तरावरुन होणारी लूट व अत्याचार थांबविण्यासाठी आदिवासींच्या ४७ सही जमातीने एकत्र

येऊन बेटी रोटी आंतरीक व्यवहार करावा. आपल्या भाषा, संस्कृती, इतिहास व समाजाचे दु:ख शहाणपणाने समजून घेऊन एकतेनी लढा द्यावा व नवे साहित्य नवेनवे ग्रंथ, नवा इतिहास लिहून काढणे गरजेचे आहे. इथल्या प्रस्तावित लादलेल्या व्यवस्थेच्या छाताडावर आग लावूनच हे काम करायचे, असे भुजंग मेश्राम म्हणतो.

गाव बांधणी म्हणजेच एवढे करायचच आहे.

इथल्या व्यवस्थेच्या छाताडावर आग्या मोहळ होऊन बसायचं आहे. गप्प बसून चालणार नाही. अंधारात आग लावल्याशिवाय उजेड दिसणार नाही. आणि हे काम नव्या लेखकांनी करावे. वृत्तपत्रे, मासिके, दैनिके, दूरदर्शन, प्रसिध्दी यामध्ये आपली नाहीत; परंतु लेखणी आपली आहे. या लेखणीच्या तलवारीने लढणे शिका साहित्याची पताका उदंड फडकावित ठेवा, एवढीच आशा करते.

*जाता जाता एवढेच म्हणते –*

*फुले मी माळीत नाही पळसाची आग होते,*
*अंधाराची कुस फाडून तुमच्यासाठी सूर्य होते ...!*

• • •

# मावा गोंडोनी!
# (माझे सुदंर प्रिये)

**– उषाकिरण आत्राम**

*''मावा गोंडोनी सांगेल .....''*
*तु येशील ......भेटायला.....*
*गर्दरानाच्या हिरव्याकंच*
*वेळूबनातून...........*
*दाटदुट्ट नवीकोवळी कंचपालवी पांघरूण*
*रान सजलं नव्या नवरीसारखं.......*
*वाहत्या झऱ्याच्या धारेत न्हाशील.......*
*तेव्हा धारेतून सोडीन दोन कमळीफुलं......*
*रिठे बोरं आवळे–केसांना चोळून घेशील*
*आन् –तळयाच्या पोटातली चिक्कणमाती*
*लोण्यासारखी अंगभर लावून न्हाशील*
*मी वेणूच्या जाळीतून चोरून पाहीन....*
*तू मासोळी सारखं – सैलसर पोहून घे.....*
*पण ध्यानात घेशील......*
*आजूबाजूला बंदुकधारी झाडाझाडात लपून*
*बंदूक रोखून ....धरतील तुला.....*
*एस आर पी – पोलिसांचा खडा पहारा*
*दबा धरून–डोंगरदरीत– तरूतली वेळूबनात*
*त्यांनाही आपणच हवेत......!*
*तरीही ...... तू येच.....!*
*हातात तुम्मा भरून*
*मक्काकोदोची आंबट जावा (आंबील)*
*आणि भाजके मिरचे – चिंचेचे बोटकं*
*मोवई पळसाची तांलीतेलवानी पानं*
*मी ! आनीन शिलका डोफे शिवायला*
*तुझ्या हातचा डोफा – त्यात तुंब्यातली जावा*

*मी पाहीन त्यात 'गोंडोनी' तुला.....*
*भिवू नकोस ..... ताठ मानेनी ये !*
*झऱ्यासारखी खळखळत उधानत ये.......*
*.......लाटेसारखी........!*
*हरणासारखी वारा पित*
*पाखरासारखी उडत उडत*
*रानचाफ्यासारखी फुलारून ये*
*सुगंध पेरत ये......*
*मी दिलेली 'नक्षीदार फणी' खोवून ये*
*बहाव्याची धम्मपिवळी आणि*
*सजनी चिलहाटीची गुलाबी मोतीया फुल*
*मी बांधून देईन गजरा - काटेरी फुलांचा*
*रानशे! धावत सुटलो असतो*
*रानवाऱ्यासारखं सैर भैर भुंग्यासारखं*
*मनसोक्त पोहलो असतो मासोळी झिंग्यासारखं*
*लपालपी खेळलो असतो कासव सश्यासारखं*
*शिरून 'गोदयांत' मैनाराघोसारखं*
*खाल्ली असती मधाचीपुरी*
*इंद्रावतीच्या धारेत 'बंददोन' शिंपल्यासारखं*
*एकरूप होवून........*
*घातला असता मोती जन्मास 'त्या दोन बंद' शिंपल्यात*
*पण सारे स्वप्न उडाले.... पळसपापडी सारखे.....*
*ना झोपडी - ना गोटूल - ना घर ना आडोसा*
*ना झाडाची ढोली - ना डोंगरातली गुफा*
*ना झाडाची सावली - ना आरोशी - मारोशी*
*काय करावं? कुठं भेटावं?*
*कसा करावा प्रेमाचा शृंगार*
*कसा करावा शहरी लोकांसारखा*
*मधुचंद्र साजरा.......?*
*जगण्याचं सरण.....की, मरणांती सरण?*
*पावलोपावली - सिंदबणासारखे - पोलीस*
*काटयाकुपासारखे जागोजागी नक्षलवादी*
*घेवून बंदूका - धावतात त्यांच्या भयानक गाडया*
*आम्ही लपूनछपून पाहायचीही हिंमत करत नाही*
*नाहीतर ..... खबऱ्या ठरवून*
*करतील चौकात हत्या!*
*पण घाबरू नको.......*
*तुझ्या कोयत्याला आणखी धार दे......*
*तिरकामठयाचा नेम माझा चुकत नाही...*
*नदीकाठावरच्या ओल्या मातीवर*
*पावलं टाकत ये.......*
*ते उमटतील माझ्या हृदय अंगणात....*
*मी उभा..... तू ये .......*
*डोक्यावर सुर्य तळपत आहे*
*सुर्यस्नान करून*
*''अस्तित्वाची लढाई तर लढलीच पाहिजे*
*चाहे सर कटे.......*
*या हात.......''*
*''वाघा, नागा, सागाची माझी अस्सल संस्कृती''*
*कोयूतर कोयूतर कोया वंशी*
*कोयता लखलखते.....ओ*
*नावा गोंडोनी.....चक् चक्!*


• • •

ओळख

# रानगर्भातील जखमा

## (काव्यसंग्रह)

**डॉ. मच्छिंद्र चोरमारे**




प्रा. डॉ. विनायक तुमराम यांच्या 'गोंडवन पेटले आहे' या 'रानगर्भातील जखमा' हा त्यांचा दुसरा कवितासंग्रह प्रकाशित झाला. डॉ. विनायक तुमरामांचा परिचय हा कवितेने जसा होतो, तसा तो वैचारिक, संशोधन, संपादन आणि चरित्रलेखनानेसुद्धा होतो. त्यांच्यातला कवी आदिवासींच्या दु:खाशी, शोषणाशी आणि उठावाशी ज्या वैचारिक सामर्थ्याने भिडतो, ते आदिवासींचं समग्र परिवर्तन मांडण्याच्या दृष्टीने अत्यंत क्रांतीकारी आहे.

आदिवासींच्या आणि प्रस्थापित व्यवस्थेच्या संदर्भातील अतिशय सूक्ष्म निरीक्षण, प्रगाढ चिंतन, अभ्यासपूर्ण नोंदी आणि अश्वासक भाष्य त्यांच्या हरेक कवितेतून जाणवतं. एक प्रचंड अस्वस्थता आणि विचारभिमुखता उभी राहते. केवळ सौंदर्यानुभूती आणि त्याची अभिव्यक्ती एवढयावरच तुमरामांची कविता उभी नाही. तिला वेदनेचे, दु:खाचे, शोषणाचे, शौर्याचे, जंगलजिव्हाराचे असंख्य पदर बिलगलेले आहेत. ही कविता आदिवासींचे केवळ जहरी प्रश्न उभे करून स्वस्थ बसत नाही, तर तितकीच समर्पक उत्तरे पुढयात ठेवते. उत्तराच्या प्राप्तीसाठी सतत संघर्षरत राहते. म्हणून आव्हानात्मक आणि संघर्षशीलता हा डॉ. विनायक तुमरामांच्या कवितेचा बाणा ठरतो. ही केवळ उभ्या ओळीतल्या आडव्या शब्दांची कविता नाही. तर शब्दाशब्दांतून आदिवासींच्या सन्मानित जगण्याची क्रांतिदर्शी कविता आहे. ते म्हणतात,

*किती काळ चेतवाव्या*
*समिधा या वेदनांच्या*
*किती वेळ थोपवाव्या उठता कळा भुकेच्या*

आदिवासींच्या जीवनात सुखसमृद्धीचा आणि आर्थिक संपन्नतेचा काळ कधी येईल? याची विचारणा करणारी ही कविता आहे. आपण किती दिवस हा पोटाचा माठ अर्धवट ठेवणार? किती काळ दैहिक, मानसिक वेदनांचा छळ सहन करणार? वेदनेच्या अन् भुकेच्या कळेला आपण कुठवर थोपवायचं? ज्यावर आपली उपजिविका आहे; ते जल, जंगल, जमीन आपल्या हातून हिसकावून घेतले जात आहे. आपल्याला निराश्रित केलं जात आहे. याचं शल्य या कवीला बोचत राहतं. म्हणून देशाला स्वातंत्र्य मिळूनही आदिवासींचे खरे प्रश्न सुटले नाहीत. त्यांचा आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय आणि शैक्षणिक विकास हा पूर्णत्वास गेला नाही. म्हणून कवी स्वातंत्र्याला उद्देशून म्हणतो.

*वादळाशी झुंजणारे रानदिवे*
*तू कधी चेतविले नाहीस*
*जंगलजिव्हार कुशीत घेऊन*
*आसवे ढाळणारी घायाळ अवस*
*तू कधी अनुभवली नाहीस.....*

'सोफेस्टिकेटेड' चेहरा घेऊन स्वातंत्र्य आले. ते तळागाळांतल्या माणसापर्यंत झिरपले नाही. इथली पारंपरिक वर्णाश्रित ओळख त्याने पुसली नाही. आणि आपली संविधानिक अशी नवी ओळख निर्माण केली नाही. दलित, आदिवासींची मूळ दु:खे त्यांनी अनुभवली नाही. स्वातंत्र्याचा मनमुराद उपभोग घेण्यास आसूसल्यांनी प्रथम स्वातंत्र्य आणि नंतर सामाजिक सुधारणांची हटवादी खेळी खेळून स्वातंत्र्य आणले. आणि तोच आता,

*काटा कधी न ज्यांच्या रूतला असेल पायी*
*रानातल्या मुक्यांची ते नोंदविता जबानी*

अशी कृत्ये करीत आहेत. आदिवासींच्या सोयी सवलतींचा मलिदा खात आहेत. वर्णव्यवस्था रक्तात भिणून गेलेले लोक आदिवासींचं भयानक शोषण कसे करतात, यासाठी कवी म्हणतो....

*माझी आदिवासी माय*
*चालत येते त्या बाजारगर्दीत*
*केवळ शेरभर मिठासाठी*
*दोन पायल्या चारोळया*
*अन् छटाकभर जीरा-हळदीसाठी*
*पायलीभर मोहडोंबरी*
*निष्कपट भावाने विकून मोकळी होते*
*अन् शोषकांचे उखळ पांढरे होते*

समाज व्यवस्थेची कैफियत डॉ. विनायक तुमरामांनी 'रानगर्भातील जखमा' मधून समर्थपणे मांडली आहे. आदिवासी साहित्याचा धनुष्य ते आपल्या विद्वत्तेने आणि वाङ्मयीन निष्ठेने पेलवत आहेत.

प्रस्तावनेत वि.स. जोगांनी त्यांच्या साहित्य प्रवासाची समर्पक नोंद केली आहे ते म्हणतात, 'साठोत्तरी काव्यात दलित साहित्याच्या मागोमाग आदिवासी साहित्याचे तुमरामांनी बीजारोपण केले. नुसतेच बीजारोपण केले असे नाही, तर त्या अंकुराचा आदिवासी साहित्याचा विशाल वृक्ष करण्याचे श्रेय मुख्यत: विनायकराव तुमरामांचे आहे. मराठी समीक्षेच्या अनेक शिखरांपैकी एक शिखर म्हणजे तुमराम. आदिवासी शब्दाची व्युत्पत्ती देण्यापासून आदिवासी समाजातील उन्नती करण्यापर्यंत सर्व प्रक्रियांमध्ये त्यांचा वाटा मोठा आहे.' अशाप्रकारे तुमरामांचं कार्य

***(पृष्ठ क्र. ८८ वर पहा)***

# ‘आदिवासी विकास धोरण – स्वरुप व दिशा’ चर्चासत्रातील उपस्थितांची यादी

**श्री. मोहन हिराबाई हिरालाल**
संयोजक, वृक्षमित्र
गडचिरोली-चंद्रपूर, शेंडे प्लॉट, रामनगर,
चंद्रपूर - ४४२ ४०१

**श्री. देवाजी नवलू तोफा**
मु. मेन्ढा (लेखा), पो. हेटी
ता. धानोरा, जि. गडचिरोली

**श्री. बाळकृष्ण रेणके**
एफ. १/ए-५, अवंती नगरी, सोलापूर

**ॲड. सुरेखा दळवी**
श्रमिक क्रांती संघटना
देवनगरी सोसायटी, आदिवासी विद्यार्थी,
वसतिगृहाजवळ, पेण, जि. रायगड

**श्री. वाहरू सोनवणे**
आदिवासी एकता परिषद, शहादा, जि. नंदूरबार

**प्रा. डॉ. विनायक तुमराम**
प्लॉट नं. ५०३, कस्तुरीसाक्षी अपार्टमेंट,
उमरेड रोड, नागपूर-२४

**श्री. मिलिंद बोकील**
मुक्ता कॉम्प्लेक्स, पुणे

**श्री. सुबोध कुलकर्णी**
ज्ञान प्रबोधिनी, गडचिरोली,
कर्मयोग, एस.डी.ओ. क्वॉर्टर, धानोरा रोड, गडचिरोली

**श्रीमती पुष्पाताई आत्राम**
रंगीरापुरा, वार्ड क्र. १६, गणेशपुर रोड, शिवनेरी चौक,
वणी, ता. वणी, जि. यवतमाळ

**श्री. पी. डी. आत्राम**
रंगीरापुरा, वार्ड क्र. १६, गणेशपुर रोड, शिवनेरी चौक,
वणी, ता. वणी, जि. यवतमाळ

**डॉ. सतीश गोगुलवार**
आम्ही आमच्या आरोग्यासाठी
मु. पो. ता. कुरखेडा, जि. गडचिरोली

**श्रीमती उल्का महाजन**
सर्वहाराजन आंदोलन, माजगाव, जि. रायगड

**डॉ. निरूपमा देशपांडे**
संपूर्ण बांबू केंद्र,
मु. लवादा, ता. धारणी, जि. अमरावती ४४४ ७०२

**श्री. राजू पांढरा**
ठाणे

**श्रीमती वैशाली कणसकर**
मैत्री पुणे
३२ कल्याण, नटराज सोसायटी, कर्वेनगर, पुणे-५२

**श्री. मधुकर माने**
मैत्री (मेळघाट मित्र), मु. चिलाटी, पो. हतरू,
ता. चिखलदरा, जि. अमरावती

**श्री. चांगू हरि मेंगाळ**
श्रमीक क्रांती संघटना
मु. भोमोली, पो. कुसुंबले, ता. अलीबाग, जि. रायगड

**श्री. दिलीप बाळकृष्ण डाके**
श्रमिक क्रांती संघटना
मु. माडपवाडी, पो. माजगाव, ता. खाणापूर,
जि. रायगड

**श्री. अरूण मुकूंद सामंत**
भोगवे, सिंधुदुर्ग
**श्री. लवू नारायण गावडे**
कोचरा, सिंधुदुर्ग
**श्री. मेहर गाडेकर**
८८५/५, भांडारकर रोड, पुणे -४.
**श्री. अभिषेक कमलाकर वाघमारे**
ए. सी./१०, अमोघ, रेणूका सोसायटी,
चिंतामणीनगर, बिबवेवाडी
**श्री. धनंजय ओंबार**
ए-५०२, चिन्नार लिमीटेड कालवा, खेरगाव, जि. ठाणे
**श्री. बुधाजी डामसे**
शाश्वत, मु.पो. मंचर, जि. पुणे
**श्री. कुंडलिक केदारी**
२४/५९९, पावन सह. हौसिंग सोसायटी,
गोखलेनगर, पुणे १६
**श्री. सुनिल वामन कुमरे**
गोकुलनगर, कलामंदीर, मु. पो. ता. बल्लारपूर,
जि. चंद्रपूर
**श्री. संतोष पाटील**
मैत्री, प्लॉट नं. ३०, सिरीयल नं. २८/४, धनकवडी,
पुणे-४३
**श्री. पुरूषोत्तम आगाशे**
व्ही-३, चैतन्यनगरी, वारजे, पुणे-५८
**श्री. सचिन अत्रे**
जी- ४०८ अनुजा अपार्टमेंट, शाहू कॉलनी,
लेन.नं. ९, कर्वेनगर, पुणे-४११ ०५२.
**श्री. दामू ठाकरे**
मु. पो. कुठावद, ता. शहादा, जि. नंदूरबार
**श्री. तेजसिंग तांबोळी**
जव्हार
**श्री. राकेश टी. दुर्गे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
एटापल्ली, जि. गडचिरोली
**श्री. भरत खंदारे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
झरीजामणी, जि. यवतमाळ
**श्री. गणपत खाडे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
राजूर, ता. अकोले, जि. अहमदनगर
**श्री. उमेश वामन सपकाळे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
जव्हार, जि. ठाणे
**श्री. गणपत वासावे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
अक्कलकुवा जि. नंदूरबार
**श्री. रोहिदास पावरा**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
धडगांव, जि. नंदूरबार
**श्री. अय्याभाउ लखमा आत्राम**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
झरीजामणी, जि. यवतमाळ
**श्री. विष्णू भोरे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
जव्हार, जि. ठाणे
**श्री. विलास पाटील**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
मोखाडा, जि. ठाणे
**श्री. महेश एन. डोनारकर**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
एटापल्ली, जि. गडचिरोली
**श्री. सोमजी एफ. पल्लो**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
एटापल्ली, जि. गडचिरोली
**श्री. शैलेश दळवी**
तळेगाव दाभाडे, जि. पुणे

**श्री. ओमप्रकाश वाघमारे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
धारणी, जि. अमरावती
**श्री. संतोष व्यवहारे**
समन्वयक, आदिवासी उत्त्थान कार्यक्रम,
धारणी, जि. अमरावती
**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद, पुणे**
प्रा. रा. के. मुटाटकर
डॉ. कल्पना मुटाटकर
डॉ. पंडित विद्यासागर
डॉ. बाबुल पठाण
श्री. ग. शां. पंडित
डॉ. अभय कुदळे
श्री. सज्जू जोसेफ
श्रीमती विदुला पुरोहित
श्री. प्रशांत कुलकर्णी
श्री. जयवंत डांगे
श्री. विनायक आमले
श्रीमती स्वाती दंडारे
श्रीमती शर्वरी निसळ
श्रीमती दीपा ठाकूर
श्री. अमिजीत भालेराव
श्री. अमर मस्के
डॉ. प्रवीण सावंत
श्री. चितामंण धोंगळे
श्री. पोपट मदने
श्री. नंदू दिघे
श्री. अरूण आवळे
श्री. सुजीत घुले
कु. आरती कुमार वाघमारे
डॉ. रश्मी दांडेकर
डॉ. सतीश खळीकर


## 'हाकारा' च्या वाचकांसाठी व अभ्यासकांसाठी खूशखबर

**'हाकारा'** नियतकालिकाचे जुने अंक जीर्ण झाल्याने दुर्मिळ होत चालले आहेत. त्यामुळे संशोधकांना, कार्यकर्त्यांना संदर्भासाठी अंक उपलब्ध होणे अशक्य होते. त्यासाठी आम्ही १९८० पासून २०१३ पर्यंतच्या सर्व अंकांचे **'डिजिटलायझेशन'** करुन **'सीडी'** तयार केली आहे. या एका सीडीमध्ये सुमारे ३४ वर्षांच्या अंकांचा समावेश आहे. रुपये ३५०/- या शुल्कात सदरची सीडी उपलब्ध होणार असून ज्यांना 'सीडी' हवी असेल त्यांनी कृपया पत्राने, फोनद्वारे नावनोंदणी करुन ठेवावी, ही विनंती.

**• पत्रव्यवहाराचा पत्ता व फोन •**

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

२०१, आकांक्षा रेसिडेन्सी, बी विंग, दुसरा मजला, शिवाजी पुतळ्याजवळ,
औंधगाव, पुणे - ४११ ००७. टेलिफोन (०२०) २५८८४१५०, २५८९७२९८

*(पृष्ठ क्र. ८४ वरुन)*

साहित्यिक आणि सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने जाणारं आहे.

*अरे रानातल्या जीवा।*
*कवा येशील बाहेर*
*गेल्या आयुष्याले भेगा।।*
*जळे दु:खात संसार।।*
*पशुपक्षांची शिकार।*
*कंदमुळांची भाकर।।*
*पायी बोचती गा काटे।*
*जवा फिरशी कांतार।।*

त्यांची कविता वास्तवाच्या उघडया डोळयातून आदिवासींचं जीवन बघते. व्यथा वेदनांच्या पाशातून बाहेर येण्यास उद्युक्त करते. भेगाळलेल्या आयुष्याचं अन् पायी बोचणाऱ्या काटयाचं आदिम शल्य मांडते. पुढच्या शतकांचा प्रवास हा वेदनादायी होऊ नये म्हणून आदिवासींची वैचारिक दिशा निश्चित करते. आदिवासी समाज आर्थिक आणि सामाजिक शोषणातून मुक्त होऊन त्याला स्वत:चे अधिकार मिळाले पाहिजेत, यासाठी आदिवासींमध्ये क्रांतिउर्जा निर्माण करणाऱ्या क्रांतिकारी साहित्याची भूमिका 'रानगर्भातील जखमा' या कवितासंग्रहाच्या रूपाने मांडण्यात आली आहे.

***(साभार : दै. लोकशाही वार्ता, नागपूर, दि. २३ जून २०१३)***

• • •

## रणशिंग फुंकले

*रक्षण कराया मायूमीचे*
*रेवजीभाईंनी रणशिंग फुंकले*
*जन्माला आले हे गाव खरवंद*
*उपासमारीला खाल्ले रानकंद*
*त्याग-सत्य-प्रेमे जीवन व्यतीले*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंगले*
*चले जाव लढ्याचे अग्रणी गांधीजी*
*सहकारी बनून वीर हे रेवजी*
*स्वातंत्र्यासाठी घरदार सोहिले*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंकले*
*शनिवारवाड्याला युनियन जॅक*
*झळकत होते जुलमी डौलात*
*हिमतीने निशाण ते खाली खेचले*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंकले*
*पोर्तुगिजसत्ता दमन करुन*
*मुक्तियले गोवा-दीव-दमण*
*देही वार बहू कारावास सोशिले*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंकले*
*अंगिकारली भूदान चळवळ*
*भूमीहीनांना दिले त्यांनी बळ*
*सर्वोदय, ग्रामदानासाठी झटले*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंकले*
*अखंड देशी लढले जिद्दीनं*
*जव्हार संस्थान केले विलीन*
*सहकार कामी झाले रविकिरणे*
*रेवजीभाईंनी रणशिंगे फुंकले.*

**श्री. रवी लक्ष्मण बुधर (प्रा.शि.)**
कोगदे, ता. जव्हार, जि. ठाणे
*('समर्पण' काव्य संग्रहातून)*